उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ९ ■ नाशिक, मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा






कंगना रणौतला धमकीचा व्हिडिओ मेसेज आल्याने खळबळ

## महत्त्वाचे

### नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांचे निधन

**नांदेड :**

नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांचं निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. मध्यरात्री त्यांची तब्येत अचानक बिघडली. त्यावेळी त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अखेर पहाटे ४ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. वसंत चव्हाण खासदार होण्याआधी महाराष्ट्र विधानसभेवर अपक्ष म्हणून निवडून गेले होते. त्यांनी नायगाव विधानसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं होतं. त्यांनी २०१४ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.

### शाहबाज शरीफ यांचे मोदी यांना निमंत्रण

**नवी दिल्ली :**

शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन याचं पाकिस्तानमध्ये १५-१६ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आलं आहे. शाहबाज शरीफ यांनी या बैठकीत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण धाडलं आहे. कौन्सिल ऑफ गव्हर्नमेंटच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी हे निमंत्रण इतर नेत्यांसह पंतप्रधान मोदींना देण्यात आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १५-१६ ऑक्टोबर रोजी सीएचजीची बैठक होणार आहे. गेल्या ८ वर्षांमध्ये या वर्षी पहिल्यांदाच भारताच्या पंतप्रधानांना पाकिस्तानकडून निमंत्रित करण्यात आलं आहे. आता तणावपूर्ण संबंधांमध्ये पाकिस्तानच्या निमंत्रणानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी पाकिस्तानात जाणार का? असा प्रश्न इथे उपस्थित केला जात आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांचा 35 फुटी पुतळा कोसळला

## दोषींवर गुन्हे दाखल करण्याची शिवप्रेमींची मागणी

**सिंधुदुर्ग : नौदल दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याला सलाम म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमध्ये पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला होता. हा पुतळा दुर्दैवाने कोसळला आहे. यामागचे कारण अजून कळू शकलेले नाही. ४ डिसेंबर २०२३ रोजी मालवणच्या राजकोट किल्ल्यावर या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान मोदींच्या हस्ते पार पडले होते.**

आमदार वैभव नाईक म्हणाले, शिवाजी महाराजांचा पुतळा हा निकृष्ट कामामुळे कोसळला आहे. याबद्दल आम्हाला दु:ख होत असून, एक शिवप्रेमी म्हणून आम्ही याचा निषेध करतो. सहा महिन्यांपूर्वी कोट्यवधी रुपये खर्च करून हा पुतळा उभारण्यात आला होता. ज्यावेळी काम सुरू होते त्यावेळी स्थानिक लोकांनीसुद्धा कामासंदर्भात तक्रारी केल्या होत्या. पण त्यावेळी पद्धतशीरपणे दुर्लक्ष केले. जे विरोध करत आहेत ते आपल्या विरोधात आहे, असा समज करून घेतला. ४०० वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या किल्ल्याचा एकही चिरा ढासळला नाही, पण सहा महिन्यांपूर्वी येथील काम ढासळले होते. या प्रकरणी दोषींवर गुन्हे झाले पाहिजे, अन्यथा आम्ही जिल्ह्यात नाही तर राज्यभर आंदोलन करण्यात येईल. तसेच सर्व शिवप्रेमींनी शांततेत आंदोलन करावे. /-.. ४

### पुतळा कोसळल्याने विरोधक आक्रमक

सिंधुदुर्ग : मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या पुतळ्याचं बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले होते. आता सरकार ही जबाबदारी दुसऱ्यावर ढकलतील. या पुतळ्यासाठी सरकारने खर्च केला आहे. त्यामुळे दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झाले पाहिजेत, नाहीतर शिवप्रेमी म्हणून फक्त जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यभरात आम्ही आंदोलन करणार आहोत, अशी भूमिका ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी घेतली.



### मोदींच्या हस्ते पुतळ्याचे लोकार्पण

राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पुतळा ३५ फुटांचा होता. मालवणमधील तारकर्लीच्या समुद्रकिनारी नौदल दिनाच्या कार्यक्रमावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुतळ्याचे लोकार्पण झाले होते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांना देशातील पहिल्या आरमाराचे जनक म्हणून ओळखले जाते. भारतीय नौदलाने देखील आपल्या ध्वजावर शिवरायांची राजमुद्रा छापली आहे. यानिमित्ताने राजकोट किल्ल्यावर नौदल आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाला होता.

# बदलापूर घटनेतील आरोपीला ९ पर्यंत कोठडी

**कल्याण : बदलापुरातील शाळेत शिकणाऱ्या दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार प्रकरणी अटकेत असलेला आरोपी अक्षय शिंदेला कल्याण न्यायालयाने १४ दिवसांची म्हणजेच ९ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.**

याआधी न्यायालयाने त्याला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. कल्याण न्यायालयातील न्यायाधीश वी. ए. पत्रावळे यांच्या दालनात ही सुनावणी पार पडली होती. त्याची पोलीस कोठडी संपल्यानंतर पुन्हा एकदा त्याला काल न्यायालयासमोर हजर केले असता १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष, मुख्याध्यापिका आणि सेक्रेटरी यांना फरार आरोपी बनवण्यात आले आहे. तसेच पॉक्सो गुन्ह्यात काही कलमं वाढवण्यात आली आहेत.

**शाळेतील १५ दिवसांचं सीसीटीव्ही फुटेज गायब**

शिक्षणमंत्री म्हणाले, शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावणं आवश्यक आहे. मात्र, संबंधित शाळेतील मागील १५ दिवसांचं सीसीटीव्ही फुटेज गायब आहे. हे रेकॉर्डिंग कसं गायब झालं? याबाबत पोलिसांनी चौकशी करावी, अशी शिफारस देखील आम्ही केली आहे. ही घटना शाळेतील शौचालयाजवळ घडली आहे. नेमकं तिथलं सीसीटीव्ही फुटेज गायब आहे.

दरम्यान, दीपक केसरकर यांनी यावेळी सांगितलं की, ते पीडित मुलींची भेट घेणार आहेत. तसेच केसरकर यांनी दोन्ही मुलींच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याची तयारी दर्शवली आहे.

### शाळांमध्ये पॅनिक बटण आणण्यासाठी प्रस्ताव

असं प्रकरण घडल्यानंतर संपूर्ण सिस्टिम बदलावी लागेल. महत्त्वाचा निर्णय कालच्या बैठकीत झाला. मी राज्यमंत्री होतो तेव्हा मी एक प्रस्ताव सादर केला होता. आपण पॅनिक बटण शाळांमध्ये लावावं आणि महिलांना द्यावं. महिला आणि मुलं अडचणीत आल्यावर पॅनिक बटण दाबल्यास पोलिस ठाण्यात त्वरित माहिती कळते. मग ट्रॅकिंग सिस्टिममुळे पोलिसांपर्यंत ही संबंधित व्यक्ती कुठे गेली हे समजतं. ही सिस्टिम ऑफलाइनही चालते. हैदराबादमधील एका कंपनीने हे बटण तयार केलं आहे. हे सुरू केलं तर अशा घटनांवर नियंत्रण येईल.

# काँग्रेस, ठाकरे गटात जागांवरून मतभेद

## मुंबईतील तेढ दिल्लीचे वरिष्ठ नेते सोडवणार

**मुंबई : महाविकास आघाडीकडून जागावाटपासंदर्भात बैठका सत्र सुरू, मात्र अजूनही जागावाटपावर मार्ग निघालेला नाही. मविआकडून विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी केली जात आहे. मुंबईत जागांवरून ठाकरे गट शिवसेना आणि काँग्रेसमध्ये मतभेद निर्माण झाले आहेत. या जागांबाबत दोन्ही पक्षांतील नेत्यांनी आपली भूमिका मांडली. मात्र, या जागांवर कोणताच निर्णय झाला नाहीये. मुंबईतील जागांबाबत दिल्लीतील हायकमांड निर्णय घेणार असल्याचं काँग्रेस नेत्यांनी सांगितले.**



काल महाविकास आघाडीच्या नेत्यांची जागावाटपासंदर्भात मुंबईत बैठक झाली. मात्र, या बैठकीतही काही जागांवर घोडं अडल्याने फॉर्म्युला न ठरताच बैठक संपली. या बैठकीत काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये मतभेद झाल्याचं समोर आलं. मुंबईच्या काही जागांवर तिन्ही पक्ष तर काही जागांवर दोन पक्ष दावा करत आहेत. त्यामुळे अजूनही पुढील बैठकीमध्ये मुंबईतील जागांसंदर्भात चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. शिवसेना ठाकरे गट अजूनही २० ते २२ जागांवर आग्रही आहे. तर त्यातील काही जागांवर काँग्रेस आग्रही आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पाच ते सात जागांवर /-.. ४



# रशियाचा युक्रेनवर पुन्हा मिसाईल हल्ला

**नवी दिल्ली :**

रशिया आणि युक्रेनमधील युद्ध अजून मिटताना दिसत नाहीये. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन पुन्हा आक्रमक झाले असून, त्यांनी युक्रेनवर मिसाईल आणि घातक ड्रोन्सने हल्ला चढवलाय. रशियाकडून करण्यात आलेला हा हल्ला युक्रेनवरील आतापर्यंतचा सर्वांत मोठा हल्ला आहे. रशियाने जमीन आणि हवाई अशा दोन्ही मार्गांनी युक्रेनवर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये रशियाने लोकांपेक्षा जास्त ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य केलं असून, युक्रेनमधील अनेक शहरे अंधारात बुडाली आहेत. तेथील वीजपुरवठा बंद झाला.

रशियाच्या सैन्याने सोमवारी युक्रेनच्या अनेक भागात ड्रोन आणि मिसाईलने हल्ला केला. हे हल्ले विशेषत: वीज प्रकल्पांवर करण्यात आले. या हल्ल्यांमध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास सुरू झालेला हा हल्ला सोमवारी सकाळपर्यंत सुरू होता. गेल्या काही आठवड्यांमधील हा सर्वांत मोठा हल्ला असल्याचे /-.. ४

# लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांची घोषणा

**नवी दिल्ली :**

केंद्र सरकारने लडाखबाबत मोठा निर्णय घेतला आहे. लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांची घोषणा केंद्र सरकारने केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यासंदर्भातील माहिती अधिकृत एक्स (ट्विटर) अकाउंटवरून दिली आहे. तसेच लडाखमध्ये पाच नवीन जिल्हे स्थापन करण्याचा निर्णय हा विकसित आणि समृद्ध लडाख बनवण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं स्वप्न साकार करण्यासाठी घेतल्याचं अमित शाह यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, लडाखमध्ये आता ज़ंस्कार, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग असे पाच नवीन जिल्हे स्थापन करण्याची घोषणा गृहमंत्री अमित शाह यांनी केली आहे. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील एक्सवर पोस्ट करत लडाखच्या लोकांचं अभिनंदन केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं विकसित आणि समृद्ध लडाख बनवण्याचं स्वप्न साकार करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने केंद्रशासित प्रदेशात पाच नवीन जिल्हे निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जस्कार, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग हे नवीन जिल्हे आता प्रशासनाला बळ देतील आणि लोकांसाठी फायद्याचे ठरतील. मोदी सरकार लडाखमधील लोकांसाठी मुबलक संधी निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे, असं अमित शाह यांनी एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**मोदी काय म्हणाले?**

लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत लडाखमधील नागरिकांचं अभिनंदन केलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं की, लडाखमध्ये पाच नवीन जिल्ह्यांची निर्मिती हे उत्तम प्रशासन आणि समृद्धीच्या /-.. ४

# अभिवादन



## स्व. द. शं. तथा दादासाहेब पोतनीस

**(२२ नोव्हेंबर १९०९ - २७ ऑगस्ट १९९८)**

जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग ।
जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ।।

जाणत्याचा साक्षेप घ्यावा । जाणत्याचा तर्क जाणावा ।
जाणत्याचा उल्लेख समजावा । न बोलतांचि ।।

जाणत्याचे धूर्तपण । जाणत्याचे राजकारण ।
जाणत्याचे निरूपण । ऐकत जावें ।।

जाणत्याची तीक्ष्णता । जाणत्याची सहिष्णुता ।
जाणत्याची उदारता । समजोन घ्यावी ।।

थोर स्वातंत्र्यसैनिक, नाशिकच्या विकासाचे एक शिल्पकार, संयमी नेतृत्व आणि दैनिक गांवकरीचे संस्थापक, सर्वांचे आदरस्थान असलेल्या पत्रमहर्षी स्व. दादासाहेब पोतनीस यांना २६ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन !

गांवकरी प्रकाशन

गांवकरी परिवार

# ना. भुजबळ, गावितांनी आमच्या सोबत यावे

## प्रकाश आंबेडकरांची ऑफर

**नाशिक : प्रतिनिधी राष्ट्रवादीचे छगन भुजबळ हे शंभर टक्के ओबीसी नेते आहेत. त्यांच्या पक्षात ओबीसींवर बोलले जाते का? याबाबत त्यांनी सांगावं, असे म्हणत छगन भुजबळ यांनी आमच्या सोबत यावं, त्यांना मी खुली ऑफर देत आहे, असे जाहीर वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केले. त्याचबरोबर पेसाअंतर्गत नोकरभरती केली जावी, या मागणीसाठी तीन दिवसांपासून उपोषणाला बसलेले माकपचे माजी आमदार जे. पी. गावित यांनाही आंबेडकर यांनी तिसऱ्या आघाडीत येण्याची ऑफर दिली. दरम्यान, आंबेडकरांच्या या ऑफरची नाशिकच्या राजकारणात चांगलीच चर्चा रंगली आहे.**



नाशिक दौऱ्यावर वंचित आघाडीचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश आंबेडकर आले असता त्यांनी मा. आ. गावित यांची भेट घेतली. तसेच पत्रकार परिषद घेत त्यांनी विविध मुद्यांवर स्पष्टपणे मते मांडली. यावेळी वंचितचे महानगराध्यक्ष अविनाश शिंदे, युवक प्रदेश सदस्य चेतन गांगुर्डे, युवक महानगरप्रमुख रवी पगारे, सम्यक विद्यार्थी जिल्हाध्यक्ष मिहीर गजबे, वामन गायकवाड, संजय साबळे, दीपक पगारे, सुनील साळवे, बजरंग शिंदे, संविधान गांगुर्डे, सूरज गांगुर्डे आदी उपस्थित होते. पुढे आंबेडकर म्हणाले, नाशिकमध्ये सुरू असलेले आदिवासी आंदोलनाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. स्थानिक नेत्यांनी आरक्षित मतदारसंघात निवडणूक झाल्यावर आदिवासी बांधवांच्या प्रश्नाकडे नेहमी दुर्लक्ष केले आहे. सरकारने पेसा कायद्यांतर्गत भरती प्रक्रिया करून मागील प्रलंबित भरती केली पाहिजे. नागपूर येथे आदिवासी बांधवांसोबत एकत्रित कार्यक्रम होणार आहे. यावेळी सर्व आदिवासी नेते एकत्र येण्याच्या दृष्टीने आमच्या उपाययोजना सुरू आहेत. यावेळी आंबेडकर सत्ताधारी व विरोधकांवर देखील निशाणा साधताना म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या काळात पण लाठीचार्ज झाला होता व देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळात पण लाठीचार्ज होत आहे. ठाकरे यांनी कोणाकडे बोटं करू नये. इतरांवर एक बोट करत असताना आपल्याकडे चार बोटं असल्याचा टोला लगावला. तसेच मराठा व ओबीसी समाज एकमेकांच्या विरोधात दिसत आहेत. जरांगे /-.. ४

## महत्त्वाचे

### सुराणा कनिष्ठ महाविद्यालयात विशाखा समितीची स्थापना



**मंगरुळ : प्रतिनिधी**

चांदवड येथील आबड, लोढा व जैन वरिष्ठ आणि सुराणा कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेच्या विश्वस्त समितीचे अध्यक्ष श्रीमान बेबीलालजी संचेती, उपाध्यक्ष श्रीमान दिनेशकुमारजी लोढा, मानद सचिव श्रीमान जवाहरलालजी आबड, प्रबंध समितीचे अध्यक्ष श्रीमान अजितकुमारजी सुराणा, उपाध्यक्ष श्रीमान अरविंदकुमारजी भन्साळी, महाविद्यालयाचे समन्वयक श्रीमान कांतीलालजी बाफना व सी.ए. श्रीमान महावीर पारख, सी.ए. श्रीमान अक्षयजी भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विशाखा समितीची स्थापना करण्यात आली. महिला तक्रार निवारण समिती (विशाखा समिती) अंतर्गत तक्रारपेटीचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पवार उपस्थित होत्या. तर अध्यक्ष म्हणून वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. ए. शिंपी होते. याप्रसंगी डॉ. अर्चना पवार यांनी स्त्रियांवर, मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचे प्रकार तसेच त्यामध्ये with touch, without touch या अत्याचाराविषयी माहिती दिली. तसेच अत्याचाराची घटना घडल्यानंतर कशाप्रकारे गुन्हा दाखल करावा याविषयी मार्गदर्शन केले व कलम ३५४ ची माहिती दिली सोशल मीडियाचा वापर करताना तो काळजीपूर्वक केला पाहिजे. याविषयी मार्गदर्शन केले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील उपप्राचार्य वाय एस पाटील यांनी आपल्या मनोगत कुठल्याही प्रकारचा अन्याय सहन करू नका असे उपस्थित विद्यार्थ्यांना आवाहन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस पी सोनवणे यांनी तर समिती प्रमुखएस एस जाधव यांनी प्रास्ताविक केले तर यू जे जाधव यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला तर आभार टी डी साठे यांनी मानले. याप्रसंगी वाय पी भाबड आर आर खंदारे, ए बी ठाकरे प्रा.व्ही डी बागुल, श्री एस जी रोकडे, वाय व्ही देवरे, आर सी आहिरराव, एस डी जगताप, के एस चोरडिया, एस व्ही सोनवणे इत्यादी उपस्थित होते.

### स्वामी मुक्तानंद विद्यालयात शिक्षक-पालक सहविचार सभा

**येवला : प्रतिनिधी**

येथील श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वामी मुक्तानंद विद्यालयात शिक्षक-पालक सहविचार सभा मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात उत्साहात संपन्न झाली. विद्यालयात झालेल्या सहविचार सभेत विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. यावेळी शिक्षक-पालक संघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, यात अध्यक्ष मनोहर कदम, उपाध्यक्ष रमेश ढमाले, सचिव मोहन परदेशी तर कार्यकारिणी सदस्य शिक्षक व पालक यांची निवड करण्यात आली. दरम्यान उपाध्यक्ष रमेश ढमाले यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. पालकांनी विचारलेल्या प्रश्नांवर व विद्यार्थ्यांच्या अडचणी यावर चर्चा करण्यात आली. सहविचार सभेला प्राचार्य मनोहर कदम, पालक रमेश ढमाले, पर्यवेक्षक ज्ञानेश्वर भागवत, राजेंद्र सोनवणे,प्रविण नागडेकर यांनी मार्गदर्शन केले. या सहविचार सभेला शिक्षक, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रविण नागडेकर यांनी केले तर आभार मोहन परदेशी यांनी मानले.

### मुख्यमंत्री वयोश्री योजना मार्गदर्शन शिबिर

**लासलगाव : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिक संघ पिंपळगाव नजीक यांच्या विद्यमाने संघातील सदस्यांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजनेची माहिती व अर्ज सादर करण्याबाबतचे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन पिंपळगाव नजीक येथे श्री हनुमान मंदिरात करण्यात आले होते. या शिबिरात अनेक सदस्यांनी उपस्थिती नोंदवून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. शिबिर यशस्वीतेसाठी संघाचे अध्यक्ष प्रमोद आढाव, उपाध्यक्ष विठ्ठलराव खुटे, खजिनदार भाऊसाहेब सोनवणे व सेक्रेटरी राजेंद्र सावंत यांनी विशेष प्रयत्न केले.

### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील भारतनगर भडाणे येथील नंदू सुभाष गायकवाड यांनी दुपारी चार वाजेच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत सागर भिल्लो आहेर यांनी चांदवड पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक सांगळे तपास करीत आहे.

### चांदवड महाविद्यालयात कुस्ती स्पर्धा उत्साहात

**चांदवड : वार्ताहर**

येथील कर्मवीर आबड कला, लोढा वाणिज्य, जैन विज्ञान (वरिष्ठ) महाविद्यालय व एस.पी.डी. सुराणा (कनिष्ठ) महाविद्यालय तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चांदवड तालुका स्थानिक क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मुले व मुली कुस्ती स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी पी. पी. गाळणकर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दत्ता शिंपी होते. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. मनोज पाटील, योगेंद्र पाटील, संतोष ठाकरे, अजय नायर, ज्ञानेश्वर काळे, जीवन शिंदे आदी उपस्थित होते. तसेच चांदवड तालुक्यातील कुस्तीप्रेमी, विद्यालय व महाविद्यालयांचे क्रीडा शिक्षक, खेळाडूंचे पालक याप्रसंगी हजर होते. गाळणकर, डॉ. दत्ता शिंपी यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धेतून निवड झालेल्या खेळाडूंची नाशिक देवळाली कॅम्प येथे होणाऱ्या आंतरजिल्हा कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रास्ताविक योगेंद्र पाटील यांनी केले.

# पावसाने पिकांचे नुकसान; घरांची पडझड

**मालेगाव : प्रतिनिधी**

**तालुक्यात सलग चार ते पाच दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतपिकांना ऐन बहरण्याच्या काळात दिलासा मिळाला आहे. जोरदार पावसाने काही भागात शेतपिकांचे नुकसान देखील झाले आहे. माळमाथा भागात सलग सुरू असलेल्या पावसामुळे खलाणे येथील शेतकरी मधुकर जिभाऊ जाधव यांच्या शेतात चार ते पाच फुटांचा खड्डा पडला आहे.**



**या गावांमध्ये पावसाचा जोर**

सिताणे–रोंझाणे, खलाणे, म्हालनगाव, चिखलओहळ, गिगाव, बोधे, दहिवाळ, रोझे, शेंदुर्णी, नाळे, देवारपाडे, साजवाळ, पाडळदे, सायतरपाडे, देवघट, दापोरे, शेरुळ, हिसवाळ, कळवाडी, साकूर, नरडाणे, चिंचगव्हाण, उंबरदे या गावांमध्ये जोरदार पाऊस झाला आहे. काही गावांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने बाजरी व मका पीक भुईसपाट झाले आहे. शेती उपळल्यामुळे कपाशी पीक उन्मळून पडतेय. कांदा लागवडीस वाफ नसल्याने हिरवेगार कांदा रोप पिवळे पडून सडू लागले आहे. लागवड झालेल्या कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

याचबरोबर पाच एकर शेतास तयार कांद्याचे नुकसान झाले आहे. काही भागांमध्ये घरांची पडझड झाली आहे. वीज पडून जनावरे दगावल्याच्या घटना घडल्या आहेत. पंचनामे करून अहवाल वरिष्ठांना सादर करण्यात आले. गुरुवारपासून सलग सुरू असलेल्या पावसामुळे माळमाथा भागात ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले. छोट्या-मोठ्या नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. कपाशी व इतर पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. डोंगराळे येथे राजेंद्र धोंडूसिंग परिहार या शेतकऱ्याच्या शेतात वीज कोसळून एक गाय, एक म्हैस असे दोन जनावरे मृत्युमुखी पडले आहेत. येसगाव खु. येथील शेतकरी राकेश ठाकरे यांची जर्सी जातीची गाय वीज मृत्युमुखी पडल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झाले. झोडगे येथील दत्तू गोपीचंद माळी यांच्या घराची भिंत कोसळल्याने संसार उघड्यावर आला. काटवण परिसरातील वळवाडे येथील माधव दोधा भामरे यांच्या पाटाईत घराची पडझड झाल्याची घटना घडली.

काटवण परिसरात जोरदार पावसाने विविध भागात पावसाचे पाणी साचले. गेल्या तीन ते चार दिवसांपासून सलग सुरू असलेल्या पावसामुळे परिसरातील ओढे नाले तुडुंब भरून वाहत आहेत. मका, कांदा, बाजरी, ज्वारी, भुईमूग, पिके फळबागांत पाणी साचले आहे. सलग पाऊस सुरू असल्यास हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची भीती शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली आहे.दरम्यान दापुरे-देवघट गावाच्या संपर्कासाठी असलेला पुलावरून पाणी गेल्याने या दोघा गावांचा संपर्क काही काळ तुटला होता. परिसरातील ओढे-नाले खळखळून वाहत असल्याने शाकंभरी नदीला पूर आला आहे. पुलावरून पाणी गेल्याने परिसरातील नागरिकांना जीव मुठीत धरून पाण्यातून प्रवास करावा लागत होता. कळवाडी येथे शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागला. शहरातील ठिकठिकाणी सखल भागात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचले आहे. भुयारी गटार कामामुळे रस्ते खोदून पडले आहेत. नागरिकांना चिखल तुडवत वाट काढावी लागत आहे. शहराच्या पूर्व भागातील झोपडपट्ट्यांमध्ये गटार व नाल्यांचे पाणी शिरल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. नाल्यांमधून पाण्याचा निचरा होत नसल्याने रस्त्यावर गटारीचे पाणी साचत आहे. पाण्यातून नागरिकांना वाट काढावी लागत आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.



दिंडोरी : येथे गणेशमूर्तींना अखेरचे रंगकाम करताना राजस्थानी कारागीर. (छाया : अशोक केंग )

# कारागिरांची गणेशमूर्ती बनवण्याची लगबग

## गणेशमूर्तींचे रंगकाम अंतिम टप्प्यात

**दिंडोरी : अशोक केंग**

**दिंडोरी शहरामध्ये गेल्या चार ते पाच वर्षांपासून आपल्या उदरनिर्वाहासाठी गणेशमूर्ती बनवण्याचे काम करत असून, यावर्षीही या कारागिरांनी वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती बनवल्या असून, या मूर्तींना रंगकाम करण्याचे अंतिम टप्प्यात आल्याचे राजस्थानी कारगिराने सांगितले.**

> मी चार ते पाच वर्षांपासून दिंडोरी येथे गणपती मूर्ती विकण्यासाठी येत असतो. मला दिंडोरी शहरात या चार ते पाच वर्षांत मला दिंडोरीकरांनी खूप प्रेम व सहकार्य दिले आहे. एक ते दीड महिना झाला असून, आम्ही राजस्थानवरून १० ते १५ कारागीर आलो आहेत. आमच्याकडे अनेक प्रकारच्या गणपतीच्या मूर्ती बनवल्या आहे. तसेच आम्ही व्यापारी तसेच इतर भक्तांना होलसेल भावात मूर्ती देत असतो. कोणाला पण होलसेल भावात गणपती मूर्ती पाहिजे असेल तर दिंडोरी येथे आकाशदीप हॉटेल समोर यावे.
>
> – **कालूराम मोगीया,**उदयपूर राजस्थान

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या श्री गणरायाच्या आगमनाला दोन आठवडे शिल्लक असल्याने दिंडोरी येथे राजस्थानमधून आलेल्या कारागिरांनी रंगरंगोटी काम अंतिम टप्प्यात आणले आहे. जसजसा गणरायाचा उत्सव जवळ येत आहे, तसतसा गणेश मंडळांमध्ये देखील उत्साह संचारला असून, अनेक मंडळे मोठे गणपती खरेदी करण्यासाठी आत्तापासूनच तयारीला लागले आहे. शाडू मातीची टंचाई असल्याने मातीच्या मूर्ती व पीओपीच्या गणेशमूर्ती २० टक्क्यांनी महागल्याचे गणेशमूर्ती विक्रेत्यांनी सांगितले.

७ सप्टेंबर रोजी गणरायाचे आगमन होत असल्याने गणेशभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत असून, गणेशोत्सवाची तयारी करण्यासाठी अनेक गणेश मंडळे सज्ज झाल्याचे पाहावयास मिळत असल्याने मंडळांच्या वतीने मोठ्या आकाराची मूर्ती याशिवाय सामाजिक विषयांवर आरस अधिक चांगल्या पद्धतीने भर देण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्नशील असल्याचे दिसत आहे. याशिवाय जिवंत देखावे, विविध धार्मिक कार्यक्रम याचेदेखील आयोजन करण्याचे बेत आखले जात आहे.

यंदा राज्य शासनाने पी.ओ.पी. मूर्तीवर बंधन घातल्याचे धोरण घेतले होते. मात्र, शाडू मातीची अनुउपलब्धता तसेच मूर्ती बनवण्यावरच्या मर्यादा, कारागिरांची टंचाई यामुळे यावर्षीही पीओपीच्या मूर्तींनाच थोडासा प्राधान्यक्रम राहावा असा आग्रह धरला जात होता. त्यानुसार शाडू मातीचे धोरण तात्पुरते बाजूला ठेवून पी.ओ.पी.च्या मूर्तीसाठी लवचिक धोरण स्वीकारण्यात आल्याने मूर्ती कारागिरांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे गांवकरी प्रतिनिधीशी बोलताना राजस्थानी कारागिरांनी सांगितले.

# शालेय पोषण आहार समितीच्या महिला सावत्र बहिणी असतील

## खा. भास्कर भगरे यांची राज्य सरकारवर टीका

**मनमाड : प्रतिनिधी**

**राज्य सरकारने राज्यातील महिला मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी लाडकी बहीणसारख्या योजना सुरू केल्या आहेत. निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण आठवते, पण लाडक्या बहिणीच्या सुरक्षेसाठी काय केले. याशिवाय राज्यातील अंगणवाडीसेविका, आशा वर्कर यांसह सर्वच महिलांना विविध योजना राबविण्यात आल्या. मात्र, शालेय पोषण आहार शिजवणाऱ्या महिलांना का डावलले. कदाचित शालेय पोषण आहार समितीच्या महिला या तुमच्या सावत्र बहिणी असतील, अशी खरमरीत टीका दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खा. भास्कर भगरे यांनी केली.**



**समीर भुजबळ यांना बांधली राखी...!**

शालेय पोषण आहार समितीच्या महिलांचा प्रश्न मार्गी लावा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला वंचित ठेवले. त्यामुळे तुम्हीच आमचे भाऊ आहात, असे म्हणत अध्यक्ष संगीता सोनवणे यांनी संपूर्ण राज्यातील शालेय पोषण आहार समितीच्या महिलांच्या वतीने राखी बांधली. याला समीर भुजबळ यांनीही दुजोरा देत तुमच्या सर्व मागण्यांसाठी मी व माझा पक्ष संपूर्ण ताकदीने लढू, असे वचन दिले.

नांदगाव येथे आधारवड महिला बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिवसेना ग्रामीण जिल्हाप्रमुख गणेश धात्रक होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून नाशिकचे माजी खासदार समीर भुजबळ हे उपस्थित होते. यावेळी भारतीय काँग्रेसचे शहराध्यक्ष मनोज चोपडे, रिपब्लिकन पक्षाचे नाशिक ग्रामीण सरचिटणीस कपिल तेलुरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक तालुकाध्यक्ष गुरुकुमार निकाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेंद्र बोरसे, शशिकांत मोरे, श्रावण आढाव, ऋषभ बोरसे आदींनी भाषणे करून शुभेच्छा दिल्या तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोनिया सोर, रेखा शेलार, आशाबाई काकळीज, चंद्रशेखर कवडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय पाटील, विनोद शेलार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



# शादीखानामध्ये गरीब मुस्लिम बांधवांच्या मुला-मुलींची लग्न

**नांदगाव : प्रतिनिधी**

**जी मुस्लिम कुटुंबं गरीब आहेत. त्यांच्याही मुला-मुलींची लॉन्समध्ये लग्न करण्याची इच्छा असतेच ना, म्हणून हा शादीखाना उभारून दिलाय. आता या आलिशान शादीखानामध्ये गरीब मुस्लिम बांधवांच्या मुला-मुलींची लग्न आता फक्त १०१ रुपयांत लावली जातील. तशी व्यवस्था करण्यात आली आहे, असे प्रतिपादन आमदार सुहास कांदे यांनी केले.**

आमदार सुहास कांदे यांच्या सौ. अंजुम कांदे यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून नांदगाव शहरात नव्याने निर्माण करण्यात आलेल्या ईदगाह व शादीखानाचे उद्घाटन सौ. अंजुम सुहास कांदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सौ. अंजुम कांदे, फरहान खान, इकबाल शेख, शाईनाथ गिडगे, अल्ताफबाबा खान, मयूर बोरसे, सुनील हांडगे, महेंद्र शिरसाठ, उज्वला खाडे, रोहिणी मोरे, सुजाता कातकडे, ज्ञानेश्वर कांदे, बबलू पाटील, अमजद पठाण, जाफर मिर्झा, असिफ पठाण, रफिक पठाण, हाजी मुनावर आदींसह ज्येष्ठ मुस्लिम बांधव उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमोद भाबड, सागर हिरे, सुनील जाधव, बापू जाधव आदींसह आ. सुहास अण्णा कांदे, रहेनुमा फाउंडेशनचे अध्यक्ष सईद हाजी, सचिव अय्याज शेख, कार्याध्यक्ष रियाज पठाण, सदस्य वसीम खान, नईम शेख, इकबाल शेख, समन्वय समिती सदस्य हाजी मुनव्वर पठाण, हाजी जहीर, इकबाल दादा शेख, ॲड. युनूस शेख, लतिफ सुफर, चिराग सेठ, खलील जनाब आदींसह हजारो मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# दिंडोरी विधानसभेची जागा भाजपाला सोडा; दिंडोरी विधानसभा बैठकीत मागणी

**दिंडोरी : प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीची दिंडोरी तालुक्याची महत्त्वपूर्ण बैठक काल सार्वजनिक वाचनालय येथे जिल्ह्याचे अध्यक्ष सुनील बच्छाव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. येणाऱ्या विधानसभेत महायुतीचे जास्तीत जास्त आमदार निवडून यावे, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने आणलेल्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे, असे मार्गदर्शन जिल्हाध्यक्ष यांनी केले.**




काही कार्यकर्त्यांची लोकसभेत महायुती म्हणून स्थानिक इतर महायुतीच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काम केले नाही याची खंत तालुका पदाधिकाऱ्यांनाही मीटिंगमध्ये बोलून दाखवले. या तालुक्यात भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते शेवटच्या घटकांच्या समस्या सोडवण्याचे काम करत असून, लोकसभेत तालुक्यात जे मतदान झाले ते फक्त भाजपाच्या कार्यकर्त्यांच्या जोरावर झाले. महायुती म्हणून आपले काही जोडीदार जबाबदारीने कार्यकर्त्यांना न्याय देत नसून, येणाऱ्या विधानसभेत दिंडोरी विधानसभेची जागा ही भारतीय जनता पार्टीला सोडावी, ही मागणी भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांनी केली. या बैठकीला जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, उपाध्यक्ष योगेश तिडके, सरचिटणीस शरद कासार, रणजित देशमुख, आदित्य केळकर, नाना देशमुख, बाजार समिती संचालक श्याम बोडके, मंडळ अध्यक्ष श्याम मुरकुटे किरण तिवारी आदी उपस्थित होते.

# प्रेमविवाह करणाऱ्यांना आता खाकीचे सुरक्षाकवच

## शहर पोलीस आयुक्तालयात स्थापन केला विशेष कक्ष

**नाशिक : प्रतिनिधी**

**प्रेमविवाहातून अनेकदा जोडप्याला मारहाण करण्याबरोबरच सैराटसारख्या घटनाही घडतात. त्यामुळे आता आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना पोलिसांचे सुरक्षाकवच लाभणार आहे. प्रेमविवाह केलेल्या दाम्पत्याच्या तक्रारींवर कारवाई करण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आयुक्तालयात विशेष कक्ष स्थापन केला आहे.**





गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक आंचल मुदगल यांच्यावर या विशेष कक्षाची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रेमविवाह करणाऱ्यांना या विशेष कक्षाच्या माध्यमातून संरक्षणाचे कवच लाभणार आहे.

समाजामध्ये प्रेमविवाह करणाऱ्याचे प्रमाण कमी नाही. आंतरजातीय विवाहातून अनेकदा अप्रिय घटना घडतात. अनेकदा जातपंचायतीच्या निवाड्यातून प्रेमविवाह अथवा आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या दाम्पत्यांना समाजात जगणे कठीण होऊन जाते. यातून सैराटसारख्या घटनांची देखील पुनरावृत्ती होते. या घटनांना पायबंद घालण्यासाठी आणि प्रेमविवाह केलेल्या जोडप्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी गृह विभाग आणि पोलीस खात्याची असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. सर्वोच्च न्यायालयात यासंदर्भात रिट याचिकाही दाखल झाली असता या याचिकेत असलेल्या दिशादर्शक निर्देशांचे तातडीने पालन करण्यात यावे, अशा सूचना केंद्र शासित प्रदेश, राज्य व पोलीस प्रमुखांना दिल्या होत्या. त्यानुसार प्रेमविवाह केलेल्या दाम्पत्यांना गरजेनुसार पोलीस संरक्षण देखील दिले जाणार आहे. तसेच अशा जोडप्यांना त्रास देणाऱ्या घटकांवर तसेच व्यक्तींवर कायदेशीर कारवाईचा बडगा देखील उगारण्यात येणार आहे.

पोलीस आयुक्त हे या कक्षाचे अध्यक्ष असतील, तसेच जिल्हा समाजकल्याण अधिकारी सदस्य, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी हे सदस्य सचिव असणार आहेत. पोलीस निरीक्षक आंचल मुदगल यांच्यावर या कक्षाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे पोलीस विभागाने काढलेल्या आदेशात नमूद केले आहे.

# महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या निषेधार्थ येवल्यात तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**येवला : प्रतिनिधी**

**बदलापूर आणि इतरत्रही झालेल्या महिलांवरील अत्याचारांच्या विरोधात येवला तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.**




महाराष्ट्र राज्य राष्ट्र सेवा दल, समता प्रतिष्ठान, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, छात्र भारती आदी संघटनांच्या वतीने महिलांवरील अत्याचाराच्या विरोधात काल भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. तथापि येवला शहर पोलिसांनी मोर्चाला परवानगी नाकारल्यामुळे महाविद्यालयीन मुली, शिक्षिका आणि समाजातील सामाजिक कार्यकर्त्या महिला आणि पुरुषांनी येवला तहसील कार्यालयासमोर सुमारे दोन तास धरणे धरली. नारी नही चिंगारी है, हम भारत की नारी है,या सरकारचं करायचं काय खाली डोकं वर पाय, जिथं जळते बाई, तिथं संस्कृती नाही, निरागस मुलींवर बलात्कार करणाऱ्या नराधमांना फाशी द्या! फाशी द्या !! अशा घोषणांनी हा परिसर दणाणून सोडला.

बालिका, कुमारीका, तरुणी, डॉक्टर्स, नोकरी करणाऱ्या तरुण मुली आणि महिला तसेच वयोवृद्ध महिलांवरही बलात्कार- अत्याचार करणाऱ्या लिंगपिसाट विकृतांना ताबडतोब फाशी देण्याची मागणी यावेळी प्रामुख्याने करण्यात आली. महिलांवरील अत्याचार हा अक्षम्य गुन्हा आहे. त्याला कोणत्याही परिस्थितीत माफी देणे हा त्यापेक्षाही मोठा गुन्हा आहे.

मुली आणि महिलांच्या सुरक्षेला राज्याने सर्वत्र प्राधान्य देणे आवश्यक आहे. राज्यात शाळकरी मुलींपासून तर सर्वच क्षेत्रातील महिला असुरक्षित असल्याची भावना सर्वांच्या मनामध्ये दहशत निर्माण करीत आहे, ही गोष्ट छत्रपती शिवराय, फुले-शाहू- आंबेडकर, साने गुरुजी, माँसाहेब जिजाऊ, सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर यांच्या महाराष्ट्राला मान्य नाही, अशीही भाषणे या धरणे आंदोलनात सहभागी झालेल्या मुलींनी तहसीलदार आबा महाजन यांच्यासमोर केली.

याप्रसंगी बहुद्देशीय महिला परिवर्तन केंद्राच्या संस्थापक सुधाताई पाटील, दिनकर दाणे, प्रा. अर्जुन कोकाटे, रामनाथ पाटील, उत्तम बंड, बाबासाहेब कोकाटे, आदिती सोनवणे, ऋतुजा घोटेकर, तृप्ती मढवई, समृद्धी कोकाटे, ज्ञानेश्वरी मढवई, वैष्णवी मढवई, साक्षी मेथे, दिपाली मगर, कोमल कोंढरे, साक्षी शेळके, दर्शना ससाने, ललिता बोठे, निकिता पवार, दिव्या शिंपी आदींसह तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गिरणा धरण शंभर टक्के भरण्याच्या मार्गावर!

**पळाशी : वार्ताहर**

**येथूनच जवळ असलेल्या गिरणा धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होत असून, गिरणा खोऱ्यात पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसामुळे नांदगाव तालुक्यातील गिरणाडॅम धरणात आवक वाढली आहे. गिरणा धरण ७५ टक्के भरले असून, सोमवार २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी १४७३० दशलक्ष घनफूट पाणीसाठा निर्माण झाला आहे. गिरणा धरण ७५टक्के भरल्याने नांदगाव ५६ खेडी, न्यायडोंगरीसह मालेगाव व जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, भडगाव, पाचोरा, जळगाव, एरंडोल या तालुक्यांतील गावे यांसह नदीकाठचे गावे पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी अवलंबून आहे. गिरणाडॅम धरण पूर्ण भरण्याच्या मार्गावर असल्याने गिरणा धरण खोऱ्यातील व परिसरातील नागरिकांत आनंदाचे वातावरण आहे.**

गिरणा खोऱ्यात व पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे कसमा पट्ट्यातील धरणे भरलेली असल्याने नांदगाव तालुक्यातील गिरणाडॅम धरणात ३५ हजार ते ४० हजार क्यूसेक पाणी आवक चालू आहे. २६ ऑगस्ट रोजी सायंकाळपर्यन्त गिरणा डॅम धरणात ७५ टक्के पाणीसाठा निर्माण झाला आहे. गिरणा डॅम धरणात पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे ही आवक बघता गिरणा डॅम धरणाच्या द्वार परिचालन तक्त्यानुसार माहे ऑगस्ट ९० टक्के पाणीसाठा करणे क्रमप्राप्त ठरते. त्यानुसार गिरणा धरणात होणारी आवक लक्षात घेता गिरणा डॅम धरणाचे पुराचे पाणी नदी पात्रात सोडण्यात येईल. खबरदारी म्हणून गिरणा नदी काढच्या गावांना सुरक्षितेच्या दृष्टीने नदीपात्रात पाणी सोडण्याचा अगोदर पूर्वसूचना देण्यात याव्यात. सतर्कतेचा इशारा देण्यात यावा, असे पत्र कार्यकारी अभियंता गिरणा पाटबंधारे विभागाने दिले आहे.

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, एरंडोल, धरणगाव, भडगाव, पाचोरा या तालुक्यासह नदीकाठचे गावे गिरणा नदीवर पिण्याच्या व शेतीच्या पाण्यासाठी अवलंबून आहे. गिरणा धरणावर अवलंबून असलेल्या गावांना पाणी टंचाई निर्माण झाली होती. उष्णतेची तीव्र दाहकता लक्षात घेता, या गावांना पिण्याची, पाणीटंचाई जाणू लागली. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत होती. गिरणा धरणातून आवर्तन सोडण्यात यावे, ही मागणी जोर धरू लागली होती.

## परिसरातील नागरिक आनंदित!



### गिरणा धरण मालेगाव, नांदगाव तालुक्यांच्या उशाशी, मात्र पाण्यावाचून उपाशी

अशी गत या तालुक्यांची झाली आहे. अनेक शेतकरी व कुटुंबे विस्थापित झाली. मात्र नांदगाव तालुक्याला म्हणावा तितका फायदा झाला नाही. उलट जळगाव, धुळे या खान्देश जिल्ह्यांना शेती सिंचनासाठी व पाणी पिण्यासाठी गिरणा धरण वरदान ठरले आहे. हे नक्की!

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिका, नांदगाव शहर, ५६ खेडी योजना, न्यायडोंगरी तसेच जळगांव जिल्ह्यातील चाळीसगांव, तालुक्यातील गावे व पाचोरा, भडगाव, जीवन प्राधिकरणाच्या दोन योजना एरंडोल तालुक्यातील १५४ गावांच्या पाणीपुरवठा योजना अवलंबून आहे. मागील वर्षी पावसाळा ऋतूत कमी प्रमाणात पाऊस पडला होता.

कळवण पट्ट्यातील मोसम नदी खोऱ्यातील पडलेला पावसाने गिरणा धरण जेमतेम ५७ टक्के पर्यंत भरले. ५२ वर्षांत १२ वेळा गिरणा धरण भरले. त्यात सलग चार वर्षे ओव्हरफ्लो झाले आहे.

नासिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यात गिरणा धरण बांधकाम सन१९५५ ते १९६७ दरम्यान करण्यात आले आहे. परंतु ताबा जळगांव जिल्हापाटबंधारे विभागाकडे आहे. धरण बांधल्यापासून १२ वेळेस ओव्हरफ्लो झाले आहे. चार वर्षांपासून गिरणा धरण हे १०० टक्के भरत आहे.

**पाणीटंचाई दूर करा**

गिरणा डॅम धरणातून नांदगाव शहरासह ५६ खेडी तसेच तालुक्यातील साकोरा या गावांना आत्ता तरी पाणीपुरवठा वेळेवर होणार का, पाणीटंचाई दूर करा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# खासगी क्लासचालकाचे घर पेटविण्याचा प्रयत्न; गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

उपेंद्रनगर येथील अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या खासगी क्लासचालकाचे घर मध्यरात्रीच्या सुमारास ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अंबड पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, अंबड पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्ह्यातील आरोपी कृष्णा दहीभाते (वय ३२, रा. ज्ञानेश्वरी क्लासेस, उपेंद्रनगर, सिडको, नवीन नाशिक) याच्या राहत्या घरावर सात ते आठ अनोळखी इसमांनी दगडफेक करून वात लावलेल्या काचेच्या बाटल्यांत काही तरी ज्वलनशील द्रव्य टाकून त्या बाटल्यांची वात पेटवून कृष्णा दहीभाते याच्या घरावर फेकून त्याचे घर पेटविण्याचा प्रयत्न केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर अंबड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन खात्री केली असता तेथे जमलेल्या नागरिकांनी सांगितले की, दहीभाते याच्या घरासमोर आलेल्या सात ते आठ लोकांनी वात पेटलेल्या बाटल्या घरावर फेकल्या व ते तेथून पळून गेले. दरम्यान, विनयभंगाचा प्रकार घडल्यानंतर आरोपी कृष्णा दहीभाते याच्या घरातील सर्व सदस्य हे घरातून बाहेरगावी निघून गेल्याची माहिती घरातील लोकांकडून मिळाली. दरम्यान, अज्ञात सात ते आठ लोकांनी दहीभाते याचे घर पेटवून देण्याचा प्रयत्न करून मोठमोठ्याने शिवीगाळ व आरडाओरडा करून परिसरात दहशत निर्माण करणारी कृत्य केल्याप्रकरणी सात ते आठ अज्ञात लोकांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कुसुमाग्रज विद्यालयात विद्यार्थिनींचे समुपदेशन



**पंचवटी : वार्ताहर**

मुलींची सुरक्षा आणि सशक्तीकरण संदर्भात समुपदेशन शाहू शिक्षण संस्था पंढरपूर संचलित कुसुमाग्रज प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात मुलींची सुरक्षा आणि सशक्तीकरण याबाबत समुपदेशन करण्यात आले.

यावेळी मुलींना सुरक्षिततेविषयी माहिती देण्यासाठी आडगाव विभागातील दामिनी पथकातील पोलीस शिपाई धात्रक, एस.एन. सोनवणे, तसेच पंचवटी विभागाच्या निर्भया पथकातील मीना पवार, एम. एफ. महाले, एस.के.महाले उपस्थित होत्या. यावेळी शाळेतील इयत्ता तिसरी ते दहावीतील विद्यार्थिनींना गुड टच आणि बॅड टच या संदर्भात प्रात्यक्षिक स्वरूपात माहिती देण्यात आली. तसेच मुलींनी स्वतःची सुरक्षा कशी करावी. याविषयी समुपदेशन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका एस. के. पवार, समन्वयक जे. आर. गवंडर, सहशिक्षिका अश्विनी जावळे, वैशाली अडसरे, मनीषा बोरसे, मनीषा, चारुशीला बैरागी आदी उपस्थित होत्या.

# पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

कापड्याचा व्यवसाय करण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये आणले नाहीत म्हणून तगादा लावत विवाहितेचा छळ करून तिच्या अंगावरील स्त्रीधन काढून घेतल्याने अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी यांचे माहेर सिडकोत असून, ही विवाहिता २५ फेब्रुवारी २०२२ ते ५ एप्रिल २०२४ या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे नवीन पोपट गल्ली येथे सासरी नांदत होती. शहादा येथे तिच्या पतीचे श्याम कलेक्शन नावाचे कपड्याचे दुकान आहे. पीडितेच्या पतीसह सासरच्या पाच जणांनी संगनमत करून कपड्यांचा व्यवसाय करण्यासाठी विवाहितेच्या वडिलांकडे पाच लाख रुपयांची मागणी केली; मात्र विवाहितेने ती मागणी पूर्ण केली नाही, तसेच विवाहितेच्या आईवडिलांनी लग्नात दिलेले सोन्याचे गंठण, सोन्याचा नेकलेस व कर्णफुले असे स्त्रीधन काढून घेत सासरच्यांनी ताब्यात घेतले. विवाहितेला मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शेख करीत आहेत.

## महत्त्वाचे

### मखमलाबाद विद्यालयात विद्यार्थिनींसाठी कार्यशाळा



**पंचवटी :** मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नाशिक शहरी विभाग आरोग्य केंद्रातर्फे विद्यार्थिनींची ''सुरक्षा व आरोग्य'' याविषयी कार्यशाळा झाली. पंचवटी शहरी विभाग आरोग्य केंद्राच्या डॉ. अश्विनी कुशारे, मखमलाबाद आरोग्य केंद्राच्या डॉ. स्मिता देवडे, डॉ. रेवती काळे यांचे विद्यालयाचे प्राचार्य संजय डेर्ले यांनी स्वागत केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य राजेंद्र गाडे, ज्येष्ठ शिक्षिका भाग्यशाली जाधव, सुनीता उशीर उपस्थित होते. प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षिका सुनिता उशीर यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी पाहुण्यांचा परिचय व कार्यशाळेचा उद्देश सांगितला. डॉ.अश्विनी कुशारे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यालयातील इयत्ता सातवी, आठवीच्या विद्यार्थिनी कार्यशाळेत सहभागी झाल्या. मुलगी वयात येते तेव्हा तिच्या शारीरिक, मानसिक, भावनिक वागण्यात बदल होतात. हे सर्व बदल आपण समजून घ्यावे. हार्मोन्सची पातळी कमी जास्त होण्याची लक्षणे, मासिक पाळीत घ्यावयाची काळजी, योग्य आहार, वैयक्तिक स्वच्छता याविषयी विद्यार्थिनींना माहिती दिली. तसेच ''गुड टच, बॅड टच'' याविषयी कल्पना दिली. विद्यार्थिनींनी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेऊन प्रश्नोत्तरांद्वारे शंकांचे निरसन केले. कार्यशाळेचा विद्यार्थिनींना लाभ झाला. सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षिका सुनिता उशीर तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षिका भाग्यशाली जाधव यांनी केले.

### बदलापूर घटनेचा काँग्रेसतर्फे निषेध



**सिडको :** बदलापूर येथील घटनेचा नाशिक जिल्हा महिला काँग्रेसतर्फे दिंडोरीतील ग्रामस्थ व महिला यांच्या वतीने निषेध नोंदवून अशी घटना परत घडू नये यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत व घडलेल्या घटनेबाबत जे आरोपी आहेत त्यांना फाशीची शिक्षा व्हावी, अशा मागणीचे नाशिक जिल्हा महिला काँग्रेसच्यावतीने जिल्हाध्यक्ष वंदना पाटील यांनी दिंडोरी तहसीलदार मुकेश कांबळे यांना लेखी निवेदन दिले. बदलापूर येथील घटनेचा सर्वत्र निषेध होत असताना नाशिक जिल्हा महिला काँग्रेसच्या वतीने माणुसकीला काळिमा फासणाऱ्या संतापजनक घटनेचा तीव्र निषेध करत या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये असे यासाठी शासनस्तरावर कायदा करून ही केस फास्टट्रॅक कोर्टात चालवून यातील संबंधित संशयित आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी याबाबतचे निवेदन देण्यात आले. अशा मागणीचे निवेदन दिंडोरी तालुक्याचे तहसीलदारांना देण्यात आले. यावेळी दिंडोरी तालुकाध्यक्ष ललिता खांडवी, निर्मला काळोखे, सुवर्णा वरगडे, शैला मोरे, भारती बोंबले, सुनंदा गुंबाडे, संगीता लिसाडे, सुमन जाधव, सरला बेंडकुळी आदी उपस्थित होते.

### स्मिता मुळाणे यांचा गौरव



**पंचवटी :** मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील उपशिक्षिका स्मिता नरेंद्र मुळाणे (गरड) यांनी ३ बाय ३ से.मी. साईजच्या कागदावर श्री छत्रपती संभाजी महाराज यांचा जीवनप्रवास २४ वारली चित्रांद्वारे अवघ्या ३२ मिनिट ४१ सेकंदांत पूर्ण केला. त्यांच्या या कलाकृतीची नोंद ''वर्ल्ड वाइड बुक ऑफ रेकॉर्ड्स'' यांनी घेतली आहे. त्यांच्या या जागतिक विक्रमाबद्दल मविप्र मखमलाबाद संकुलाच्या वतीने संचालक रमेश पिंगळे, प्रकाश सोनवणे (कर सल्लागार ) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मविप्र नाशिक संस्थेने समाजदिनाच्या मुख्य कार्यक्रमात खासदार शोभा बच्छाव यांच्या हस्ते व खासदार सुप्रिया सुळे, खा. राजाभाऊ वाजे, खा. भास्कर भगरे, मविप्र संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला. यावेळी सभापती बाळासाहेब क्षिरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती डी.बी.मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक रमेश पिंगळे, डॉ.प्रा. अशोक पिंगळे, प्राचार्य डेर्ले, उपप्राचार्य राजेंद्र गाडे, स्कूल कमिटी सदस्य, शिक्षकवृंद, ग्रामस्थ, आप्तेष्ट, मित्र परिवार आदी उपस्थित होते.

### बाळासाहेब घुगे यांना राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार



**सिडको :** अहिल्यानगर येथे दुसरे वंजारी समाज साहित्य संमेलन पार पडले. राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्यरत्न पुरस्कार सामाजिक व राजकीय क्षेत्रात तसेच दिव्यांग बांधवांसाठी करत असलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे उत्तर महाराष्ट्र प्रभारी बाळासाहेब घुगे यांना देण्यात आला. यावेळी अहमदनगर जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले, आमदार संग्राम जगताप, वंजारी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश खांडे, कवी व लेखक वा.ना.आंधळे, संमेलन अध्यक्ष संगीता घुगे, ज्येष्ठ उघोगपती बुधाजी पानसरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी दैनिक वंजारी पुकारचे दत्ता जायभाये, दैनिक अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे, बाळासाहेब फड यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संमेलन अध्यक्ष राजकुमार आघाव यांनी प्रास्ताविक केले तर आभार स्वागत अध्यक्ष मल्हारी खेडकर यांनी मानले.

# वृक्ष संगोपनाची जबाबदारी महत्त्वाची : प्रकाश दुबे

## केशर आंब्याचे रोपटे वितरणप्रसंगी प्रतिपादन

**मांजरगाव : वार्ताहर**

**आज पर्यावरणाचं रक्षण करणे हे आपल्यासह सर्वांचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. कारण मानवाने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केल्यामुळे पर्यावरणाचा पूर्णपणे समतोल बिघडला आहे. निसर्गाचा ''कराल तसे भोगाल'' या नियमानुसार असमतोलाचे मानवालाही विपरीत परिणाम भोगावे लागत आहेत. या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आमची हरीतसेना सेवाभावी संस्थांकडून मिळालेल्या झाडांचे रोपण व संवर्धन करण्याचे काम करत आहे.**



दरवर्षी पावसाळ्यात झाडांची लागवड सर्वत्र केली जाते. मात्र, संगोपनाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. यासाठी प्रत्येक निसर्गप्रेमींनी एक तरी झाड लावून पूर्णपणे वाढेपर्यंत संगोपन केले पाहिजे, असे मत ग्रीन फोर्सचे प्रमुख सुभाष शिंदे यांनी व्यक्त केले.

अरण्यानी बायो कन्झर्वेशन सोसायटी आणि ग्रीन फोर्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योगपती प्रकाश दुबे यांनी दिलेल्या १५० केशर आंब्याचे मोफत वाटप आरूढ विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, पालकांना केले. यावेळेस ते बोलत होते. दुबे यांनी वृक्षसंवर्धन करण्याचे आवाहन केले. यावेळी एक लक्ष वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला. सूत्रसंचालन देवराम खेताडे यांनी केले तर आभार बाळासाहेब अडसरे यांनी मानले.

### कार्यक्रम यशस्वीतेसांठी यांनी घेतले परिश्रम

यापसंगी आरूढ विद्यालयाचे प्राचार्य सुभाष शिंदे, प्रकाश दुबे, आनंद सरोदे, शरद पारधी, अरण्यानी पदाधिकारी व ग्रीन फोर्सचे सदस्य उपस्थित होते. गणेश वाघ, बाळासाहेब अडसरे, गोविंद शिंदे, कांतिलाल वागळे, देवराम खेताडे, गंगाधर आघाव, मनोज दराडे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

# वर्कर स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे सन्मान महाराष्ट्राचा गुणवंतांचा कार्यक्रम

**इंदिरानगर : वार्ताहर**



वर्कर स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य गौरव पुरस्कार यांच्या वतीने सन्मान महाराष्ट्राचा गुणवंतांचा या कार्यक्रमाचे आदित्य हॉल येथे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे नाशिक पश्चिमच्या आमदार सीमा महेश हिरे, छत्रपती पुरस्कार विजेता राजेंद्र निंबळते, माजी नगरसेविका पुष्पा साहेबराव आव्हाड, साहेबराव महाले, जितेंद्र चोरडीया, सुश्मिता लांडगे, नलिनी दराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार देण्यात आला. सिम्बायोसिस स्कूलच्या मुख्याध्यापिका लीना चक्रवती, सेंट फ्रान्सिस स्कूलच्या मुख्याध्यापिका मंजू पाटील, पोतदार स्कूलच्या नीता जॉनथन, लिटूल मिलेनियमच्या डिंपल संकलेचा तसेच देवळाली कॅम्प येथील दर्शन अकॅडमीच्या उर्मिला शर्मा यांना वर्कर स्पोर्ट असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने पुरस्कार देण्यात आले. यावेळी संदीप युनिव्हर्सिटीचे प्रशांत रेगे, राहुल नरवाडे, बी.डी. पाटील, सिक्रेट हार्टचे गणेश राऊत, ठाणे येथील मारुती हजारे, पोतदार इंटरनॅशनलचे गणेश कलुंगन, सोलापूर ज्युनिअर कॉलेजचे नेताजी सोपान पवार, रवींद्र चव्हाण, अथेलेटिक मंगेश राऊत, नवीन मुंबईचे अंकित झारे, पुणे येथील योगेश तडवी आदी खेळाडूंचा प्रमाणपत्र देवून सत्कार केला. उत्तम उघाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### युवकाची आत्महत्या

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

विजयनगर परिसरातील दत्त चौकात राहणाऱ्या तरुणाने राहत्या घरातच पंख्याच्या हुकाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

यशराज राजेंद्र शेंडगे (वय २२, रा. दत्त चौक, विजयनगर, सिडको) याने सहा वाजेच्या सुमारास राहत्या घरातील बेडरूममध्ये असलेल्या पंख्याच्या हुकाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब त्यांच्या शेजारी राहणाऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी यशराजला औषधोपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# दारूच्या नशेत जन्मदात्या बापाने केला अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

कपडे धुण्यास उशीर झाल्याच्या कारणावरून जन्मदात्याने अकरावीत शिकणाऱ्या स्वतःच्या मुलीला शिवीगाळ व अंगलट करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अंबड पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, पीडित मुलगी ही अल्पवयीन असून, आरोपी हे तिचे वडील आहेत. पीडिता मुलगी ही महाविद्यालयास सुटी असल्यामुळे घरी होती. ती कपडे धूत होती. त्यावेळी तिचे वडील दारू पिऊन घरी आले. त्यांनी पीडितेला कपडे धुण्यास उशीर झाल्याच्या कारणावरून प्रथम शिवीगाळ व मारहाण केली. पीडितेने प्रतिकार केला असता त्यांनी तिच्याशी अंगलट करून तिला मिठी मारली व शारीरिक संबंध ठेवण्याची मागणी केली. असे केले नाही तर तुला जिवे ठार मारून टाकीन, अशी धमकी दिली. त्यानंतर भेदरलेल्या मुलीने कंपनीत कामाला गेलेल्या आईला फोन करून घरी बोलावून घेत झालेला प्रकार कथन केला. त्यानंतर पीडितेने तिच्या आईसह अंबड पोलीस ठाण्यात धाव घेत जन्मदात्याविरुद्ध विनयभंगाची फिर्याद दिली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात बापाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास अंबड ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पाडवी करीत आहेत.



# नानेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी ज्ञानेश्वर शिंदे

**नाशिक : प्रतिनिधी**

नानेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी ज्ञानेश्वर शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. त्यांच्या या निवडीचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

ते प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष शरद शिंदे यांचे बंधू असून, त्यांच्या निवडीवेळी संजय आडके प्रमोद आडके, व्ही.डी. आडके, भानुदास शिंदे, प्रशांत बोंबले, अशोक सखाराम आडके, राजाराम शिंदे, संजय काळे, विलास आडके, भारती शिंदे, आशा मोरे, संदीप रोकडे, भाऊसाहेब चौधरी, भाऊसाहेब शिंदे, संदीप शिंदे, विजू काळे, दिनकर शिंदे, विलास आडके आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# आश्वासन देऊनही अल्फ इंजिनिअरिंगचे अतिक्रमण 'जैसे थे'च

## सामाजिक कार्यकर्ते संतोष शर्मा यांनी केले दुसऱ्यांदा बेमुदत उपोषण

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**अंबड औद्योगिक वसाहतीतील अल्फ इंजिनिअरिंग कंपनीचे सुमारे ३० कोटी रुपयांचे अनधिकृत व बेकायदेशीररीत्या केलेले अतिक्रमण काढण्याचे आश्वासन देऊनही अद्याप अतिक्रमण जैसे थेच राहिल्याने सामाजिक कार्यकर्ते संतोष पी. शर्मा यांनी पुन्हा सोमवारी एमआयडीसी कार्यालयाबाहेर उपोषणाला सुरुवात केली. महिनाभरापूर्वी कंपनी व्यवस्थापनाने अतिक्रमण काढण्याचे आश्वासन दिले होते.**



> संपूर्ण एमआयडीसीत उपोषणकर्त्यांकडून आम्हालाच जाणीवपूर्वक टार्गेट केले जात आहे. असे असताना आम्ही केलेले अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे काम सुरू केले होते. मात्र, पावसामुळे एखादी दुर्दैवी दुर्घटना घडू नये यासाठी काम थांबवले आहे.
> **– रमेश नायर,** सरव्यवस्थापक, अल्फ इंजि.

> कंपनीचे अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत एमआयडीसी महामंडळामार्फत प्रशाकीय पूर्तता करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
> **– जयवंत पवार,** कार्यकारी अभियंता, एमआयडीसी

दरम्यान, अतिक्रमणाला पाठीशी घालणारे कार्यकारी अभियंता जयंत पवार यांना बडतर्फ करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

अंबड औद्योगिक वसाहतीतील प्लॉट नंबर इ-६०, ६१, ६२, बी -८२, बी-६, एच-२५ मध्ये अल्फ इंजिनिअरिंग कारखान्याचे सात कारखाने आहे. कंपनीने अनेक ठिकाणी पक्के स्वरूपाचे अतिक्रमित बांधकाम केले आहे. याविरोधात शर्मा यांनी अनेकदा पत्रव्यवहार केला आहे. मात्र, त्या पत्राला एमआयडीसी विभागाने केराची टोपली दाखवली आहे. वारंवार पत्रव्यवहार करूनही दाद मिळत नसल्याने महिनाभरापूर्वी शर्मा यांनी उपोषणाचे हत्यार उपसले होते.

दरम्यान, शर्मा यांच्या आंदोलनाची दखल घेत एमआयडीसी विभागाने कंपनीविरोधात कार्यवाही करण्यास सुरुवात केली असता, कंपनीने स्वतःहून अतिक्रमण काढत असल्याचे एमआयडीसीला कळवले होते. त्यामुळे शर्मा यांनी त्यांचे उपोषण स्थगित केले होते.

दरम्यान, महिना उलटूनही अद्याप अल्प इंजिनिअरिंगने अतिक्रमण न काढल्याने शर्मा यांनी पुन्हा बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

# ऐन पावसाळ्यात कांदानगरीत पाणीबाणी

## लासलगावसह १६ गाव पाणीपुरवठा योजनेच्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित

**लासलगाव : वार्ताहर**

**लासलगाव सह १६ गाव पाणीपुरवठा योजनेला पुन्हा एकदा घरघर लागली असून या योजनेचे वीजबील थकल्याने जोपर्यंत थकीत रक्कम भरली जात नाही तोपर्यंत पाणीपुरवठा सुरु होणार नसल्याने लासलगावकरांना ऐन पावसाळ्यात भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.**

सध्या लासलगाव ग्राम पंचायतची घरपट्टी पाणीपट्टी जागे भाडे यामुळे साडेतीन कोटी रुपये थकीत आहे त्यात १६ गाव पाणी योजनेचे बिल थकलेले आहे शिवाय जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे सत्तावीस लाख रुपये येणे बाकी आहे यामुळे जोपर्यंत लासलगावकर जनता थकबाकी भरत नाही तोपर्यंत पाणीपुरवठा सुरू करण्यात अडचणी निर्माण होणार आहे.

सध्या जिल्ह्यामध्ये वरून राजा प्रसन्न असल्यामुळे पाऊस जोरदार पडत आहे जिल्ह्यातील प्रमुख धरणातून नांदूर मधमेश्वर मार्गे पन्नास हजार क्युसेक्स पाणी जायकवाडी धरणात जात आहे मात्र योजना लाभार्थी धरण जवळ असूनही पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

सोळा गाव पाणी पुरवठा योजनेचा आठ ते दहा दिवसापासून वीज पुरवठा खंडित केल्याने लासलगाव शहराला होणारा पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे दोन दिवसात थकबाकीची काही रक्कम भरून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असे लासलगावचे सरपंच अफजल शेख म्हणाले.

**लासलगावची पाणीटंचाई कधी थांबणार..?.**

लासलगाव सह १६ गाव पाणीपुरवठा योजनेचे कोणत्या ना कोणत्या मार्गाने पाणीटंचाई निर्माण होते पाईपलाईन फुटणे,वीज पुरवठा वारंवार खंडित होणे, थकबाकी पोटी विजपुरवठा बंद करणे, पूरस्थितीत असताना पाणी जॅकवेल पर्यंत न येणे अशा अनेक कारणामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून यामुळे पाणीटंचाईला लासलगावकर सामोरे जात आहे.या कामी पाणीटंचाई संदर्भात सरपंच अफजल शेख,माजी जि प सदस्य डी के नाना जगताप, उपसरपंच रामनाथ शेजवळ यांनी मंत्री छगन भुजबळ यांचे स्वीय सहाय्यक सुनील पैठणकर यांची भेट घेऊन पाणीटंचाई संदर्भात चर्चा केली

# मालेगाव महापालिकेतील १५ अधिकारी, कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचार प्रकरणी गुन्हा दाखल

**नाशिक: प्रतिनिधी**

**मालेगाव महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष कामावर झालेला खर्च आणि कामे तपासून पाहणे ही प्रशासकीय जबाबदारी असतांना जाणीवपूर्वक टाळुन ठेकेदाराला २० लाख ६८ हजार ६०७ रुपये अदा करुन आर्थिक नुकसान केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मालेगाव महानगरपालिकेच्या १५ अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

या कारवाईबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सांगितले की, संशयित आरोपींची पदाचा व अधिकारांचा दुरूपयोग करून त्यांना नेमुण दिलेले काम न करता बी. वाय. शाह फर्मचे ठेकेदार सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली शाह यांना त्यांनी केलेल्या कामाचे मुल्यमापन न करता शासन निधीचा योग्य प्रकारे सुविनीयोग होण्यासाठी प्रत्यक्ष कामावर झालेला खर्च आणि कामे तपासुन पाहणे ही आरोपीतांची प्रशासकीय जबाबदारी असतांना ती जाणीवपुर्वक टाळली.

देयकांची रक्कम बी. वाय. शहा फर्मचे ठेकेदार सोहेल अब्दुल रहेमान मासुमअली शहा यांना अदा करून गुन्हेगारी वर्तन करून स्वतःचा आर्थिक फायदा करून शासनाचे तसेच मालेगांव महानगर पालिकेच्या निधीतील रक्कम रू. २०,६८,६०७/- रुपयाचे आर्थिक नुकसान (अपहार) केल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न होत आहे. तरी प्रस्तुत प्रकरणात

शहर अभियंता कैलास बच्छाव,सेवानिवृत्त तत्कालीन कनिष्ठ अभियंता मुरलीधर देवरे,संजय जाधव, सेवानिवृत्त उपअभियंता राजेंद्र बाविस्कर, खाजगी व्यक्ती सोहेल रहेमान, दिनेश जगताप,नीलेश जाधव, तत्कालीन सेवानिवृत्त लेखा परीक्षक अशोक म्हसदे, सुहास कुलकर्णी,कमरुदिन शेख, सुनील खडके, मधुकर चौधरी, उत्तम कावडे, केदा भामरे, कृष्णा वळवी,राजाराम बच्छाव यांचेविरूध्द

गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे निरीक्षक नितीन पाटील यांनी फिर्याद दिली. अधिक तपास अधीक्षक शर्मिष्ठा घारगे, वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र सानप करीत आहेत

## पुण्यात पावसाचा जोर वाढला

**पुणे :** हवामान विभागाने राज्याच्या सर्वच भागात पावसाचा जोर कमी होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला असला तरीही सायंकाळपासून पुणे शहरात पावसाचा जोर वाढला आहे. रात्री नऊ वाजल्यापासून अकरा वाजेपर्यंत पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. संतधार पाऊस, खडकवासला धरण साखळीतून नदीत सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे नदीपात्रातील रस्ते बंद आहेत. शिवाय शहराच्या विविध चौकांमध्ये मंगळवारी होणाऱ्या दहीहंडी उत्सवाच्या तयारी सुरू असल्यामुळे पुणेकरांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

शहर आणि परिसरात संततधार पावसामुळे रस्त्यांवरून पाणी वाहत होते. सकल भागात पाण्याची तळी साचली आहेत.

पान नं. १ वरून...

## छत्रपती शिवाजी महाराज यांचा कोसळला

### ठेकेदारांवर गुन्हा दाखल करणार

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला पुतळा कोसळल्यानंतर राजकीय वातावरण तापलं आहे. ह्या पुतळा उभारणीचं कॉन्ट्रॅक्ट ठाण्यातील व्यक्तीला देण्या आलं होतं, अशी माहिती खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विटरवरुन शेअर केली आहे. त्यामुळे, राजकीय आरोप प्रत्यारोप होऊ लागले आहेत. आता, ह्या पुतळ्याची माहिती देताना, हा पुतळा नौदलाने उभारला असून त्याच्या देखभालीचं कामही त्यांच्याकडे होते, असे सिंधुदुर्गचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी म्हटले आहे.

शिवरायांचा हा पुतळा नौदलाच्या अखत्यारीत येतो, त्यांनीच या पुतळ्याची उभारणी केली होती. यासंदर्भात मेसर्स आर्टीस्ट्री नावाच्या कंत्राटीला काम देण्यात आले होते. जयदीप आपटे हे कंपनीचे प्रोप्रायटर आहेत, तर केतन पाटील स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून काम पाहत होते. समुद्र किनारी असलेल्या शिवरायांच्या पुतळ्याला गंज लागत असल्याचेही निदर्शनास आले होते.

त्यानंतर २० ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागानं पत्र लिहून नौदलाच्या निदर्शनास आणून दिले होते. याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल व्हावा, यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण मालवण पोलीस ठाण्यात दाखल झाल होते.

**निकृष्ट बांधकामामुळे पुतळा कोसळला**

दरम्यान, भाजपाच्या नेत्यांनी सातत्याने राजकारणासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा वापर केला आणि मते घेतली, पण नेहमी छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि महाराष्ट्राचा अपमान केला आहे. निकृष्ट बांधकामामुळे राजकोट किनाऱ्यावरील पुतळा कोसळला आहे. महाराजांच्या पुतळ्याच्या कामातही भ्रष्टाचार करणाऱ्या या लोकांना महाराष्ट्राची जनता कदापी माफ करणार नाही, असं काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी म्हटलं आहे.

**या घटनेची चौकशी होईल - मंत्री दीपक केसरकर**

मला या घटनेची माहिती नाही. जर हे घडलं असेल तर अतिशय दुर्दैवी आहे. आमचे पालकमंत्री हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री असल्याने ते या सर्व प्रकाराची चौकशी करतील याची खात्री आहे. चौकशी होईलच परंतु हा पुतळा त्वरित उभा करण्यास प्राधान्य असेल. त्यासाठी जे काही तातडीने करायला हवं ते आमचे सरकार करेल, अशी प्रतिक्रिया मंत्री दीपक केसरकरांनी दिली.

## काँग्रेस, ठाकरे गटात जागांवरून मतभेद

आपला दावा सांगितला आहे. सुत्राच्या माहितीनुसार २०१९ ला महाविकास आघाडीतील पक्षांनी जिंकलेल्या जागा सोडून इतर १६ जागांवर अजूनही काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना ठाकरे गट यांच्यात चर्चा सुरू आहे. मात्र काही जागांवर तिन्ही पक्षांनी तर काही जागांवर दोन पक्ष दावा केल्याने मुंबईतील जागांवर पेच निर्माण झालाय. त्यामुळे आजची बैठकी न फॉर्म्युला ठरवता संपवण्यात आलीय. मुंबईतील वादात असलेल्या जागांचा निर्णय आता काँग्रेस हाय कमांड सोडवतील. अशी भूमिका राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांनी महाविकास आघाडीच्या इतर घटक पक्षातील नेत्यांकडे मांडलीय. मुंबईतील प्राथमिक चर्चेनंतर अंतिम चर्चा दिल्लीतील काँग्रेसचे वरिष्ठ नेते करतील आणि ते आम्हाला मान्य असेल अशी काँग्रेस नेत्यांची भूमिका स्पष्ट केलीय. तर मुंबईतील जागांबाबत कोणतीही अडचण येणार नाही. आगामी एक ते दोन बैठकांमध्ये मुंबईचा निर्णय पूर्ण होईल, असा महाविकास आघाडीतील नेत्यांना विश्वास असल्याची माहिती सुत्रांनी दिली

## रशियाचा युक्रेनवर मिसाईल हल्ला

दिसून येतंय. युक्रेनियन हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, रशियन ड्रोनचे अनेक समूह युक्रेनच्या पूर्व, उत्तर, दक्षिण आणि मध्य प्रदेशाकडे जात होते. त्यानंतर अनेक क्रूझ आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे देखील डागण्यात आलीत. हल्ल्यानंतर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी ड्रोन आणि मिसाईल हाणून पाडणारे शस्त्रे द्यावीत,अशी मागणी युरोपियन देशांकडे त्यांनी केलीय. रशियाने त्यांच्या देशावर घातक मिसाईल आणि ड्रोनने हल्ला केलाय. सोमवारी रशियाने युक्रेनवर १०० पेक्षा अधिक मिसाईल आणि १०० ड्रोनने हल्ला केल्याची माहिती झेलेन्स्की यांनी दिलीय. सुरक्षेसाठी आपण प्रयत्न करू शकतो. जर युरोपियन देशांच्या लढाऊ विमान, आमचे एफ -१६ आणि वायू सेनेसोबत आले तर रशियावर प्रतिहल्ला करू शकू असं झेलेन्स्की म्हणाले.

**रशियात आणीबाणी**

युक्रेनच्या सीमेला लागून असलेल्या कुर्स्क या रशियन प्रांतात ७ ऑगस्ट रोजी युक्रेनचे सैनिक आणि चिलखती तुकड्यांनी मुसंडी मारली. या फौजा आणि तुकड्या युक्रेनमधील सुमी शहरातून निघाल्या आणि रशियाची सीमा ओलांडून जवळपास ३० किलोमीटर आत सुझा शहराजवळ त्या पोहोचल्याची माहिती पाश्चिमात्य वृत्तसंस्थांनी दिली आहे. सध्या नेमकी स्थिती काय आहे, याविषयी तपशील उलटसुलट येत आहे. १० ऑगस्टपर्यंत कुर्स्क प्रांतातून ७६ हजार नागरिकांनी पलायन केले आणि रशियाच्या सरकारला तेथे आणीबाणी जाहीर करावी लागली. जवळपास २८ शहरे आणि गावे युक्रेनच्या ताब्यात गेल्याची कुर्स्कच्या गव्हर्नरांनीच दिली आहे. हल्ला बराचसा अनपेक्षित असल्यामुळे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याविषयी योजनाच रशियन सरकारला आखता आली नाही. एकूणच संपूर्ण युद्धात रशियन सरकारवर होत असलेल्या ढिसाळपणाच्या आरोपाला युक्रेनच्या ताज्या आक्रमणानंतर आणखी धार आली.

## लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांची घोषणा

दिशेने एक पाऊल आहे. झंस्कर, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग आता अधिक लक्ष केंद्रित करतील, सेवा आणि संधी लोकांच्या आणखी जवळ आणतील. लडाखमधील लोकांचे अभिनंदन.

**लडाखमध्ये आधी होते दोन जिल्हे**

जम्मू-काश्मीरपासून लडाख २०१९ मध्ये वेगळे करण्यात आले. त्यामुळे लडाख एक नवीन केंद्रशासित प्रदेश बनले. त्यावेळी केंद्रशासित प्रदेशामध्ये लेह आणि कारगिल हे दोनच जिल्हे होते. मात्र, आता लडाखमध्ये आणखी पाच नवीन जिल्ह्याची घोषणा करण्यात आली आहे. आता लडाखमध्ये ज़ंस्कार, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग ही नवीन जिल्हे असणार आहेत.

## गावितांनी आमच्या सोबत यावे

पाटील मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण मागत आहेत याचे आम्ही समर्थन करत नाही. आमची सत्ता आल्यास इतरांना कसे आरक्षण द्यायचे त्याचे फॉर्मुले आम्ही देऊ. जरांगे पाटलांनी हात मागे घेतला मात्र आमची ताकद कमी नाही. आगामी विधानसभा निवडणूक सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन लढणार असल्याचे त्यांनी म्हटले. दरम्यान आंबेडकर जे पी गावीत यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आले असता, मात्र त्यांनी दिलेल्या ऑफरचीच चर्चा आंदोलन स्थळी झाली. युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या छत्रपती संभाजीनगर दौऱ्याला भाजपकडून विरोध झाला असता दोन्ही बाजुकडील कार्यकर्ते आमनेसामने आले असता पोलिसांनी लाठाचार्ज केला. यावर आंबेडकर म्हणाले, पोलिसांना मी दोष देत नाही. त्यांना वरुन तसे आदेश दिले असतील. असे ते म्हणाले.




# साहित्यिक प्रा. गो. तु. पाटील यांना अभिवादन

**येवला : प्रतिनिधी**

**अनुष्टुभचे भूतपूर्व संपादक प्रा. गो. तू. पाटील यांचे १८ ऑगस्ट रोजी निधन झाले होते. या पार्श्वभूमीवर येवला शहरात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात येवुन कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मान्यवरांनी दिवंगत गो. तु. पाटील यांना आदरांजली अर्पण केली वेळी उपस्थित असलेले अनेक मान्यवर जणू आपल्या कुटुंबप्रमुखालाच गमावल्याच्या भावनांनी भावनेने वाट मोकळी करून दिली.**

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार मारोतराव पवार होते. अभिवादन सभेचे सूत्रसंचालन राष्ट्र सेवा दलाचे अध्यक्ष अर्जुन कोकाटे यांनी केले. प्रा.गो. तू. पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी महाराष्ट्रातील साहित्यिक,सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर यावेळी आवर्जून उपस्थित होते.

प्रा.गो. तू. पाटील हे येवला परिसराचे भूषण होते. आपण एका तत्वनिष्ठ, ध्येयवेड्या, शिस्तप्रिय, सहृदयी व्यक्तीमत्वास कायमचे मुकलो असा तीव्र दुःखद सूर या अभिवादन सभेत उमटला. यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ भरतकुमार सिन्हा,प्रा. डॉ. रामप्रसाद तौर, प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे, जि प सदस्य महेंद्रशेट काले, निर्मला ताई कुलकर्णी, प्रा गो.तु.पाटील यांची जेष्ठ कन्या प्रा डॉक्टर मनीषाताई निफाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

अभिवादन सभेसमोर प्रा तानाजी पाटील, डॉ.एस के पाटील, बुलढाणा येथीलज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव जवरे, कॉम्रेड भगवान चित्ते, एस व्ही निकुंभ, प्रा धनाजी धनगर, महेंद्र काले, प्राचार्य दत्तकुमार उठावळे, डॉ. जिभाऊ मोरे, सीए अजय सोमानी, सुधाताई पाटील, प्रसिद्ध कवी साहित्यिक आणि वाघुर चे संपादक नामदेव कोळी, प्राचार्य लक्ष्मण बारहाते, प्रसिद्ध साहित्यिक अमोल बागुल आदींनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. उपस्थितांमध्ये प्रा गो. तु. पाटील यांची कन्या डॉ. माधवी जवरे, शिवाजीराव जवरे, डॉ. जवरे, प्रा. भास्करराव निफाडे देवयानी गमे, रामप्रसाद वाव्हळ, युवराज बाबा, प्रा पोपटराव आहेर, सलील पाटील, चहाबाई अस्वले आदी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ग्रामपंचायत तळवाडे, ता.निफाड, जि.नाशिक.**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत तळवाडे, ता.निफाड, जि.नाशिक येथे वसंतराव नाईक (तांडा वस्ती सुधार) योजना या योजने अंतर्गत होणारी कामे, १) गवते घुगे सांगळे आव्हाड वस्ती येथे W.B.M. रस्ता तयार करणे (रु.१५,००,०००/-), व २) गवते घुगे नागरे बोडके वस्ती येथे W.B.M. रस्ता तयार करणे (रु.१३,००,०००/-). या कामांकरिता ई-निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आलेली आहे. निविदा भरण्याची दिनांक २६/०८/२०२४ ते ३१/०८/२०२४ आहे. अधिक माहिती वरील वेबसाईटवर उपलब्ध असून निविदाधारकांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत तळवाडे, ता.निफाड, जि.नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**सही/-प्रशासक** **सही/-ग्रामसेवक**

**ग्रामपंचायत तळवाडे, ता.निफाड, जि.नाशिक**

**जाहीर ई-निविदा**

**ग्रामपंचायत जातेगांव ता.नांदगाव जि. नाशिक**

**ई- निविदा सूचना क्र. ०१ सन २०२४-२५**

ग्रामपंचायत जातेगांव ता. नांदगांव जि.नाशिक यांजकडुन नोंदणीकृत मक्तेदार यांच्याकडुन सिमेंट पाईपाची भुमिगत गटार तयार करणे. रक्कम पाच लक्ष या कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदेच्या पूर्व अर्हता अटी ई-निविदा प्रक्रीयेचे सविस्तर वेळापत्रक व सविस्तर निविदा सुचना या शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २६/०८/२०२४ पासून पहाता येतील व डाऊनलोड करता येतील. कोणतीही अथवा सर्व निविदा त्यासाठी कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा हक्क ग्रामपंचायत जातेगांव ता. नांदगाव जि. नाशिक यांनी राखून ठेवला आहे

**ग्रामसेवक** **सरपंच**

**ग्रामपंचायत जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक**

**तहसिलदार निफाड यांचे कार्यालय (जि.नाशिक)**

**क्र. आरटीएस/कावि/२२०/२०२४,**
**निफाड दिनांक २६/०८/२०२४**

**जाहीर नोटीस**

**संदर्भ:- अर्जदार श्री/श्रीमती भास्करराव नामदेवराव बनकर** रा. पिंपळगांव ब. ता. निफाड जि. नाशिक यांचा दिनांक ८/८/२०२४ रोजीचा अर्ज

उपरोक्त जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **भास्करराव नामदेवराव बनकर** यांचा दिनांक **१/६/१९५६** रोजी **पिंपळगांव ब.** ता. निफाड येथे जन्म/मृत्यू झाला आहे. जन्म/मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगांव ब. ता. निफाड येथे ग्रामपंचायत रेकॉर्डला झालेली नाही. ग्रामविकास अधिकारी पिंपळगांव ब. यांनी दिनांक **८/८/२०२४** रोजी तसा दाखला दिला आहे. याबाबत कोणाचे कामी म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर **३०** दिवसाचे आत अगर दिनांक **०९/०९/२०२४** रोजी दुपारी **३.००** वाजता तहसिल कार्यालय निफाड येथे सुनावणी अयोजित केली आहे. सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास इकडेस तक्रार/हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचे हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात उपलब्ध कागदपत्राचे अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

**सही/-**
**(विशाल नाईकवाडे)**
**तहसिलदार निफाड**

**तहसिलदार निफाड यांचे कार्यालय (जि.नाशिक)**

**क्र. आरटीएस/कावि/२१३/२०२४,**
**निफाड दिनांक २६/०८/२०२४**

**जाहीर नोटीस**

**संदर्भ:- अर्जदार श्री/श्रीमती सागर मधुकर बनकर** रा. पिंपळगांव ब. ता. निफाड जि. नाशिक यांचा दिनांक ८/८/२०२४ रोजीचा अर्ज

उपरोक्त जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **यमुनाबाई आबाजी बनकर** यांचा दिनांक **१७/१०/१९९३** रोजी **पिंपळगांव ब.** ता. निफाड येथे जन्म/मृत्यू झाला आहे. जन्म/मृत्यूची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगांव ब. ता. निफाड येथे ग्रामपंचायत रेकॉर्डला झालेली नाही. ग्रामविकास अधिकारी पिंपळगांव ब. यांनी दिनांक **२३/०७/२०२४** रोजी तसा दाखला दिला आहे. याबाबत कोणाचे कामी म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर **३०** दिवसाचे आत अगर दिनांक **०९/०९/२०२४** रोजी दुपारी **३.००** वाजता तहसिल कार्यालय निफाड येथे सुनावणी अयोजित केली आहे. सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास इकडेस तक्रार/हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचे हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात उपलब्ध कागदपत्राचे अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

**सही/-**
**(विशाल नाईकवाडे)**
**तहसिलदार निफाड**

**ग्रामपंचायत वाळविहीर ता. ईगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५**

**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासननिर्णया नुसार)**

ग्रामपंचायत वाळविहीर ता. ईगतपुरी जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दर पत्रक द्वारे निविदा मागवत आहे. सदर च्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन. जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा दिनांक २७/०८/२०२४ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक ३१/०८/२०२४ सायंकाळी ५.०० वा (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक ०२/०९/२०२४ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत वाळविहीर ता. ईगतपुरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**कामाचे नाव :- 1) REPAIRING ZILLA PARISHAD SCHOOL COMPOUND WALL AND PROVIDING FIXING CEMENT CONCRETE PAVER BLOCK AT VALVIHIR TAL IGATPURI DIST NASHIK (EST. AMT. 300000/-) 2) REPAIRING ZILLA PARISHAD SCHOOL KITCHEN SHED FOR KANDWADI AT VALVIHIR TAL IGATPURI DIST NASHIK (EST. AMT. 158537/-) 3)PROVIDING SINTEX WATER TANK AT DUBYACHIWADI AT GRAMPANCHAYAT VALVIHIR TAL IGATPURI DIST NASHIK (EST AMT. 250000/-)** ४) जि. प. शाळा वॉल कंपाऊंड रंगविणे व डिजीटल करणे. **(EST AMT. 300000)**

**सही/- ग्रामसेवक व सही/- प्रशासक**

**ग्रामपंचायत वाळविहीर, ता.ईगतपुरी, जि. नाशिक**

**ग्रामपंचायत धुळगाव, ता.येवला जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५**


**शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासन निर्णयानुसार)**

ग्रामपंचायत धुळगाव, ता. येवला, जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकाद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफ मध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा दिनांक २७/०८/२०२४ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक ३१/०८/२०२४ सायंकाळी ५.०० वा (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदरचे लिफाफे दिनांक ०२/०९/२०२४ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे. अन्यथा त्यानंतर सदरच्या निविदा संबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत धुळगाव, ता. येवला जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**कामाचे नाव :- 1) Constg. Under Ground R.C.C. Pipe Gutter for Village Primises At Dahegaon Tal. Yeola Est. Cost-150000/- 2) Constg. Internal Cement Concrete Road ( Dahegaon-Dhul) At Dhulgaon Tal-Yeola Est. cost -200000/- 3) Constg. Internal Cement Concrete Road At Dhulgaon Tal-Yeola Est. cost -200000/- 4) Constg. Public Toilet Block At Dhugaon, Tal- Yeola. Est. cost -200000/- 5) Constg. Under Ground R.C.C. Pipe Gutter for Village Primises At Dhulgaon- Tal. Yeola. Est. cost - 150000/- 6) Constructing RCC GSR & Pipeline To Sonawane Wasti At -Dhulgaon Tal Yeola Est. cost Rs. 200000/- 7) Providing Pipeline To GSR At Satwaimata Mandir At-Dhulgaon Tal.Yeola Dist. Nashik Est.cost Rs. 125000/ 8) Constructing RCC GSR To Satwaimata Mandir At-Dhulgaon Tal Yeola Est. cost Rs. 100000/- 9) Reapirs Samshan-Bhumi Primises At Dhulgaon Tal-Yeola Est. cost – 400000 10) CONSTRUCTING VYAYAMSHALA AT Dahegaon dhul (GP Dhulgaon)TAL-YEOLA Est. Cost. Rs.:- 700044 11) CONSTRUCTING VYAYAMSHALA AT DhulgaonTAL-YEOLA Est. Cost. Rs.:- 700044**

**सही/- ग्रामसेवक व सही/- सरपंच**

**ग्रामपंचायत धुळगाव, ता.येवला, जि.नाशिक**

Punyashlok Devi Ahilya Gramvikas Sanstha Chandwad's
**V. N. Kotwal Arts, Commerce and Science College, Chandwad**
Near Tahsil office, Chandwad, Tal. Chandwad.
Dist. Nashik. Pin 423101
Recognized by Govt. of Maharashtra and affiliated to Savitribai Phule Pune University, Pune. E-mail: vnkotwalcollege25@gmail.com, College Id: PU/NS/ACS/188/2022

**WALK IN INTERVIEW**

Our Permanently Unaided College is inviting Applications from the Eligible Candidates for the following posts for the academic year 2024-25.

| Sr. No | Post | Faculty | Subject | No. of Post |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | - | doctorate of philosofy | 1 |
| 2 | Asst. Professor | Arts | Marathi, Hindi, English History, Geography, Economics, Political Science Philosophy, Psychology | (Each 1) |
| 3 | Asst. Professor | Commerce | Commerce | 4 |
| 4 | Asst. Professor | Science | Physics, Chemistry, Mathematics, Statistics, Electronics, Botany, Zoology, Microbiology | 8 (Each 1) |
| 5 | Asst. Professor | Computer Science | M.C.S./M.C.A./M.E. Computer Engineering | 2 |
| 6 | Physical Director | | Physical Education | 1 |
| 7 | Librarian | | Librarian Science | 1 |

**Qualification:** As per the UGC, Govt. of Maharashtra and SPPU, Pune norms
**Reservation:** Reservation policy as per the Govt. of Maharashtra and SPPU, Pune rules.
Preference will be given to NET/SET/PhD candidates
**Walk in interview** with application, Original documents. experience certificate on Wednesday 4th September 2024 at 11:00 am above mentioned address.
No TA/DA will be Paid for Interview.

**Dattatraya R. Bargal**
Secretary
.(9850017035)

**Rahul S. Kotwal**
President
(9881251999)

Punyashlok Devi Ahilya Gramvikas Sanstha, Chandwad



**गांवकरी Classified** — जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

जत्रा हॉटेल धात्रक फाटा येथे महाराष्ट्र फायर कंट्रोलमध्ये ऑफिस कामासाठी मुलगी पाहिजे व सर्व्हेच्या कामासाठी मुले पाहिजेत, शिक्षण किमान १२ वी पास.
**संपर्क - ९२८४२९४५२५**

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहीत निर्व्यसनी जोडपे पाहिजे.रहाण्याची सोय. **संपर्क:-सकाळी १० ते ५ नाशिक.मो.नं.९०४९०-३४९९९**

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो. नं.९०४९०-३४९९९**

न्यू अनारकली फॅशन &NX दुकानासाठी अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर व सेल्समन, हेल्पर पाहिजे. ठिकाण : एम.जी.रोड, भारत बुकसमोर, फावडे लेन,
**संपर्क- ९८८१३८३०१९**

**पाहिजेत**

कॉलेजरोड नाशिक येथील नामांकित ब्युटी पार्लर व शासन मान्यताप्राप्त ब्युटी कल्चर कोर्सेस, ॲकेडमीसाठी अनुभवी ब्युटीशियन, उत्तम संवाद कौशल्य असलेल्या अनुभवी रिसेप्शनीस्ट, टेली कॉलर्स मुली, महिला पाहिजेत. - अपेक्षेसह बायोडेटा पाठवा. संपर्क ९३०९२४००७५, ८३७८८७८६२

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरसाठी गरजू/अनुभवी वायरमन, इलेक्ट्रिशियन, पाहिजेत, स्वतःचे वाहन आणि बाहेर गावी राहण्याची तयारी असणाऱ्यास प्राधान्य. **अनुभवानुसार पगार. संपर्क - : उर्जा उद्योग ९५६१०१९२२८**

**भाड्याने देणे आहे**

संचेती टॉवरमागील पहिल्या मजल्यावरील १) 6'10"x6 SMALL ROOM 2) 23'x10" HALL 3)16'x11.10"- एकूण वापरलेले चटई क्षेत्र ४४४ फुट भाड्याने देणे. फक्त व्हॉटस्ॲप: 98693993772,

**ब्राह्मण वधू पाहिजे**

मुलगी उंच असावी, समजूतदार, मनमिळाऊ, पदवीधर, वय २४ ते २७. **संपर्क मोबाईल नंबर ९५५२२७७०९७, ९५११६८०९९८**

**पाहिजेत**

बिल्डरच्या ऑफिसमध्ये ऑफिसबॉय व कोर्ट कचेरीचा माहितीगार माणूस व १० वर्षे अनुभवी वकील पाहिजेत.
**मो.९३७३४२५००७**

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. अर्जासह भेटा- कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

**ज्योतिष**

गायत्री ज्योतिष- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

**विकणे आहे**

शरद पवार मार्केट यार्डच्या पाठीमागे १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. **संपर्क- मो.८००७७९९१०३**

**Name Changed**

My old Name Tirth Jetumal Chahera has been changed to my new Name **Tirth Jeturmal Chahira** as per **Aadhar no:- 998902319906**

I Shanta Govind Zade mother of No 15219571K Rank Hav Zade Pradip Govind is serving at 341 Fd Regt, C/O 99 APO Add:- Vill- Chincholi, Post- Chincholi, Teh- Sinnar, Dist- Nashik, Maharashtra 422102. That i have changed my Name & Date of birth from **Shanta Govind Zade** to Shantabai Govind Zade & DOB 10/05/1954 to 01/04/1948 due to wrongly entered in service record of my son as per **affidavit N0 14107/2024**

**नशा मुक्ती**

नको कॅन्सरला आमंत्रण देऊ... दारु...अंमली पदार्थ... गॅरेंटेड सुटण्यासाठी. **डॉ.पालवे-** (9552619752) व्यसन+ टेन्शन + भिती + चिंता+ नैराश्य + हस्तकंप+ निद्रानाश... **(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर डॉ. पालवे-नशामुक्ती...)**

**जाहिरात छोटी – किमया मोठी!**

गांवकरी



## महत्त्वाचे

### खाद्यपदार्थ पोहोचविणाऱ्या तरुणाचा खून

**पुणे :** रेनकोटवरून झालेल्या वादातून घरपोहोच खाद्यपदार्थ पोहोचविणाऱ्य तरुणावर मित्राने चाकूने वार करून खून करण्यात आल्याची घटना सिंहगड रस्ता परिसरात घडली. याप्रकरणी एकाला सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक केली.आदित्य श्रीकृष्ण वाघमारे (वय २३, रा. कारी, ता. धारुर, जि. बीड) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सुरेश परमेश्वर भिलारे (वय १८, रा. जाट नांदूर, ता. धारुर, जि. बीड) याला अटक करण्यात आली. याबाबत सिद्धेश्वर मोरे (वय २४, रा. वाल्हेकर चौक, नऱ्हे) याने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदित्य आणि सुरेश मित्र आहेत. दोघेजण एका पिझ्झा विक्री करणाऱ्या उपहारागृहात कामाला आहेत. दोघेजण मूळचे बीड जिल्ह्यातील असल्यो मित्र आहेत. घरपोहोच पिझ्झा पोहोचविण्याचे काम दोघेजण करतात, तसेच रात्री ते खासगी कंपनीत काम करतात. रविवारी सकाळी दोघांमध्ये रेनकोटवरुन वाद झाला होता. रेनकोट न दिल्याने आरोपी सुरेश त्याच्यावर चिडला होता. त्यानंतर रविवारी रात्री दहाच्या सुमारास दोघे जण नऱ्हे भागातील झिल महाविद्यालयाजळ भेटले. रेनकोटवरुन त्यांच्यात पुन्हा वाद झाला. सुरेशने त्याच्याकडील चाकूने आदित्यवर वार केले. बरगडीवर चाकूने वार करण्यात आल्याने आदित्य गंभीर जखमी झाला.

### कल्याणमधील जिम ट्रेनर तरुण शहापूरजवळील बंधाऱ्यात बेपत्ता

**कल्याण :** वर्षा सहलीसाठी शहापूर तालुक्यातील शेणवे-खैरे रस्त्यावरील केरला व्हिलेज या गृहप्रकल्पात रविवारी कल्याण येथून १२ तरुणांचा एक गट आला होता. या गटातील एक तरुण रविवारी संध्याकाळी खैरे गावाजवळील दुथडी भरून वाहत असलेल्या बंधाऱ्याच्या पाणलोट क्षेत्रात पोहण्यासाठी उतरला. पाण्याचा अंदाज न आल्याने तो वाहून गेला. विनायक वाझे (२९) असे या तरुणाचे नाव आहे. रविवार संध्याकाळी उशिरापर्यंत किन्हवली पोलिसांच्या सहकार्याने जीव रक्षकांनी या बेपत्ता तरुणाचा शोध घेतला. तो आढळून आला नाही. सोमवारी सकाळपासून जीव रक्षक गटाचे समीर चौधरी, अनिल हजारे, गजानन शिंगोळे, भावेश ठाकरे, रवींद्र मडके, रमेश डिंगोर हे खैरे येथील केटी बंधारा आणि मुसई बंधाऱ्याच्या पाणलोट क्षेत्रात बेपत्ता विनायकचा शोध घेत आहेत.

### पिस्तुलाच्या धाकाने तरुणाची लूट, येरवडा पोलिसांकडून तिघे अटकेत

**पुणे :** पिस्तुलाच्या धाकाने तरुणाला धमकावून त्याच्याकडील सोनसाखळी, अंगठी असा ऐवज लुटून नेल्याची घटना येरवडा भागात घडली. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली.सुदेश गायकवाड, निखिल कांबळे, अतिब अकील सय्यद (तिघे रा. येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी त्यांच्याबरोबर असलेल्या दोन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रुद्राक्ष श्याम गलांडे (वय २३, रा. तुळजाभवानीनगर, खराडी) याने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. रुद्राक्ष येरवड्यातील लक्ष्मीनगर परिसरातून शनिवारी सायंकाळी निघाला होता. हैद्राबादी हॉटेलजवळ आरोपी गायकवाड, कांबळे, सय्यद आणि त्यांच्याबरोबर असलेल्या दोन साथीदारांनी रुद्राक्षला अडवले. त्यांनी पिस्तुलासारख्या शस्त्राचा धाक दाखविला. पिस्तूल पोटाला लावून जीवे मारण्याची धमकी दिली. गळ्यातील सोनसाखळी आणि अंगठी असा २५ हजारांचा ऐवज धमकावून काढून घेतला, असे रुद्राक्ष गलांडेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पसार झालेल्या तिघांना पोलिसांनी अटक केली असून, सहायक पोलीस निरीक्षक साळुंके तपास करत आहेत.

### प्रियकर-प्रेयसीचे अपहरण करून लोखंडी सळईने बेदम मारहाण

**डोंबिवली :** आपल्या मनाविरुध्द, आपणास पसंत नसलेल्या तरूणावर प्रेम का करतेस. त्याच्या बरोबर का फिरतेस, असे प्रश्न करून दोन जणांनी डोंबिवली जवळील कोळेगावातील एका घरातून प्रियकर-प्रेयसीला जबरदस्तीने रिक्षेत बसविले. तरूणीला नवी मुंबईत नेऊन तिला लोखंडी सळईने बेदम मारहाण करून तिच्या हात, पायांना गंभीर दुखापती करण्यात आल्या आहेत. तर प्रियकराला बेदम मारहाण करत त्याला जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. शुक्रवारी हा प्रकार डोंबिवली जवळील कोळेगाव हद्दीत सचिन रसाळ यांच्या चाळीत घडला आहे. पूजा बबलू राठोड (२१, रा. ग्रीनपार्क झोपडपट्टी, वाशी, नवी मुंबई) असे गंभीर जखमी तरूणीचे नाव आहे. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिचा प्रियकर उमेश यालाही दोन जणांनी बेदम मारहाण करून त्याला जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे.

### क्राइम ब्रांचचे अधिकारी असल्याचे सांगून वृद्धाची फसवणूक

**ठाणे :** मुंबई-नाशिक महामार्गावरील लोढा धाम भागात क्राइम ब्रांचचे अधिकारी असल्याचे सांगून एका वृद्धाकडील सोन्याचे दागिने दोन भामट्यांनी काढून घेत त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा भागात फसवणूक झालेले ७० वर्षीय व्यक्ती राहतात. शनिवारी ते कामानिमित्ताने त्यांच्या मोटारीने भिवंडीत आले होते. ते मुंबई नाशिक महामार्गावरील लोढा धाम परिसरात आले असता, दोन भामट्यांनी त्यांची मोटार अडविली. क्राइम ब्रांचचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांनी त्यांचे दागिने एका कागदामध्ये ठेवण्यास सांगितले. वृद्धाने त्यांच्याकडील १५ ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी आणि १० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी काढून कागदामध्ये ठेवली. त्यानंतर त्या दोन्ही भामट्यांनी त्यांना बोलण्यामध्ये गुंतविले. काही वेळाने मोटारीतील कप्प्यात दागिने ठेवतो असे भामट्यांनी सांगितले. परतु त्यांनी दागिन्यांनी भरलेला कागदाची आदला-बदल करत दागिन्यांऐवजी दगडांनी भरलेला कागद तेथे ठेवला. त्यानंतर ते दोन्ही भामटे तेथून निघून गेले. काहीवेळाने वृद्धाने दागिने तपासले असता, त्यामध्ये दगड आढळून आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सव्वा लाख भाविकांनी पवित्र शिवलिंगाचे घेतले दर्शन

**शिनोली :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असणाऱ्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे चौथ्या श्रावणी सोमवारी भाविकांनी हर हर महादेव, जंगलवस्ती भीमाशंकर महाराज की जय अशा घोषणा देत मुसळधार पाऊस व दाट धुक्यामध्ये सव्वा लाख भाविकांनी पवित्र अशा शिवलिंगाचे दर्शन घेतले. श्री कृष्ण जन्माष्टमी असल्यामुळे ह्या दिवशी सभामंडप व परिसरामध्ये आकर्षक विविध रंगीबेरंगी फुलांची करण्यात आली होती..गेले दोन तीन दिवसांपासुन भीमाशंकर व परिसरामध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडत आहे. चौथ्या सोमवारची गर्दी पाहता शनिवार व रविवार गर्दी मोठ्या प्रमाणात होती. सोमवारी दिवसभर मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे सकाळ पासुनच गर्दी अत्यंत कमी होती.सोमवार (ता. २६) रोजी पहाटे साडेचार वाजता मंदीर उघडण्यात आले गाभारा मंदिर व परिसराची साफसफाई झाल्यानंतर पाच वाजेच्या दरम्यान शिवलिंगावरती दुग्ध व जलाभिषेक करुण पुजा करण्यात आली यानंतर महाआरती झाल्यानंतर लगेचच मंदीर दर्शनासाठी खुले करण्यात आले. दुपारी एक वाजे पर्यंत गर्दीचा ओघ हा आंबेगाव व खेडच्या हद्दी पर्यंत होता यानंतर गर्दी कमी होत गेली. वादळी वारे व मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे येणारे भाविक हे दर्शन करून लगेच परतीच्या मार्गावर परतत होते..शिरूर लोकसभा मतदार संघाचे विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी चौथ्या श्रावणी सोमवारी श्री क्षेत्र भीमाशंकर येथे पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेतले.लबडे मित्र परिवार मंचर यांच्यावतीने ३०० किलो विविध रंगांच्या फुलांचा वापर करुन श्रीकृष्णाची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. रंगीबेरंगी फुलांचा वापर करून गाभारा सभा मंडप व परिसर सजविण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांच्या ७ मिनीबस व ११ मोठ्या बस ठेवण्यात आल्या होत्या.

# गुजरातमध्ये पुराचा हाहाकार

## मध्य प्रदेश, महाराष्ट्रात हाय अलर्ट जारी



**अहमदाबाद :**

**देशात पुन्हा एकदा पावसाने धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. हवामान विभागाने मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरातसह महाराष्ट्रातही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.**

अशातच गुजरातमधील अनेक जिल्ह्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अहमदाबादमध्ये पहाटे तीन वाजल्यापासून पाऊस सुरू असून, शहरातही पाणी भरले आहे. अहमदाबादच्या अनेक भागात सात फुटांवर पाणी भरले आहे. गुजरातच्या २३ जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. याचबरोबर मध्य प्रदेशच्या नीचम, उज्जैन, मंदसौर, रतलामसह ८ जिल्ह्यांत पुढील २४ तासांत पूर येण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राजस्थानमध्ये ५ जिल्ह्यांना रेड अलर्ट आणि ५ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. गुजरातमधील मोरबी येथे मुसळधार पावसामुळे धवना गावात तलाव भरून वाहू लागला होता. या ठिकाणी लोकांना घेऊन जाणारी ट्रॅक्टर ट्रॉली पाण्यात वाहून गेली, यामध्ये १७ जण वाहून गेले असून १० जणांना एनडीआरएफने वाचविले आहे, तर उर्वरितांचा शोध सुरु आहे. पाण्याची पातळी वाढल्यामुळे ७२ जलाशयांना हाय अलर्ट तर १५ जलाशयांना नियमित सतर्कतेवर ठेवण्यात आले आहे.

गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी अधिकाऱ्यांना सखल भागातील लोकांना बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी नेण्याचे निर्देश दिले आहेत. अतिवृष्टीमुळे सर्वाधिक प्रभावित झालेल्या जिल्ह्यांमध्ये दक्षिण गुजरातमधील वलसाड, तापी, नवसारी, सुरत, नर्मदा आणि पंचमहाल यांचा समावेश आहे

### डिझेल विक्री करण्यासाठी आलेले दोघे ताब्यात

**भिवंडी :** भिवंडी शहरात टँकर घेऊन डिझेल विक्रीसाठी घेऊन आलेल्या दोघा जणांना शांतीनगर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. त्यांच्या जवळून टँकर व १५ हजार लिटर डिझेल असा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भिवंडी कल्याण रस्त्यावरील साईबाबा मंदिर हिना गॅरेज समोरील रस्त्यावर दोन व्यक्ती अवैध डिझेलची विक्री करण्यासाठी येणार असल्याची गुप्त बातमी शांतिनगर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे यांना मिळाल्यानंतर त्यांच्या पथकातील पोलीस पथकाने घटनास्थळी सापळा रचून अजित चोविसलाल यादव, वय ३४ रा.बेलापूर नवी मुंबई,व चालक आरीफ जलालुदीन खान, वय ४२ रा. मानखुर्द, मुंबई यांना ताब्यात घेतले. त्यांच्या जवळ टँकर मधील डिझेल बाबत कोणतीही कागदपत्रे आढळून न आल्याने त्यांनी हे डिझेल विक्रीसाठी घेऊन आल्याचे निष्पन्न झाल्याने शांतीनगर पोलिसांनी १० लाख ८० हजार रुपये किमतीचे १५ हजार ५०० लिटर डिझेल व १० लाख रुपयांचा टँकर असा एकूण २० लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याी माहिती विनायक गायकवाड यांनी दिली.

# कोणालाच सोडू नका, सर्वांना जेलमध्ये टाका : मनोज जरांगे




**जालना : स्मारकाचे काम करणारा कॉन्ट्रॅक्टर कोण आहे? कोणीतरी नेताच असणार, कशातही पैसै खायची सवय लागली यांना, सगळ्यांना जेलमध्ये टाका सोडू नका, अशी संतप्त प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याच्या घटनेवर दिली.**

हे लोक चांगले काम करत नाहीत. यांना पुतळे कळत नाही, दैवत कळत नाही, छत्रपती शिवराय देशाचे दैवत, ते हिंदू धर्माची अस्मिता आहेत, असे म्हणत जरांगे यांनी आता मोदीसाहेबांनी छत्रपती शिवरायांचे अरबी समुद्रातील स्मारकाचे भूमिपूजन केलं होतं हे विसरून जाऊ नका, ध्यानात ठेवा, असा टोलाही लगावला. जरांगे पुढे म्हणाले, छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यात भ्रष्टाचार करतात. यांना कशात खाव हे सुद्धा कळत नाही. कोण कॉन्ट्रॅक्टर, कोणी उद्घाटन केलं, मोदी साहेबांना उद्घाटन केलं म्हणतात. ते इतक्या अडचणीत कुठे गेलते. इतक्या लांब आता त्यांना दोष देऊन उपयोग नाही. उद्घाटकाचा काय दोष आहे, काम करणारेच नीट नसले तर ते काय करणार, असे म्हणत जरांगे यांनी प्रधानमंत्री मोदी यांच्यावर टीका करणाऱ्यांना सुनावले. परंतू हे असले लोक ज्यांना छत्रपती शिवरायांचा पुतळा कळत नाही त्यांना सोडलेच नाही पाहिजे. यांना एकदाच अद्दल घडायला पाहिजे, अशी मागणी जरांगे यांनी केली. पुतळे, स्मारकावरून राजकारण्यांना खडे बोल. पुतळ्याची देखरेख करण गरजेच आहे. नुसता पुतळा उभा केला की प्रशासन ही मोकळ होत. प्रत्येक ठिकाणी असेच आहे. निवडणुका झाल्यानंतर छत्रपती शिवरायांचे सरकार येण्यासाठी आशीर्वाद घेतलेला आहे. आता नुसते उद्घाटन उद्घाटन निवडणुका निवडणुका सुरू आहे.

दैवताचे अपमान करू नका. छत्रपती शिवरायांचे अरबी समुद्रातील स्मारक, इंदू मिलचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासंदर्भात फक्त निवडणुका आल्यावर बोलायचं, हे बंद करा आता, असे खडे बोल जरांगे यांनी राजकारण्यांना सुनावले.

# ऐक्याशिवाय काहीही होऊ शकत नाही : योगी आदित्यनाथ



**आग्रा : देशाच्या एकात्मतेवर बोलताना योगी म्हणाले की, ऐक्याशिवाय काहीही होऊ शकत नाही; काहीही साध्य होऊ शकत नाही. आपण एकजूट आणि विवेकी राहिलो तरच राष्ट्र मजबूत होईल. आपण फुटलो तर तुटून जाऊ. बांगलादेशात काय चालले आहे,त्या चुकांची पुनरावृत्ती इथे व्हायला नको. एकजुटीने राहण्यातच देशाची ताकद आहे. आपण जर विभाजित झालो तर कापले जाऊ असे त्यांनी सांगितले.असे सांगत उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितले.**

आग्रा येथे कृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने दुर्गादास राठोड यांच्या पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी योगी आदित्यनाथ म्हणाले की, आग्र्याच्या कणा-कणात कन्हैयाचा वास आहे. येथे कला, आस्था,समर्पण आणि विश्वास आहे.

समाज, जाती, भाषेवरून तोडणाऱ्या शक्तीपासून सावध राहण्याची गरज आहे. योगी यांनी राष्ट्रवीर दुर्गादास यांच्या इतिहासासोबतच काकोरी कटातील नायकांच्या के इतिहासावरही प्रकाशझोत टाकला.

मुख्यमंत्री योगींनी म्हटले की, काकोरी कटातील नायक पंडित बिस्मिल यांना फाशी दिली जात होती तेव्हा इंग्रजांनी विचारले होते की, तुमची शेवटी इच्छा काय आहे. त्यावर त्यांनी म्हटले होते की, मला धरतीवरच १०० वेळा जन्म मिळावा आणि प्रत्येकवेळी देश व समाजासाठी मृत्यू यावा.

# अन्नधान्य व्यापाऱ्यांचा आज लाक्षणिक बंद

## राज्यभरातील घाऊक आणि किरकोळ बाजारपेठा बंद

**पुणे : अन्नधान्यावर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू झालेला असताना बाजार आवारातील नियमन कर रद्द करण्यात यावा, यांसह विविध मागण्यांसाठी राज्यभरातील व्यापाऱ्यांकडून आज लाक्षणिक बंद पाळण्यात येणार आहे. राज्यभरातील घाऊक आणि किरकोळ बाजारपेठा बंद ठेवून व्यापऱ्यांकडून राज्य शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे.**

अन्नधान्यावर जीएसटी लागू करण्यात आलेला आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर बाजार समितीकडून नियमन कर आकारण्यात येत आहे. कायदेशीर मापविज्ञान कायदा नियम ३ मध्ये प्रस्तावित बदल करण्यात येऊ नये, तसेच जीएसटी कायदा सुलभ करण्यात यावा आणि खरेदीवरील अडचणी दूर करण्यात यावा, यासह विविध मागण्यांसाठी बंद पाळण्यात येणार आहे. कृषी उत्पन्न समिती बाजार आवारातील कर रद्द करण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

शासनाकडून व्यापाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. राज्यभरातील घाऊक आणि किरकोळ बाजारपेठा बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. मुंबईत व्यापाऱ्यांकडून आंदोलन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणनमंत्र्यांना निवेदन देण्यात येणार आहे. बंदमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रिज अँड ट्रेड (मुंबई), दि ग्रेन, राईस अँड ऑईल सीडस् मर्चेंटस् असोसिएशन (मुंबई), दी पूना मर्चंटस चेंबर (पुणे) यासह राज्यभरातील व्यापाऱ्यांच्या प्रमुख संघटना बंदमध्ये सहभागी होणार आहेत.

### युरियाची साठेबाजी

**आर्वी :** शेतकऱ्यांना वापराकरिता असलेल्या युरियाचा अनधिकृत साठा आर्वी आणि कारंजा तालुक्यात करण्यात आल्याची माहिती कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. या माहितीच्या आधारे कृषी विभागाने छापा टाकत तीन गोदामातून युरियाच्या १२ लाख ३५ हजार २०० रुपयांच्या ४ हजार ६३५ बॅग जप्त केल्या. शेतकऱ्यांकडून सध्याच्या काळात पिकांना युरिया देण्याकरिता मागणी होत आहे. अशात जिल्ह्यातील आर्वी आणि कारंजा तालुक्यात युरियाची साठेबाजी करत शेतकऱ्यांची आर्थिक लूट केली जातेय. युरियाकरीता शेतकऱ्यांची फरवड होत असल्याची माहिती कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. त्यानंतर कारंजा तालुक्यातील राजणी आणि आर्वी तालुक्यातील बाजारवाडा आणि पिंपळखुटा येथील गोदामावर कृषी विभागाने छापा घातला.



# भिवंडीत २१ लाखांचा १०६ ग्रॅम एमडीसह पिस्टल जप्त

**भिवंडी : भिवंडीत शांतीनगर पोलिसांनी दोन वेगवेगळ्या कारवाईत तिघा जणांना ताब्यात घेऊन त्यांच्या जवळून २१ लाख २० हजार रुपये किमतीचा १०६ ग्रॅम एमडी व १५ लाखांची बीएमडब्ल्यू कार व पिस्टल असा एकूण ३७ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

गुन्हेगारी कारवायांमुळे शहरातील हद्दपार केलेला मोहम्मद अली अब्दुल अजीज शेख हा शहरात एमडी विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाल्यावर शांतीनगर पोलीस ठाण्यातील पोलीस पथकाने त्यास शांतीनगर परिसरातून ११ लाख २० हजार रुपये किमतीचा ५६ ग्रॅम एमडी जप्त केला.

त्याचवेळी तपासात नाशिक येथील दोन जण एमडी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाल्यावर साईबाबा मंदिर परिसरात पोलिसांनी सापळा रचून संशयित बीएमडब्ल्यू कारमधील दोघा जणांची झडती घेतली असता त्यांच्या जवळ १० लाख रुपये किमतीचा ५० ग्रॅम एमडी आढळून आला. मुज्जफर मोबिन शेख व समीर फिरोज रोकडीया दोघे रा. नाशिक रोड यांना ताब्यात घेतले. त्यांच्या जवळील मोबाईल ताब्यात घेऊन तपासले असता त्यामध्ये हातात पिस्टल घेऊन वावरत असतानाचा व्हिडिओ आढळून आला.

त्यानुसार पोलिसांनी नाशिक रोड येथील त्याच्या घरातून पिस्टल जप्त केले आहे. या दोन्ही प्रकरणी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मनसेचा डोंबिवली पूर्वेतील दहीहंडी उत्सव रद्द!

**डोंबिवली : बदलापूर येथे दोन लहान मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ मनसेने यावर्षी डोंबिवली पूर्वेतील चार रस्तावरील दहीहंडी उत्सव रद्द करत आहोत, अशी घोषणा कल्याण ग्रामीणचे आमदार पाटील यांनी केली.**

याबाबत आमदार पाटील म्हणतात, बदलापूरातील या पीडित दोन कुटुंबांच्या घरात घडलेल्या या प्रकारामुळे ही कुटुंबे दुखी आहेत. यासाठी आपल्या पाठीशी संपूर्ण समाज आहे हे दाखविणे आवश्यक आहे. या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत मनसे त्यांना साथ देणार असेही पाटील सांगतात.वर्षोनुवर्षे डोंबिवलीत आम्ही दहीहंडी उत्सव साजरा करतच असतो पण यावर्षी बदलापूर येथील अशा निंदनीय घटनेचे सावट या उत्सवावर आहे म्हणून बदलापूर, डोंबिवली शहरात मनसेने आयोजित केलेला दहीहंडी उत्सव रद्द करण्यात येत आहे, अशी माहिती आमदार पाटील यांनी दिली आहे.बदलापूर येथील आदर्श विद्यालयात दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार झाला.

या घटनेबाबत शाळेतील आरोपी नराधमावर गुन्हा दाखल करून घेण्यात मनसेच्या बदलापूरातील पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत घटनेला वाचा फोडली. अशा घटना होवू नयेत यासाठी मनसेच्या डोंबिवलीतील पदाधिकाऱ्यांनी डोंबिवली परिसरातील शाळांमध्ये जाऊन शाळा व्यवस्थापनांना मुलींच्या सुरक्षिततेबाबत घ्यावयाची काळजी, तसेच याविषयी जनजागृती मोहीम सुरू केली आहे. त्यांनी प्रत्येक शाळेला एक छापील पत्रक देऊन मनसे पदाधिकारी त्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी शाळा व्यवस्थापनाने करावी म्हणून प्रयत्न करत आहेत.


## पाहिजे

**संस्था व्यवस्थापन समिती द्वारा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलींची नाशिक**

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलींची नाशिक या संस्थेमध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत संस्था व्यवस्थापन समितीस एका सत्राकरिता **सप्टेंबर २०२४ ते जूलै २०२५** कंत्राटी तत्वावर **११** महिनेसाठी अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात मानधनावर खालील पदे भरावयाची आहेत. इच्छूक व पात्र उमेदवारांनी **दिनांक ०२/०९/२०२४** रोजी सायंकाळी ठिक ०५.०० वाजेपर्यत संस्थेच्या कार्यालयात अर्ज जमा करावयाचे आहेत.

| पदाचे नाव | रिक्त पद | व्यवसायाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| शिल्प निदेशक | ०२ | इन्फॉमेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉली सिस्टिम मेन्टेनन्स | B.Voc/Degree in the relevant field from AICTE/UGC recognized engineering Collage/University with one year experience in the relevant field. OR 03 years Diploma in the relevant field from AICTE/recognized board of technical education or relevant Advanced Diploma (Vocational) f+rom DGRT with two year experience in the relevant field. OR NTC/NAC Passed in the Trade in the relevant field with 03 years experience in the relevant field. |
| शिल्प निदेशक | ०२ | इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | |
| शिल्प निदेशक | ०१ | इंटीरिअर डेकोरेशन ॲण्ड डिझाईनिंग | |
| शिल्प निदेशक | ०१ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट | |
| वसतिगृह अधिक्षक | ०१ | मुलींचे वसतिगृह अधिक्षक (महिला) | Female Candidate Any Graduate |

**अधिक माहितीकरीता सचिव संस्था व्यवस्थापन समिती, द्वारा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलींची त्र्यंबक नाका, जुना आग्रा रोड, नाशिक दूरध्वनी क्र.०२५३-२३१३५१४** येथे संपर्क साधावा.



**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग मालेगाव जि.नाशिक**
**ऑनलाईन ई-निविदा सूचना क्र.२१ सन २०२४-२०२५ (प्रथम प्रसिद्धी)**
**(अल्प कालावधी)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग मालेगाव रावळगाव रोड मालेगाव कॅम्प जि. नाशिक (दूरध्वनी क्रमांक ०२५५४-२५१९१२) **हे नोंदणीकृत/ अनोंदणीकृत सक्षम कत्राटदाराकडून अथवा अंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उपकंपनी भारतीय** असल्यास अशे कंत्राटदार निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करतील. ते खालील कामांच्या **ब-१** नुमन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा प्रक्रियेत भाग घेऊ शकतात. निविदा निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग मालेगाव यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**निविदा सूचनेत एकूण ०१ (एक) काम रुपये १०००.०० लक्ष आतील समाविष्ट असून या निविदा सूचनेची संपूर्ण माहिती (तपशील) खालीलप्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.**

**1) www.mahapwd.com 2 ) https://mahatenders.gov.in**

| | | | |
|---|---|---|---|
| कोऱ्या निविदा विक्री व बीड सबमीशन दिनांक व वेळ | 27/08/2024 11.00 पासून | ते | 03/09/2024 17:00 पर्यंत |

**टीप**

१ ई निविदेची किंमत (ना परतावा) व इसारा/बयाणा रक्कम फक्त ऑनलाईन पद्धतीनेच स्विकारली जाईल.
२ सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी इ-निविदा प्रणालीच्या वेबसाईट https://mahatenders.gov.in या पोर्टवर एनरोल्ड करणे आवश्यक आहे.
३ **सर्व कामांना पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटरिया अंतर्भुत करण्यात आलेला आहे.**

**सर्व नोंदणीकृत ठेकेदारांनी नोंद घ्यावी.**

**सही/- (एस.ए.शिंदे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव**

आरओसी-2024-25/क्र-5/C२३७९


### नीरेच्या ब्रिटिशकालीन पुलावरून युवकाची उडी

**नीरा :** वीर धरणामधून मोठ्या प्रमाणात सोडलेले विसर्गामुळे सध्या नीरा नदी दुथडी भरून वाहत आहे. सोमवारी (दि. २६) सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास नीरा येथील युवकाने दुथडी भरून वाहत असलेल्या नीरा नदीमध्ये ब्रिटिशकालीन पुलावरून उडी मारली. सचिन बापूराव गोरे (वय ३०) रा. नीरा वार्ड नं. ३ असे या युवकाचे नाव आहे. जेजुरी पोलीसांनी घटनेची नोंद घेतली असून पुढील यंत्रणाना माहिती दिली आहे. सोमवारी दिवसभर नीरा नदीच्या पात्रात मोठ्याप्रमाणावर पाणी वेगात वाहत आहे. सायंकाळी पाचच्या सुमारास नीरा नदीच्या पात्रात वीर धरणातून ४३ हजार ०८३ क्युसेक्स वेगाने पाणी वाहत होतं. यावेळी जुन्या ब्रिटिशकालीन पुलाच्या काठावरुन पाणी वाहत होते. सचिन गोरे या युवकाने दुथडी भरून वाहत असलेल्या नीरा नदीमध्ये ब्रिटिशकालीन पुलावरून उडी मारली. हा तरुण नशेमध्ये असल्याचे प्रथमदर्शी पाहणाऱ्यांनी सांगितले.


**महावितरण** **ई-निविदा सुचना-८(२०२४-२५)**

महावितरणतर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय नाशिक अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथ नाशिक मंडळाअंतर्गत ९ विविध ठिकाणी महिलांसाठी नविन प्रसाधनगृहाचे बांधकाम तसेच पाथरे, ननाशी, दापुर व वावी येथे विविध स्थापत्य देखभालीचे व दुरुस्तीचे कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन T-५६/२०२४-२५ ते T-६२/२०२४-२५ साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (http://etender.mahadiscom.in/eatApp) दि. २७.०८.२०२४ ते ०१.०९.२०२४ पर्यंत उपलब्ध आहेत. ही निविदा दि. ०२.०९.२०२४ रोजी १३.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. ०२.०९.२०२४ रोजी १३.३० वाजेपर्यंत (शक्य असल्यास) उघडण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति.कार्यकारी अभियंता (स्था) विभाग, नाशिक भ्रमणध्वनी ९२०९००१८४५ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते कि महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करुन घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुध्दी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Annoucements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**पी.आर.ओ. क्र.: १७८**
**दि. २६.०८.२०२४**

**कार्यकारी अभियंता (स्था)**
**स्थापत्य विभाग मराविविकंम नाशिक**

## महत्त्वाचे

### संभाजी ब्रिगेडच्या नाशिक उपजिल्हाध्यक्षपदी थोरात

**म्हाळसाकोरे : वार्ताहर**



संभाजी ब्रिगेड नाशिकच्या उपजिल्हाध्यक्षपदी नुकतीच सामाजिक कार्यकर्ते महेश थोरात यांची निवड करण्यात आली. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी, नवी मुंबई येथे संभाजी ब्रिगेडच्या २७ व्या राज्यस्तरीय अधिवेशन कार्यक्रमात ही निवड करण्यात आली. सिन्नर तालुक्यात आणि नाशिक शहरात सातत्याने करत असलेल्या सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांची ही निवड करण्यात येत असल्याचे जिल्हाध्यक्ष संतोष गायधनी यांनी सांगितले. संभाजी ब्रिगेड राज्यस्तरीय अधिवेशन कार्यक्रमात थोरात यांनी नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत छत्रपती खासदार शाहू महाराज हे उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीत माजी केंद्रीय मंत्री, खासदार शरद पवार, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड, एटीडी बारामतीचे चेअरमन राजेंद्र पवार, सह्याद्री फार्मसचे विलास शिंदे, उद्योजक सतीश मगर, सुप्रसिद्ध मराठी अभिनेते गौरव मोरे आणि निखिल चव्हाण, पत्रकार निरंजन टकले, पत्रकार अभिजित कारंडे, चित्रलेखाचे संपादक ज्ञानेश महाराव, श्रीराम पवार, लेखक चंद्रकांत झटाले आदी मान्यवर तसेच संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र राज्य भरातून आलेले पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन थोरात यांची निवड करण्यात आली. उद्योगाची दूरदृष्टी, महाराष्ट्र धर्म काय शिकवतो? गांधीजींच्या स्वप्नातील भारत, भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असलेली लोकशाही इ. विषयांवरील चर्चासत्रात मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

### बोरस्ते विद्यालयात साथीच्या डेंग्यू आजारावर प्रात्यक्षिक



**ओझर : वार्ताहर**

प्राथमिक आरोग्य केंद्र ओझर अंतर्गत माधवराव बोरस्ते विद्यालयात डेंग्यू आजाराविषयी प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. सदफ शेख, डॉ. आनंद सुर्वे, डॉ. प्राची पवार यांच्या मार्गदर्शनाखाली माधवराव बोरस्ते विद्यालयात डेंग्यू आजाराविषयी व हात धुणे हे प्रशिक्षण देण्यात आले. आरोग्य सहाय्यक अनिल राठी, आरोग्य सहायक रवींद्र देवरे, आरोग्य सहायिका भारती कदम, प्रयोगशाळा वैद्यनिक अधिकारी पल्लवी कुलकर्णी, गोसावी सिस्टर नंदा, आरोग्यसेवक विकास पिठे, अविनाश घोडविंदे, मोतीराम थोरे, प्रशांत बिहाडे, उमेश रामटेके, मुरुडेश्वर समीर यांनी हात धुणे प्रशिक्षण देत डेंग्यूविषयी मार्गदर्शन केले व स्कॅन कोड पद्धतीने ॲपची माहिती दिली. लवकरच डेंग्यूविषयी निबंध स्पर्धा घेणार असल्याचे राठी यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी मुख्याध्यापक सोपान वाटपाडे, ज्येष्ठ शिक्षक नंदकुमार न्याहारकर, क्रीडाशिक्षक सुरेश शेटे, आत्माराम शिंदे, वनिता अहिरे, दादासाहेब सोनवणे, बाळासाहेब मोरे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### बाळासाहेब भामरे



**सटाणा : वार्ताहर**

येथील बाळासाहेब दामोदर भामरे (७६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुले, नात व नातू असा परिवार आहे.

### पुष्कर नाहिरे

**नाशिक : वार्ताहर**



येथील पुष्कर अनिल नाहिरे (२६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, बहीण, आजी - आजोबा, काका, काकू असा परिवार आहे. ते वृत्तपत्र कर्मचारी अनिल नाहिरे यांचे सुपुत्र होत.

### सुलोचना पगार

**नाशिक : वार्ताहर**



सुलोचना रामदास पगार (६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दीर, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त कारागृह पोलिस हवालदार रामदास पगार यांच्या त्या पत्नी होत.

### राजूबाई कदम

**उपनगर : वार्ताहर**



जयभवानी रोड, कदम मळा येथील रहिवासी राजूबाई वामनराव कदम (७५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुलगे, एक मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

# बफर स्टॉक केलेला कांदा 'नाफेड'ने बाजारात आणू नये

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मागणी

**लासलगाव : वार्ताहर**

**गेल्या काही दिवसांपासून लासलगावसह जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर टिकून असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मात्र, दुसरीकडे गेल्या तीन-चार दिवसांपासून नाफेडचा कांदा बाजारात उतरवला जाणार, अशा चर्चा सुरू झाल्या असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था आहे. आगामी काळात भाव पुन्हा पडणार की काय, अशी भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.**



नाफेडचा कांदा बाजारात आला तर कांद्याची उपलब्धता वाढेल आणि यामुळे बाजारभाव पडतील असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. येत्या काही दिवसांनी नाफेडचा कांदा बाजारात आला तर बाजारभाव पडू शकतात ही शक्यता आहे. यामुळे या चर्चांनी कांदा उत्पादक शेतकरी थोडासा गोंधळला आहे.

आशिया खंडातील सर्वांत मोठी कांद्याची बाजारपेठ असलेल्या लासलगाव बाजार समितीत उन्हाळ कांद्याला समाधानकारक बाजारभाव मिळत आहे. सध्या उन्हाळ कांद्याला सरासरी ३७००/- ते ३८००/- रुपये प्रतिक्विंटल दर मिळत आहे. मागणीच्या तुलनेत मालाची आवक कमी होत असल्याने भविष्यात दर आणखी वाढू शकतात असे म्हटले जात आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. यंदाच्या खरीप हंगामातील लाल कांद्याची आवक होण्यास आणखी काही काळ वाट पहावी लागणार आहे.

दुसरीकडे कांद्याची मागणी सातत्याने वाढत आहे आणि आवक आता पुढे आणखी कमी होणार आहे. म्हणजेच नवीन माल जोपर्यंत बाजारात येत नाही तोपर्यंत बाजारात मालाची फारशी आवक होणार नाही. यामुळे बाजारभाव टिकून राहील असे दिसत आहे. मात्र, नाफेडचा कांदा जर बाजारात आला तर कांद्याची उपलब्धता वाढेल आणि यामुळे बाजारभाव पडतील, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

> नाफेडने जो कांद्याचा बफर स्टॉक केला आहे तो कांदा बाजारात उतरवला तर कांद्याचे बाजारभाव पडणार आहे. आता कुठं तरी कांद्याला जे काही समाधानकारक बाजारभाव मिळत आहे त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरात दोन पैसे पडत आहे. कांद्याचा बफर स्टॉक बाजारात उतरवणे म्हणजे शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवण्याचे सरकारचे धोरण आहे.
>
> – **सचिन होळकर,** कृषीतज्ज्ञ, लासलगाव

> सलग चार वर्षे कवडीमोल दराने कांदा विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना आता कुठे थोडाफार कांद्याला दर मिळण्यास सुरुवात झाली. शेतकऱ्यांच्या कांदा विक्रीतून मागील कालावधीतच झालेले नुकसान आता भरून निघण्याची संधी आहे. अशा वेळी बाजारभाव पाडण्यासाठी सरकारने नाफेडच्या बफर स्टॉकमधील कांदा बाजारात आणण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. तो लगेच बाजारात आणू नये; अन्यथा शेतकऱ्यांचा मोठा उद्रेक होईल.
>
> – **भारत दिघोळे,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना

# निफाडच्या विकासकामांसाठी ४ कोटींचा निधी : आ. बनकर

**दिक्षी : वार्ताहर**



**जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत जनसुविधा, मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणे, तसेच तीर्थक्षेत्र विकास योजना व जिल्हा परिषद शाळा वर्गखोल्या व दुरुस्ती करणे या योजनांतर्गत निफाड विधानसभा मतदारसंघासाठी सुमारे ४ कोटी १४ लाख निधी प्राप्त झाला असल्याची माहिती आ. दिलीपराव बनकर यांनी दिली.**

यामध्ये जनसुविधा योजनेंतर्गत उंबरखेड येथे गोसावी समाज दफनभूमी संरक्षक भिंत बांधणे- ५ लाख, करंजगाव येथे महानुभाव पंथ दफनभूमीस संरक्षक भिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे- ५ लाख, कोठुरे येथे स्मशानभूमी पोहच रस्ता करणे-१० लाख, खानगावथडी येथे स्मशानभूमी बांधकाम करणे व इतर अनुषंगिक कामे करणे- १० लाख, चितेगाव येथे स्मशानभूमीत पेव्हर ब्लॉक बसविणे- ५ लाख, चेहडी खुर्द येथे स्मशानभूमी पोहच रस्ता करणे- १० लाख, तारुखेडले येथे स्मशानभूमी बैठक व्यवस्था करणे- १० लाख, थेरगाव येथे स्मशानभूमी संरक्षक भिंत बांधणे- १० लाख, दारणासांगवी येथे नवीन स्मशानभूमी बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे- १५ लाख, दिक्षी येथे स्मशानभूमी शवदाहिनी, पेव्हर ब्लॉक बसविणे व अनुषंगिक कामे करणे- १० लाख, नागापूर येथे स्मशानभूमी निवाराशेड बांधणे व बैठक व्यवस्था करणे- १० लाख, नारायणगाव (खेरवाडी) येथे स्मशानभूमी संरक्षक भिंत बांधणे- १० लाख, पालखेड येथे स्मशानभूमी शेड बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे- १० लाख, बेहेड येथे स्मशानभूमी अनुषंगिक कामे करणे- १० लाख, भुसे येथे स्मशानभूमी निवारा शेड व इतर अनुषंगिक कामे करणे- १० लाख, मांजरगाव येथे स्मशानभूमी शेड व बैठक व्यवस्था व पोहच रस्ता करणे- १० लाख, मौजे सुकेणे येथे स्मशानभूमी बैठक व्यवस्था करणे- १० लाख, रौळस येथे स्मशानभूमी शेड व संरक्षक भिंत बांधणे- १० लाख, लालपाडी येथे महानुभाव पंथ दफनभूमीस संरक्षक भिंत बांधणे- १० लाख, वडाळी नजीक येथे स्मशानभूमी बैठक व्यवस्था करणे- १० लाख, साकोरे मिग येथे स्मशानभूमी संरक्षक भिंत व इतर अनुषंगिक कामे करणे- १० लाख.

तर मोठ्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधा पुरविणे योजनेंतर्गत उगाव येथील उगाव ते वनसगाव रस्त्यावर स्ट्रिट लाईट/सोलर लाईट बसविणे- ७.५० लाख, करंजगाव येथील कर्डक सर घर ते विठ्ठल टिळे घर रस्त्याची सुधारणा करणे- १० लाख, कोठुरे येथे श्री शनी मंदिरासमोरील चौक सुशोभीकरण करणे- १० लाख, नांदुर्डी गांव (श्री जनार्दन स्वामी कुटीया) ते श्री वरदविनायक मंदिर रस्त्यावर स्ट्रिट लाईट/सोलर लाईट बसविणे- ७.५० लाख, पालखेड येथील छत्रपती चौक सुशोभीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे- १० लाख, पिंपळगाव बसवंत येथील रुचा हॉटेल ते घोडकेनगर रस्त्याची सुधारणा करणे- १० लाख, शिंगवे येथील अशोक किसन सानप ते ताराबाई केदू वाघमारे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे- १० लाख, सायखेडा येथील कार्लेकर लाकडी मिल ते पावशे गल्ली व भगवंत कारे यांचे घर ते चंद्रकांत पावशे यांचे घर रस्त्याची सुधारणा करणे- १० लाख.

तसेच तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत तळवाडे येथे श्रीराम मंदिरासमोर भक्त निवास बांधणे-१० लाख, पालखेड, श्री खंडेराव महाराज मंदिर येथे वाहन तळ बांधणे व सुशोभीकरण करणे.

# तज्ज्ञ सत्रे स्पर्धांसह अशोका स्कूलमध्ये राष्ट्रीय अंतराळ दिन

**नाशिक : प्रतिनिधी**

**अशोका ग्रुप ऑफ स्कूल्समध्ये विविध स्पर्धा आणि उपक्रमांसह राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन अशोकाच्या विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ विज्ञान व खगोलशास्त्रविषयक आवड निर्माण करण्यासाठी सतत कार्यरत असणाऱ्या अशोका एस्ट्रॉनॉमिकल सोसायटी व इस्त्रो येथील शिक्षक यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.**



**नाशिक : अशोका स्कूलचे पदाधिकारी आणि शिक्षक, सोबत इंजि. अपूर्वा जाखडी आणि चांद्रयान भित्तिपत्रक स्पर्धेचे विजेते.**

या उपक्रमांतर्गत अशोका ग्रुप ऑफ स्कूलच्या विविध शाखांमधील इयत्ता पहिली ते अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी चांद्रयान ३ या विषयावर आधारित भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या कार्यक्रमात या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शोध प्रकल्पातून सर्व विद्यार्थ्यांना चांद्रयान-३ या मोहिमेची सखोल माहिती मिळाली. यानंतर इस्त्रो येथील निवृत्त संशोधक इंजि. जयंत जोशी नासा, हनीवेल्स स्पेस एज्युकेटर इंजि. अपूर्वा जाखडी आणि नाशिकमधील एक प्रख्यात शास्त्रज्ञ आणि संशोधक डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

# चांदवडला काकाजीनगरला खड्ड्यांचे साम्राज्य

**चांदवड : वार्ताहर**

**शहरातील काकाजीनगर येथील रस्त्यांवर चिखल, माती, खड्ड्यांचे साम्राज्य झालेले आहे. या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली असून, काकाजीनगरमधील नागरिक त्रस्त झाले आहेत. या खराब रस्त्यामुळे गाडी स्लीप झाल्याने अपघात होण्याची शक्यता आहे.**



अगदी पायी चालणेदेखील अशक्य झाले आहे. लहान मुलांना शाळेत येण्या-जाण्याची देखील कसरत करावी लागत आहे. तीन आठवड्यांपासून सतत तक्रार करूनही कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही व मुरूम शिल्लक नाही. ठेकेदार जागेवर नाही, अशा प्रकारची उत्तरे मिळतात.सतत चालणाऱ्या पावसामुळे या रस्त्यांची दुर्दशा अजूनही वाईट झाली आहे.

यामुळे एखादा अपघात झाला किंवा एखाद्याला दुखापत झाली तर यासाठी कोण जबाबदार राहील, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

यामुळे नागरिक प्रचंड वैतागले आहे. तसेच डेंग्यू डासांची उत्पत्ती होण्याची भीती सध्या नाशिक जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे. अशा परिस्थितीमध्ये रस्त्यावर कायमस्वरूपी पाणी साचलेले आहे. यामुळे येथे डेंग्यूची उत्पत्ती होऊ शकते; परंतु तरी देखील प्रशासन या कडे लक्ष देत नाही.

> **नगर परिदषद प्रशासन सुन्न?**
>
> चांदवड नगर परिषद प्रशासन यांना वेळोवेळी ही बाब निदर्शनास आणून देखील ते फक्त बघ्याची भूमिका घेत आहे. कुठल्याही प्रकारचे नियोजन नाही. नागरिकांच्या आरोग्यालासुद्धा मोठा धोका आहे. अशा परिस्थितीमध्ये पण नगर परिषद फक्त बघ्याची भूमिका घेते.

# नाईक महाविद्यालयातील बीसीए व बी.एस्सी संगणकशास्त्रच्या ११ विद्यार्थ्यांची निवड

**नाशिक : प्रतिनिधी**

**येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्लेसमेंट विभाग व किरण अकॅडमी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीय वर्ष बीसीए व बीएस्सी संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात प्लेसमेंट ड्राइव्ह घेण्यात आला. या प्लेसमेंट ड्राइव्हसाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दोन्ही विभागातील ७४ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला.**



ॲप्टिट्यूड टेस्ट, ग्रुप डिस्कशन, टेक्निकल सेशन आणि मुलाखत अशा विविध स्तरावर झालेल्या निवड प्रक्रियेमधून दोन्ही विभागांतील ११ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यात बीबीए/बीसीए विभागातील युवराज चव्हाण, सृष्टी देव, आराध्या मावळे, अभिषेक पॉल, प्रीती अनवट तर बीएस्सी संगणक विभागातील कार्तिक भामरे, यज्ञेश सावंत, उज्वल ठाकरे, तेजस सुराणा, भाग्यश्री सोनवणे, श्रुती जाधव आदी विद्यार्थ्यांची निवड झाली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष कोंडाजीमामा आव्हाड, उपाध्यक्ष उदय घुगे, सरचिटणीस हेमंतआप्पा धात्रक, सहचिटणीस दिगंबर गिते यांच्यासह सर्व विश्वस्त व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय सानप, उपप्राचार्य डॉ. पौर्णिमा बोडके व प्रा. दिलीप कुटे यांनी अभिनंदन केले आहे. प्लेसमेंट ड्राइव्हसाठी किरण अकॅडमीचे नॅशनल हेड व उपाध्यक्ष चेतन राजपुरोहित व त्यांचे सहकारी टीम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व निवड चाचणी घेतली.

# खेळाडू आर्यन शुक्लला महाराष्ट्र शासनातर्फे १० लाखांची मदत

## ना. छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून दिली मदत

**लासलगाव : वार्ताहर**

**राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून आंतरराष्ट्रीय खेळाडू आर्यन शुक्ल यास महाराष्ट्र शासनाच्या वतीने १० लाख रुपयांची मदत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आली आहे. त्यामुळे जर्मनीमधील पॅडरबोर्न येथे होणाऱ्या मेंटल कॅल्क्युलेशन वर्ल्डकप २०२४ मध्ये आर्यन शुक्ल देशाचे प्रतिनिधित्व करू करणार आहे.**



**लासलगाव : आंतरराष्ट्रीय खेळाडू आर्यन शुक्ल यास १० लाख रुपयांची मदत देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मंत्री छगन भुजबळ. (छाया : समीर पठाण)**

आंतरराष्ट्रीय खेळाडू आर्यन शुक्ल व त्याच्या कुटुंबीयांनी नुकतीच राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांची कार्यालयात भेट घेऊन जर्मनीमधील पॅडरबोर्न येथे होणाऱ्या मेंटल कॅल्क्युलेशन वर्ल्ड कप २०२४ या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी राज्य शासनाकडून मदत मिळावी, अशी मागणी केली. त्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नाशिक येथे महिला सक्षमीकरण मेळाव्यास आल्यानंतर खेळाडू आर्यन शुक्ल व त्याच्या कुटुंबीयांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मदत देण्याची मागणी केली. त्यानंतर काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर खेळाडू आर्यन शुक्ल यास मुख्यमंत्री सहायता निधीतून १० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. मंत्री छगन भुजबळ, मंत्री दादाजी भुसे यांच्यासह मंत्रिमंडळातील सहकारी मंत्री उपस्थित होते. आर्यन नितीन शुक्ल, वय १४ वर्षे, रा. नाशिक हा आंतरराष्ट्रीय खेळाडू असून, सन २०२२ मध्ये पॅडरबोर्न, जर्मनीमध्ये आयोजित -२०२२ विश्वविजेता आहे. तसेच मिलान, इटलीमध्ये आयोजित आर्यनने ''५० - २५.१९''मध्ये केलेले आहे. कु. आर्यन शुक्ल याने वयाच्या ८व्या वर्षापासून विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये जागतिक स्तरावर नेत्रदीपक कामगिरी करून अनेक पदके जिंकली आहेत.

आगामी -२०२४ साठी आर्यन जर्मनी येथे भारताचे प्रतिनिधित्व वर्तमान विश्वविजेता असताना करणार आहे. सदरहू स्पर्धेत जगातील फक्त ४० आघाडीचे सर्व वयोगटातील स्पर्धक भाग घेतात. ही स्पर्धा दि. १३ ते १५ सप्टेंबर २०२४ जर्मनीमधील पॅडरबोर्न या शहरात आयोजित केली आहे. आर्यन शुक्ल आणि त्याचे वडील नितीन शुक्ल दि. ११ ते १७ सप्टेंबर दरम्यान स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी जाणार आहे. राज्य शासनाकडून सदर खेळाडूला आर्थिक मदत मिळाल्याने तो आता आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करू शकेल.

# विद्यार्थ्यांनी उपक्रमात सहभागी होऊन व्यक्तिमत्त्व विकास करावा : गडाख

**ओझर : वार्ताहर**

**विद्यार्थ्यांनी गुणवत्ता संपादन करताना विविध उपक्रमात सहभागी होऊन आपला व्यक्तिमत्त्व विकास करावा, असे आवाहन डॉ. एस. आर. गडाख यांनी ओझर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.**

ओझर महाविद्यालयात आयोजित इंडक्शन कार्यक्रमात नवागतांना मार्गदर्शन ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. महाविद्यालयीन जीवनात अध्ययन अध्यापन यासोबत क्रीडा, सांस्कृतिक, राष्ट्रीय सेवा योजना, छात्र सेना, विद्यार्थी कल्याण मंडळ, रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण असे उपक्रम राबविले जातात.

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता संपादन करताना या उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपला व्यक्तिमत्त्व विकास करावा, असे प्रथम वर्ष पदवी व पदव्युत्तर विज्ञान या वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या इंडक्शन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर.गडाख यांनी आवाहन केले. कार्यक्रमाचे संयोजक व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी. आर. भदाणे यांनी आपल्या प्रास्ताविकात इंडक्शन कार्यक्रमाचे व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यांचे महत्त्व विशद केले.

डॉ. व्ही. डी. देठे यांनी प्रथम वर्ष पदवी व पदव्युत्तर या वर्गांसाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमासंदर्भात परीक्षांसंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. डी. एस. बोराडे, डॉ. आर. के. पाटील, बी. पी. भंगाळे, डॉ. के. यु. चव्हाण, डॉ. डी. पी. सौदागर, डॉ. एम. डी. दुगजे, प्रा. व्ही. एन. गावले, डॉ. पी. के. शिंदे, डी. पी. सौदागर, प्रा.एस.के.आवारे, यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन श्रीमती डॉ. एस. वाय. सरदार यांनी केले तर डॉ. एम. पी. दुशिंग यांनी आभार मानले. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



विशेष




## शाहू किड्स विद्यालयात दहीहंडी उत्सव

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील डुबेरे येथील एन.के.फाऊंडेशन संचलित शाहू किड्स अकॅडमी या विद्यालयात श्रीकृष्ण जयंतीनिमित्त दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण व राधेचा वेशभूषा करून सजावट केली होती .यावेळी शाळेच्या शिक्षिका सोनाली माळी व ज्योती वाजे यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जयंतीनिमित्त व गोपाळकाला निमित्त माहिती दिली. सदर उपक्रमाचे कौतुक एन.के.फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश वाजे, श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक नारायणशेठ वाजे आदींसह एन.के.फाऊंडेशनचे सदस्य यांनी केले.

## पिंपळे येथील गोपाल विद्यालयात शिक्षण सप्ताह

**ठाणगाव : वार्ताहर**

तालुक्यातील पिंपळे येथील गोपाल विद्यालयात नुकताच शिक्षण सप्ताह उत्साहात पार पडला. अध्ययन व अध्यापन साहित्य दिवस, मूलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस, क्रीडा दिवस, कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस, मिशन लाईफच्या दृष्टिक्षेपात इको क्लब, समुदाय सहभाग दिवस, सांस्कृतिक दिवस या उपक्रमांचे यावेळी आयोजन करण्यात आले. यावेळी समूहगीत, शालेय गीत, लोकगीत याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक एल. डी. बेणके, माजी मुख्याध्यापक टी. के. सदगीर, एस. एस. बोगीर, व्ही. के. वारुंगसे, दिलीप बिन्नर, दत्तू बिन्नर, नितीन बिन्नर, खंडू भनगीर, निवृत्ती आवळे, सुखदेव भनगीर, खंडू बिन्नर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## सोनांबेतील मुली कुस्ती स्पर्धेत अव्वल

**सिन्नर : प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत येथील राजर्षी शाहू महाराज तालमीमध्ये घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत तालुक्यातील सोनांबे येथील जनता विद्यालयाच्या मुलींनी घवघवीत यश मिळवले आहे. १४ वर्षाखालील मुलींच्या ३० किलो वजनी गटातून दीपाली ज्ञानेश्वर डावरे हिने प्रथम क्रमांक पटकावला. १४ वर्षाखालील मुलींच्या ३९ किलो वजनी गटातून समीक्षा दत्तात्रय शेळके तालुक्यात प्रथम आली. १४ वर्षाखालील मुलींच्या ५० किलो वजनी गटातून ईश्वरी रवींद्र वारुंगसे प्रथम तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या ६१ किलो वजनी गटातून वेदिका नामदेव कडभाणे प्रथम आली. या सर्व विद्यार्थिनींची जिल्हा स्तरावर निवड झाली आहे. त्यांच्या या यशाचे मविप्र सरचिटणीस नितीन ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत, शालेय समिती अध्यक्ष नंदू पाटील पवार, प्रभारी मुख्याध्यापक शिवनाथ पांगारकर यांनी कौतुक केले.

## हिवरे प्राथमिक शाळेला वृक्षसंवर्धक जाळ्या

**ठाणगाव : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ सिन्नरच्यावतीने तालुक्यातील हिवरे येथील जिल्हा परिषद शाळेला वृक्ष संवर्धनासाठी २० जाळ्या भेट देण्यात आल्या. या वृक्षांची जपणूक करण्याची जबाबदारी विद्यार्थी व शिक्षकांनी यांनी घेतली आहे. यावेळी क्लबचे अध्यक्ष सुनील ढाणे, सचिव मच्छिंद्र चिने, किसनराव लोणारे, दत्ता गोळेसर, दत्ता ढोबळे, मुख्याध्यापक डॉ. रुपवते उपस्थित होते.

## सिद्धांत शेळके यांची बुद्धिबळ स्पर्धेत निवड

**सिन्नर : प्रतिनिधी**



सिन्नर तालुक्यातील शालेय बुद्धिबळ स्पर्धा नुकत्याच मराठा विद्या प्रसारक समाजाची होरांजन अकॅडमी गंगावेश सिन्नर या ठिकाणी संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये लोकशिक्षण मंडळ सिन्नर संचलित व्ही पी नायक हायस्कूल नांदूर शिंगोटे या शाळेचा आठवी ब चा विद्यार्थी सिद्धांत योगेश शेळके १४ वर्षाखालील बुद्धिबळ स्पर्धेत जिल्हास्तरावर त्याची निवड झाली. या निवडीने शाळेच्या वतीने मुख्याध्यापक विलग सर व क्रीडा शिक्षक प्रकाश भाबड आदींचे त्याला योगदान लाभले सिद्धांत शेळके याची सर्वत्र फोटो करण्यात येत आहे.

## नायगाव विद्यालयात समाजदिन साजरा

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील नायगाव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संचलित जनता विद्यालयात संस्थेचा समाजदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे आद्य संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस हा समाजदिन म्हणून साजरा करण्यात येतो, असे सांगितले. तसेच स्थापनेपासून ते आजपर्यंत संस्थेची प्रगती करणाऱ्या सर्व कर्मवीरांना आदरांजली अर्पण केली. मान्यवरांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. शिक्षक, विद्यार्थ्यांनी कर्मवीरांबद्दलची माहिती सांगितली. यावेळी अनेक विद्याव्यांनी बुद्धिमतेचा व हस्तकलेचा वापर करून अनेक प्रकारच्या वस्तू तयार केल्या होत्या. याकेळी या वस्तूंचे व रांगोळी प्रदर्शन भरवण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन दत्तात्रय गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# आरोग्य विभागातील अधिकारी- कर्मचारी यांचे कार्य जीवदान देणारे : प्रतिभा संगमनेरे

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिक जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित नाशिक या संस्थेची ८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने सभासद पाल्य विद्यार्थी गुणगौरव, सेवानिवृत्त सभासद सन्मान सोहळा व नुतन रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा श्रीमती प्रतिभा संगमनेरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली व रवींद्र परदेशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक तसेच डॉ. राजेंद्र बागुल, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. वार्षिक सर्वसाधारण सभेचे निमित्ताने सेवा निवृत्त आरोग्य कर्मचारी सन्मान सोहळा व सभासद पाल्य गुणगौरव सोहळा उपस्थित मान्यवर यांचे शुभहस्ते पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती प्रतिभा संगसमनेरे यांनी आपल्या मनोगतात नमूद केले की आरोग्य कर्मचारी पतसंस्था थोड्या अवधीतच ९६५ च्या पुढे सभासद करुन स्वमालकीच्या इमारतीत कार्यरत होऊन दहा कोटीच्या पुढे भागभांडवल झाले आहे ही मोठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले. पतसंस्थेच्या संचालक मंडळाने पतसंस्था पंचवार्षिक निवडणुक बिनविरोध करुन संचालक मंडळाने वर्गणी रुपात निधी जमा करुन सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी अद्ययावत रुग्णवाहिका खरेदी केली ही अभिनंदनीय बाब असल्याने संपूर्ण संचालक मंडळ अभिनंदनास पात्र असल्याचे नमुद केले.

प्रमुख अतिथी म्हणुन मनोगत व्यक्त करतांना रवींद्र परदेशी यांनी नमूद केले की शासकीय आरोग्य कर्मचारी यांच्यामुळेच मला कोरोना काळात जीवदान मिळाले आहे. कारण माझ्यासह माझे कुटुंब कोरोना बाधीत झाले तेव्हा सर्व शासकीय आरोग्य यंत्रणेने मला योग्य उपचार व धीर देऊन कोरोनाची भीती दुर करण्याचे काम केले आहे. कोरोना साथरोग काळात ग्रामीण भागातील जनतेस याच आरोग्य कर्मचारी व अधिकारी यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून, कुटुंबापासून एक- एक महिना दूर राहुन खरे कोरोना योद्धा म्हणुन जनतेची सेवा केली त्याबद्दल आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. डॉ.राजेंद्र बागुल म्हणाले की,पतसंस्था सभासदांना दहा लक्ष रुपये तात्काळ कर्ज व रुपये सहा लक्ष विमा सुरक्षा कवच योजना प्रभावीपणे राबवत आहेत ही अभिनंदनीय बाब असल्याचे नमुद करणे. महेंद्र जाधव सारखे तरुण आदिवासी दुर्गम भागातुन येऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस प्रशासन सेवेत कार्यरत होत आहे हे आरोग्य कर्मचारी यांचा पाल्य म्हणुन निश्चितच अभिमान असल्याचे नमुद केले.

सभासद पाल्य कुमार महेंद्र जाधव याने त्याची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेद्वारे त्याची

> नाशिक जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित नाशिक ही संस्था आपल्या सभासदांना जमा शेअर्स रकमेवर आठ टक्के नफा वाटणी जाहीर करत आहे. नफा वाटणी सोबत आरोग्य कर्मचारी विमा कवच माध्यमातुन सभासदांचे आकस्मित निधन झाल्यास त्याच्या वारसास १ एप्रिल, २०२४ पासुन सहा लक्ष पर्यंत विमा संरक्षण देण्यात येत आहे.
>
> **विजय देवरे - चेअरमन**

पोलीस निरीक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल आरोग्य पतसंस्थेने सन्मान केल्याबद्दल कुटुंबातील घटकांचे आशीर्वाद मिळत असल्याचे नमूद केले. प्रस्तुत मिळालेले यशाचे श्रेय त्याने आपल्या कुटुंबातील घटकासह त्याच्या आईला देत असल्याचे नमूद केले.

सेवानिवृत्त सभासद फैय्याज खान यांनी मनोगत व्यक्त करतांना आरोग्य पतसंस्था सेवानिवृत्त सभासदांचा सन्मान करुन त्यांच्या शासकीय सेवेचा गौरव करत आहात हे आनंददायी असल्याचे नमूद केले. ाशिक जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या विद्यार्थी गुणगौरव व सेवानिवृत्त सभासद यांच्या सभेस व्हॉईस चेअरमन अबु शेख, सचिव एकनाथ वाणी, संचालक जी.पी.खैरनार, मधुकर आढाव, प्रशांत रोकडे, संजय पगार, श्रीकांत अहिरे, तुषार पगारे, सुलोचना भामरे, सोनाली तुसे, मनोज महाले, राजेंद्र सोनवणे, वर्षा सपकाळे नाशिक जिल्हा सरकारी व परिषद बँकेचे चेअरमन रविंद्र आंधळे, माजी चेअरमन तथा संचालक बाळासाहेब ठाकरे, अमोल बागुल, सचिन अत्रे, किशोर अहिरे, यांचेसह जेष्ठ सभासद सुभाष कंकरेज, संजय संवत्सरकर, रुपेश पहाडी, बाळासाहेब चौधरी, राजेश शिरसाठ, दिनेश ठाकरे, महेंद्र गांगुर्डे, प्रतीक सोनवणे, प्रशांत सोनवणे, सुरेश जाधव, सुदेश इनामके, प्रमोद घरटे, शरद घरटे, अनिल तिडके, अनिल भामरे, उमेश अग्रवाल, धनराज ठाकरे, क्षमा ईचम, दिनेश शेवाळे यांनी सभेतील चर्चेत भाग घेऊन आपला सहभाग नोंदविला.

सभेचे प्रास्ताविक संस्थेचे चेअरमन विजय देवरे यांनी केले तर संस्थापक चेअरमन तथा मुख्य प्रवर्तक जी.पी.खैरनार, संचालक मधुकर आढाव, सोनाली तुसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे अहवाल वाचन संस्थेचे उपाध्यक्ष अबु शेख यांनी केले तर वार्षिक सर्वसाधारण सभेस व गुणगौरव कार्यक्रमास उपस्थित सभासदांचे आभार संस्थेचे सचिव एकनाथ वाणी यांनी मानले.




## डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्री पोफळे यांची सटाणा इनरव्हील क्लबला भेट

**नाशिक : प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब ऑफ सटाणा मिड टाऊनला डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्रीताई पोफळे यांनी ऑफिशियल व्हिजीट दिली त्यावेळी डिस्टिक चेअरमन यांचा मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

त्यानंतर दीप प्रज्वलन करून कार्यक्रम सुरू झाला डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्रीताई पोफळे यांनी प्रोजेक्ट रिपोर्ट पाहून क्लबच्या कार्याची व एकजुटीचे कौतुक केले. असेच प्रोजेक्ट असेच कार्य चालू ठेवा असे सांगितले. तसेच क्लबचे फाइल्स चेक केल्या व त्याचेही कौतुक केले यानंतर स्मार्ट किड्स या शाळेत डेंटल हेल्थ कॅम्प आयोजित करण्यात आला होता. शाळेच्या मुख्याध्यापिका सुधा पाठक यांनी जयश्रीताई पोफळे अध्यक्ष सुजाता पाठक व डॉ. पायल सोनोग्रा व उपस्थित सभासदांचे यांचे शाल श्रीफळ देऊन सन्मान केला. डॉ. पायल सोनोग्रा यांनी मुलांना ब्रश कसे करायचे दातांची काळजी कशी घ्यायची याबद्दल महत्त्वपूर्ण असे मार्गदर्शन केले व त्यानंतर मुलांना ब्रश व टूथपेस्ट चे वाटप करण्यात आले मुले एकदम आनंदीत झाली व डिस्ट्रिक्ट चेअरमन जयश्रीताई पोकळे यांनी क्लबच्या प्रोजेक्टची प्रशंसा केली.

ओसीवीसाठी संस्थापक अध्यक्ष रूपालीताई कोठावदे, रूपाली जाधव, स्मिता येवला, साधना पाटील, सेक्रेटरी संगीता खानकरी, आयएसओ मीनाक्षी जाधव, ट्रेझरर रेखा वाघ, सी सी रेखा जाधव, वैशाली सोनवणे, पूजा दंडगव्हाळ, कविता जाधव, मालती चव्हाण यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## ठाणगावात एचडीएफसी बँकेची शाखा सुरु करा

**ठाणगाव : वार्ताहर**

येथे एच. डी. एफ. सी. बँकेची शाखा सुरु करुन ग्रामस्थांची अडचण दुर करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी सिन्नर शाखेचे बँक व्यवस्थापक प्रसाद पाठक यांना निवेदन देत केली आहे.

परिसरामध्ये बँक ऑफ महाराष्ट्रही एकमेव बँक असून या बँकेवर दिवसेंदिवस कामाचा बोजा वाढत आहे. तालुक्यामध्ये ठाणगावची बाजारपेठ सर्वात मोठी आहे. त्यामुळे पंचक्रोशीतील शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, महिला व वृद्धांची गैरसोय होत आहे. त्यामुळे गावात आपल्या बँकेची शाखा सुरु करून नागरिकांची अडचण दुर करण्याची मागणी ग्रामस्थांनी निवेदनात केली आहे. यावेळी पाठक यांनी याबाबत वरिष्ठांशी चर्चा करून तीन ते चार महिन्यात ठाणगावात बँकेची शाखा सुरु करण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले. यावेळी भाजपचे तालुका सरचिटणीस रामदास भोर, सामाजिक कार्यकर्ते प्रतिक शिंदे, ग्रामपंचायत सदस्य मोहन आव्हाड, किरण शिंदे, विशाल काकड, अक्षय घुगे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



## सिन्नरला लायन्स क्लबची शाडूमाती गणेश कार्यशाळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी यांच्या तर्फे शाडूमाती पासुन गणपती बनविणे कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली. या कार्यशाळेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून शाडूमातीपासून पर्यावरणपुरक गणेशमुर्ती साकारण्याचा आनंद घेतला.

लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी मार्फत सिन्नर या विविध क्षेत्रात समाजउपयोगी कार्य करीत असते याचच एक भाग म्हणून सिन्नर तालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शाडू माती वापरून गणपती बनविण्याची कार्यशाळा लायन्स हॉल रामनगरी येथे सपन्न झाली. या कार्यशाळेत एकूण ३०० विद्यार्थी सहभागी झाले होते. राहुल पगारे सर यांनी या गणपती बनविण्याचे मार्गदर्शन व प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले.

याप्रसंगी क्लबच्या अध्यक्षा ला.तेजश्री वाजे यांनी पर्यावरणाच्या दृष्टीने शाडू मातीचे गणपती स्थपना करणे याबाबत मार्गदर्शन केले. झोन चेअरपर्सन अपर्णा क्षत्रिय व डॉ. विजय लोहारकर यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमा करीता आर्थिक सहाय्य सुनंदा जगताप व रमेश जगताप यांनी केले. याप्रसंगी डॉ.प्रतिभा गारे, हेमंतनाना वाजे, सोपान परदेशी, संजय सानप, बबनराव वाजे, गोपी शिंदे व संदीप शिंदे उपस्थित होते. सेक्रटरी सौ.स्मिता थोरात यांनी आभार मानले.

## वृक्ष संवर्धनासाठी उपाययोजना करा

### वृक्षमित्र परिवाराचे ग्रामपंचायतीला निवेदन

**सिन्नर : प्रतिनिधी**

मनेगाव व परिसरात वृक्ष संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा अशी मागणी येथील वृक्ष मित्र परिवाराने ग्रामपंचायतीला निवेदन देत केली आहे.



मनेगाव हे नेहमीच दुष्काळाच्या दृष्ट चक्रात अडकते. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळासारख्या परिस्थितीला सामोरे जावे लागते. तज्ज्ञांच्या मते वातावरणातील हा बदल बेसुमार वृक्षतोडीमुळे झालेला आहे. ग्रामपंचायतने वृक्ष लागवड व संवर्धनावर अतिशय भरीव काम केलेले आहे. तसेच वृक्षमित्र परिवारानेदेखील वृक्ष लागवड आणि संवर्धनासाठी पर्यावरणपूरक गणेश विसर्जन, प्लास्टिकमुक्त हरित स्वच्छ सुंदर मनेगाव लागवड आणि संवर्धन, कापडी पिशव्यांचे गावांमध्ये वाटप करत प्लास्टिक मुक्तीवर जनजागृती केली त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांना देखील प्लास्टिकच्या दुष्परिणामाचे महत्त्व कळावे यासाठी शाळांमध्ये प्लास्टिक मुक्तीचा राबवण्यात येत आहे. वृक्ष मित्रपरिवार वृक्षतोड काही अंशी का कमी व्हावी यासाठी काही उपाययोजनांवर काम करत आहे. अंत्यविधीसाठी लागणाऱ्या लाकडाऐवजी गाईच्या शेणापासून बनवलेल्या गोवऱ्यांचा वापर होऊ आहे. गोवंश धारक महिलांचा बचत गट तयार करून त्या मार्फत गोवऱ्या उपलब्ध करुन देण्यात येतात. यातून महिलांच्या हाताला काम मिळत असून त्यांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्यास मदत होणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभेत हा विषय ग्रामस्थांसमोर मांडून त्यावर चर्चा घडवून आणावी, ग्रामसभेमार्फत सर्वसामान्य जनतेत जनजागृती करावी, शक्य झाल्यास तसा ठरावही मंजूर करुन घ्यावा अशी मागणी वृक्षमित्र परिवाराच्या सदस्यांनी निवेदनात केली आहे.

## उबाठा युवतीसेनेच्या वतीने अत्याचार निषेधार्थ स्वाक्षरी मोहीम

**सिन्नर : प्रतिनिधी**

बदलापूर येथील अल्पवयीन मुलींवर झालेला अत्याचार व राज्यात दिवसेंदिवस महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ उबाठा शिवसेनेच्या वतीने येथील बसस्थानकावर निषेध मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमाद्वारे महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेबाबत समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी बसस्थानकावर तसेच गाळा, महाविद्यालय परिसरात महिलांच्याव मुलींच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर गक्ती कायदा त्वरित लागू करण्यात यावा यासाठी स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेसाठी ठामपणे उभे राहणारे अनेकनागरिक, ज्येष्ठ नागरिक, युवक व युवती तसेच युवती सेनेचे पदाधिकारी सहभागी झाले. स्वाक्षरी मोहिमेद्वारे मोठ्या प्रमाणात ज्येष्ठनागरिकांनी, महिला पोलीस, महिला बसवाहेक यांनी आपला पाठिंबा दर्शवला, शक्ती कायद्याची तत्काळ अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी यावेळी त्यांनी केली. यावेळी युक्तीसेना अधिकारी श्रद्धा मुठाळ, तालुका युवती अधिकारी निकिता गायकवाड, साधना चेचो, शिवानी बोन्हाडे, कविता जाधव, साक्षी बोन्हाडे यांच्यासह युवतीसेनेच्या कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## पोलिस घाबरवणारे नाही तर मदत करणारे : गायकवाड

**सिन्नर : प्रतिनिधी**



पोलीस हे घाबरवणारे नसून अडचणीच्या काळात मदत करणारे आहेत. पोलीस शाळेत येतात ते गुन्हेगाराला पकडण्यासाठी किंवा गुन्हा करु नका हे सांगण्यासाठी. त्यामुळे पोलिसांबद्दल नकारात्मकता सोडून द्या असे आवाहन सिन्नर पोलीस ठाण्याचे निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी केले.

येथील भिकुसा हायस्कूलमध्ये सुरक्षेचे धडे या विषयावर आयोजीत व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सोमनाथ जगदाळे होते. कुठल्याही संकटसमयी ११२ डायल करा. पोलीस मदत तत्काळ प्राप्त होईल. चांगली संगत ठेवली तर जीवनात चांगले बनाल. आई- वडिलांच्या त्यागाचा विचार करा, दुसऱ्यांचे ऐकू नका. पालकांसोबत संवाद करा, व्यसनाधीन होऊ नका, वेगवेगळ्या प्रकारच्या कला जोपासा, निरोगी मन निरोगी शरीर, रोगी मन रोगी शरीर, मोबाईलचे धोके ओळखा असे गायकवाड यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी पालकांना आपल्या पाल्याची काळजी घेण्याचे आवाहन केले. पाल्याच्या वागण्यातील बदल ओळखा, त्यांना व्यसनाधीन होऊ देऊ नका, चुकीच्या स्पर्धांना त्यांना बळी पाडू नका असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी पालकांच्या शंकांचे योग्य पद्धतीने समाधान केले. मुलांच्या सुरक्षितेसंदर्भात विद्यालय सतत प्रयत्न करत असते. विद्यार्थ्यांना प्रवासात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मार्गदर्शन गरजेचे असते. याच उद्देशाने पोलीस निरिक्षक गायकवाड यांना आमंत्रित केल्याचे जगदाळे म्हणाले. विद्यालयात सर्व विद्यार्थ्यांच्या तक्रारीसाठी तक्रारपेटीची निर्मिती करण्यात आली आहे. त्यात तक्रारी बिनधास्तपणे मांडण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. सूत्रसंचालन प्रभाकर बोडके यांनी केले. प्रशांत तळेकर यांनी आभार मानले.

## आ.आशुतोष काळेंनी विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी दिला हेल्पलाईन नंबर

**वावी : वार्ताहर**

बदलापूर येथील शाळेत चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर मतदार संघातील विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी आ.आशुतोष काळे यांनी आपल्या संपर्क कार्यालयाचा ९८५८५५०३३३ हा हेल्पलाईन नंबर दिला आहे. त्या हेल्पलाईन नंबरवर विद्यार्थिनींना तात्काळ मदत उपलब्ध होणार असून त्यामुळे विद्यार्थिनींच्या पालकांची मोठी चिंता मिटणार आहे.

बदलापूर शाळेतील अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आ.आशुतोष काळे यांनी सोमवार (दि.२६) रोजी कोपरगाव मतदार संघातील सर्व शैक्षणिक संस्था चालक, तसेच जिल्हा परिषद शाळा व रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांची कोपरगाव येथे श्री साईबाबा तपोभूमीच्या हॉलमध्ये बैठक घेतली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करून हेल्पलाईन



नंबर बाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी आ.आशुतोष काळे म्हणाले की, बदलापूर येथील घटना अत्यंत दुर्दैवी व माणुसकीला काळीमा फासणारी आहे. त्यामूळे शाळा महाविद्यालय प्रशासनाने यापुढे अधिक जागरूकपणे सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. शासनाकडून आलेल्या नवीन नियमावली अंमलात आणून अशा घटना टाळण्यासाठी योग्य खबरदारी घ्यावी. पोलिसांना सूचना करतांना त्यांनी सांगितले की, पोलिसांनी नियमितपणे शाळा महाविद्यालय, बस स्थानक तसेच गर्दीच्या ठिकाणी सिव्हील ड्रेसवर गस्त वाढवावी. याठीकाणी अनेक रोड रोमिओ विद्यार्थिनींना प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे त्रास देतात. त्याबाबत शिक्षण बंद होईल या भीतीपोटी विद्यार्थिनी पालकांकडे वाच्यता करीत नाही व पालक देखील तक्रार करीत नाही. त्यामुळे रोड रोमिओंची हिम्मत वाढत चालली असून त्या रोड रोमिओंचा कायमचा बंदोबस्त करा. शाळा महाविद्यालयात शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींना शाळा महाविद्यालय सुटल्यानंतर वेळेत घरी पोहोचण्यासाठी वेळेवर कोपरगाव आगार प्रमुखांनी बस उपलब्ध करून देण्यासाठी योग्य नियोजन करावे. मतदार संघातील ज्या विद्यार्थिनींना मदत आवश्यक असल्यास त्यांना व त्यांच्या पालकांना आवश्यक मदत मिळण्यासाठी आपल्या शाळा महाविद्यालयातील विद्यार्थिनींना ९८५८५५०३३३ या संपर्क क्रमांकावर संपर्क करण्यासाठी हा नंबर द्यावा अये आवाहन करून त्यांना आवश्यक मदत तात्काळ उपलब्ध होईल अशी ग्वाही दिली. यावेळी कोपरगाव शहर पोलीस निरीक्षक भगवान माथुरे, कोपरगाव ग्रामीणचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र महाजन, नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, पंचायत समिती महिला व बालकल्याण अधिकारी पंडित वाघिरे, गटशिक्षण अधिकारी शबाना शेख, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य कारभारी आगवण, पद्माकांत कुदळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष शंकरराव चव्हाण, संचालक सुधाकर रोहोम, दिलीप बोरनारे, सचिन चांदगुडे, माजी संचालक बाळासाहेब बारहाते, नंदकिशोर औताडे, राजेंद्र औताडे, ज्ञानेश्वर गव्हाणे तसेच मतदार संघातील शाळा-महाविद्यालयांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक व प्राचार्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा- डुबेरे**

**गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) **मिळकतीचे वर्णन** - जिल्हा रजिष्ट्रेशन नाशिक, सब रजिष्ट्रेशन सिन्नर पैकी **मौजे गोंदे,** ता. सिन्नर, जि. नाशिक येथील येथील बिनशेती मिळकत **गट नं. ५३१/२ यांसी क्षेत्र १ हे. ३२ आर. म्हणजेच १३२००.०० चौ.मी. आकार रु. २६४०.०० यापैकी कर्जदार व संमती देणार सौ. पौर्णिमा भारत पाटोळे यांचे मालकीचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ० हे. ७२ आर. म्हणजेच ७२००.०० चौ.मी. यांसी आकार रु. १४४०.०० पै. तसेच सदर मिळकतीवर कर्जदार व संमती देणार नं. १ हे बांधकाम करीत असलेली संपूर्ण मिळकत** यांसी चतुःसिमा रे.ऑ.रा.प्रमाणे.

२) **कर्जदाराचे नांव :** **श्री. भारत राधाकिसन पाटोळे**

३) **संमतीदाराचे / जमीन मालकाचे नांव-** **सौ. पौर्णिमा भारत पाटोळे**, **श्री. सुरेश रघुनाथ शिंदे**

४) **कर्जाचा प्रकार :- जमिन गृहतारण,**

५) **पतसंस्थेचे नांव :- श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा- डुबेरे, ता. सिन्नर, जि. नाशिक,**

६) **नोटीसचा उद्देश :- टायटल व्हेरिफिकेशन**

७) वर कलम २ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी वर कलम ५ यांत नमूद पतसंस्थेकडे वर कलम १ यांत वर्णन केलेल्या मिळकती तारण ठेवून कर्जाची मागणी केलेली आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ यांत वर्णन केलेल्या मिळकती या मिळकतीचे मालक (कर्जदार व संमतीदेणार) यांनी पतसंस्थेकडे गहाण देण्याचे मान्य व कबुल केले असून सदर कर्जास उपरोक्त नमूद मिळकती तारण देण्यास मिळकतीचे मालक यांनी संमती दिलेली आहे.

८) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी, टायटल बाबत अगर मिळकत मालक यांचे मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत इतर कोणाकडे गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, करार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र व वित्तीय संस्थेचा बोजा, साठेखत, विसारपावती, विकसन करारनामा, जामिनकी, कोर्ट, दावा इ. कारणाने बोजा असल्यास अगर कोणाचाही काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **(सात)** दिवसाचे आंत आमचे कार्यालयांत तसेच पतसंस्थेचे कार्यालयांत लेखी साक्षांकित पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून कर्ज देणेकामी तारण / गहाण घेतली जाईल व कर्ज वितरण करण्यात येईल. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी म्हणून ही पतसंस्थेमार्फत जाहीर नोटीस

स्थळ- सिन्नर, दिनांक- २७/०८/२०२४ **आमचे मार्फत प्रसिध्द**

श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे (ॲडव्होकेट )

ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०२४



बफर स्टॉक केलेला कांदा 'नाफेड'ने बाजारात आणू नये
पान ६



खेळाडू आर्यन शुक्लला महाराष्ट्र शासनातर्फे १० लाखांची मदत
पान ६

# पावसाचा जोर कायम; तीन दिवस ऑरेंज अलर्ट

## नऊ हजार क्यूसेकने विसर्ग

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक शहरात सलग तिसऱ्या दिवशीही सोमवारी (दि.२६) सकाळपासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली. सायंकाळी पाच वाजेपर्यंत १५.३ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. दरम्यान, गंगापूरच्या पाणलोट क्षेत्रात पावासाचा जोर सुरूच असल्याने सायंकाळी धरणातून ९,४५० क्यूसेकने पाण्याचा विसर्ग करण्यात आला. तर सकाळच्या वेळी ८,४२८ एवढा विसर्ग सुरू होता. दरम्यान, प्रशासनाने नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.**

दरम्यान, ऑगस्ट महिन्यात गोदावरी नदीला सलग तीन दिवस पूर असल्याचे दिसून आले. यापूर्वी ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात गोदावरीला पूर आला होता. पूरस्थिती टिकून राहिल्याचे चित्र रविवारी नाशिककरांना बघावयास मिळाले. तसेच सांडव्यावरील देवी मंदिरालाही पूरपाण्याचा वेढा पडला होता. कपालेश्वर पोलिस चौकी अन् व्यंकटेश बालाजी मंदिरापर्यंत पाणी पोहोचले होते. गौरी पटांगणातून नवीन शाही मार्गावरसुद्धा पुराचे पाणी आले होते. संत गाडगे महाराज धर्मशाळेसमोरील संपूर्ण रस्ता पाण्याखाली गेला होता. कपालेश्वर मंदिराच्या पहिल्या पायरीला पाणी लागले होते. तेथून अहिल्याबाई व्यायामशाळेपर्यंत रस्त्यावर पाणी आले होते. हवामान खात्याकडून पुढील तीन दिवस नाशिकसाठी ऑरेंज अलर्ट अर्थात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. रविवारी शहरात दिवसभरात १५.३ मिमी पाऊस पडला, तर मागील ३६ तासांत ६५.३ मिमी इतका पाऊस मोजण्यात आला. गोदावरी नदीला पूरस्थिती कायम असल्याने व पावसाने सायंकाळी उघडीप दिल्यामुळे नागरिकांनी पूर बघण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. यामुळे संत गाडगे महाराज पूल, अहिल्यादेवी होळकर पूल, पंचवटीतील पुलावर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. गेल्या वर्षी वरुणराजाने ओढ दिल्याने नाशिककरांना पुराचा आनंद लुटता आला नव्हता. मात्र, ऑगस्ट महिन्यात वरुणराजाची कृपा झाल्याने गोदावरीला दुसऱ्यांदा पूर आला असून, ती खळखळून वाहत आहे.



नाशिक : मुरलीधर मंदिरात दरवर्षीप्रमाणे कृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला. (छाया : रविकांत ताम्हणकर)



## श्रावण सोमवारी मुसळधार पावसाने भाविकांची तारांबळ

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

**श्रावण महिन्याच्या चौथ्या सोमवारी शिवभक्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली, मात्र मुसळधार पावसाने त्यांची तारांबळ उडवलेली दिसून आली.**

रविवारी रात्रीपासून भाविक प्रदक्षिणा मार्गावर रवाना होत होते. सकाळी पावसाचा जोर वाढला आणि बारा वाजेच्या सुमारास पूर आल्याने मेनरोडसह रस्त्यांना नदीपात्राचे स्वरूप आले होते. भाविकांची वाहने पाण्यात अडकली. पुराच्या पाण्यातून मार्ग काढताना भक्तांना कसरत करावी लागली. बाजारपेठेत सर्वत्र पाणीच पाणी झालेले पाहावयास मिळाले.

दुपारी चार वाजेच्या सुमारास नित्य प्रदोष पुष्प पूजक डॉ. ओमकार आराधी यांनी पूजा केली तेव्हा शिवपिंडीतून सतत वाहणारा गंगा प्रवाह वाढलेला होता. तसेच तेथून बुडबुडे येत असल्याचे दिसून येत होते. यावेळेस पुजारी कैलास देशमुख उपस्थित होते. रांगेत आलेल्या भक्तांना याचे दर्शन घडले. दर्शन बारीत इतर दिवसांच्या तुलनेत कमी गर्दी दिसून आली.

## महत्त्वाचे

### मराठा हायस्कूलचे राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेत घवघवीत यश



**नाशिक : प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नाशिक शहर मनपा स्तरीय राष्ट्रीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. सदर विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा विद्यालयात संपन्न झाला. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यालयाचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक राजेंद्र शेळके, शंकर कोतवाल व रामनाथ रायते उपस्थित होते. सदर स्पर्धा शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी नाशिक मनपाचे श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, शिवाजीनगर, कार्बन नाका, सातपूर येथे आयोजित करण्यात आली होती. मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी 'एआय आणि समाज' या विषयावर नाटिकेचे सादरीकरण केले. विद्यालयातील विज्ञान छंद मंडळ प्रमुख जयश्री देवढे व दिपाली चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. सदर नाटिकेत जिग्नेश भामरे, श्रुती कहांडळ, श्रुती पाटील, अथर्व निफाडे, दुर्गेश वाडिले, केतन डोके, गौरी खुटे, तन्मय तिदमे या विद्यार्थ्यांनी काम केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, ॲड. लक्ष्मणराव लांडगे, रमेश (आबा) पिंगळे, डॉ. सयाजीराव गायकवाड व सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी प्रा.डॉ. भास्कर ढोके, शिक्षणाधिकारी प्रा.डॉ. अशोक पिंगळे, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



**गोविंदनगर येथील शिवराम वझरेनगर जॉगिंग ट्रॅकच्या बाजूला झाड कोसळले. यामुळे साधारणपणे दीड ते दोन तास वाहतूक ठप्प झाली होती. दरम्यान, अग्निशमन दल कर्मचारी प्रमोद लहामगे, कांतीलाल पवार, वृषभ हिरवे, अजिंक्य वझरे यांनी झाड बाजूला केले व वाहतूक सुरळीत केली. (छाया : दिलीपराज सोनार)**

## महिलांवरील अत्याचारांचे खटले निकाली काढा

### जिल्हाधिकाऱ्यांना विविध संस्थांचे निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

**लव जिहाद तसेच महिलांवरील अन्याय व अत्याचार संबंधातील खटले तातडीने निकालात काढण्यात यावेत व या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी नाशिक जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था व संघटनांच्या वतीने जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना देण्यात आले.**



यावेळी आशा पाटील, माजी नगरसेविका संगीता गायकवाड, मेघा शिंपी, कविता कुलकर्णी, संजय देशमुख, सुनील परदेशी, लक्ष्मण सावजी, योगेश मालुंजकर, संदीप काकड, राजेशकुमार शहा, आरती आहिरे, कांचन जाधव, सुनंदा विसपुते, योगिता चव्हाण, राजनंदिनी अहिरे, रोहिणी क्षीरसागर, संध्या काळे, अनुसया गवळी, सीमा ललवाणी, कांचन चव्हाण, नैना गायकवाड, छाया चौधरी, आशा भोई आदीसह विविध संस्थांच्या प्रमुख महिला उपस्थित होत्या. ग्राहक रक्षक समिती, शिखर स्वामिनी महिला संस्था, कर्तव्यदक्ष फाउंडेशन, मनुमानसी महिला मंडळ, राधिका फाउंडेशन, घर अंगण बहुद्देशीय संस्था पद्माक्षी आदी संस्थांनी पुढाकार घेऊन निवेदन दिले.

> महिला-मुलींवरील अत्याचाराविरोधात शहरातील अनेक संघटना एकत्र आल्या असून, याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन गुन्हेगारांवर तात्काळ कारवाईची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. तसेच आता बेटी बचाव, बेटी पढावबरोबरच बेटीने लढायला शिकायला हवे. या माध्यमातून आपण समस्त मुलींना आवाहन करतो की, तुम्ही स्वरक्षणाचे धडे घ्यावेत. जेणेकरून स्वत:ची सुरक्षा करू शकतील.
>
> **- संगीता गायकवाड,** माजी नगरसेविका, अध्यक्ष, शिखर स्वामिनी महिला संस्था

## ४१४१ नंबरसाठी मोजले तीन लाख

### एका दिवसात साडेपाच लाखांचा महसूल

**पंचवटी : सुनील बुनगे**

**वाहन घेताना अनेक हौशी वाहन मालक चॉइस नंबरसाठी आग्रही असतात. त्यातच आरटीओमध्ये चारचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरू झाली असून, एका वाहन मालकाने ४१४१ नंबरसाठी ३ लाखांची बोली लावून आपल्या वाहनासाठी नंबर घेतला. त्यामुळे हौसेला मोल नाही हेही तितकेच खरे!**



प्रादेशिक परिवहन कार्यालयात २३ ऑगस्ट २०२४ पासून चारचाकी वाहनांसाठी एम.एच. १५ जे.एक्स. ही नवीन मालिका सुरू झाली आहे. आकर्षक नंबरसाठी परिवहन कार्यालयात अर्ज सादर करावा लागतो. त्यात ४१४१ नंबरसाठी अनेक अर्ज सादर करण्यात आले होते. ४१४१ नंबरसाठी शासकीय फी केवळ १५ हजार रुपये इतकी आहे. परंतु या नंबरसाठी जास्त अर्ज आल्याने त्यासाठी लिलाव पद्धतीने बोली लावण्यात आली. यातील एकाने १ लाखाची बोली लावली होती. मात्र, दुसऱ्या एका वाहनचालकाने याच नंबरसाठी चक्क तीन लाखांची बोली लावल्याने त्या ग्राहकास आकर्षक नंबर देण्यात आला.

त्या वाहनचालकाला १५ हजार शासकीय फी व लिलाव बोलीतील तीन लाख असे एकूण तीन लाख १५ हजार रुपये मोजावे लागले. तर २७ या नंबरसाठी शासकीय फी ५ हजार रुपये इतकी असून, त्यासाठी जास्त अर्ज सादर केल्याने त्यासाठी ६० हजारांची बोली लावल्याने तो नंबर ६५ हजार रुपये देऊन देण्यात आला. एकाच दिवसात प्रादेशिक परिवहन कार्यालयाला चॉइस नंबरच्या माध्यमातून सुमारे साडेपाच लाखांचा महसूल जमा झाला.

### चॉइस नंबरमधून मिळतात कोट्यवधी रुपये!

वाहन घेताना अनेक वाहनचालक आपल्या वाहनासाठी चॉइस नंबरची मागणी करत असतात. दुचाकीसाठी विविध नंबरसाठी वेगवेगळी रक्कम आहे. तर चारचाकी वाहनांसाठी वेगवेगळी रक्कम आकारली जाते. त्यात जर दुचाकीच्या सिरीजमधून एखाद्या चारचाकी वाहनासाठी नंबर घ्यायचा असेल तर त्यासाठी जास्त रक्कम मोजावी लागते. परंतु चारचाकी वाहनासाठी अथवा दुचाकी वाहनासाठी त्याच सिरीजमधून नंबर घ्यायचा असेल तर जी शासकीय फी आहे तीच द्यावी लागते. जर एकाच चॉइस नंबरसाठी जास्त अर्ज आले तर त्यासाठी लिलाव पद्धतीने बोली लावण्यात येते. त्यामुळे प्रादेशिक परिवहन विभागाला चॉइस नंबरच्या माध्यमातून वर्षभरात कोट्यवधी रुपये महसूल मिळतो.

## महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाच्या अध्यक्षपदी कैलासराव भोसले यांची निवड

**निफाड : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाच्या वार्षिक मेळाव्यामध्ये सन २०२४ ते २०१७ या कालावधीकरिता द्राक्ष बागायतदार संघाची राज्याची व नाशिक विभागाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यात महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाच्या अध्यक्षपदी नाशिक जिल्ह्यातील सारोळे खुर्द येथील कैलासराव भोसले यांची तर उपाध्यक्षपदी मारुती चव्हाण (सांगली), खजिनदारपदी शिवाजी पवार (सोलापूर) व मध्यवर्ती विज्ञान समिती चेअरमनपदी अभिजित कांचन यांची निवड करण्यात आली.**



> द्राक्ष बागाईतदार हा केंद्रबिंदू मानून त्यांना अपेक्षित असलेले कामकाज करणार आहे. माहिती तंत्रज्ञानाची जोड द्राक्षशेतीला देताना कमी खर्चिक व पेंटंटमुक्त द्राक्ष जाती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करू. निर्यातीच्या नव्या बाजारपेठा उपलब्ध करून द्राक्षशेतीला वेगळा आयाम देणार.
>
> **- कैलासराव भोसले**
> अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघ, पुणे

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथे पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष शिवाजीराव पवार हे होते. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याची व नाशिक, सांगली, सोलापूर, पुणे या विभागांच्या विभागीय कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये नाशिक विभागातून महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघावर राज्य संचालक म्हणून रवींद्र निमसे, सुरेश कळमकर, श्याम शिरसाट, गणेश मोरे, भाऊसाहेब भालेराव, भारत सोनवणे, भाऊसाहेब गवळी, बाळासाहेब वाघ, तुषार खापरे, ईश्वर महाले, नंदू पवार, दिगंबर कहांडळ, संजय सांगळे यांची तर मध्यवर्ती विज्ञान समितीच्या सदस्यपदी संकेत गायकवाड, उमेश भालेराव, विजय घुमरे, योगेश रिकामे, सोपान बोराडे, सुकृत बोराडे यांची निवड करण्यात आली. संघाच्या नाशिक विभागीय अध्यक्षपदी बाळासाहेब गडाख तर मानत सचिवपदी बबनराव भालेराव यांची निवड करण्यात आली. नाशिक विभागीय संचालक मंडळामध्ये वैभव तासकर, ॲड. रामनाथ शिंदे, वाल्मीक सांगळे, नंदू पडोळ, बाळासाहेब सानप, राजेंद्र भालेराव, मोतीराम जाधव, योगेश कुशारे, सुनील बाऱ्हाते, अशोक पाटील, बाळासाहेब आहेर, किशोर पानगव्हाणे, रावसाहेब भोसले, अशोक कांडेकर, गुलाब ठाकरे, महेश दवंगे, बाळू पगार, यशवंत ठुबे, कैलास पाटील, दत्तात्रय डावरे, भाऊसाहेब खर्डे, महेंद्र गुंजाळ, मनोज कोल्हे, मनीष चोपडे, अशोकराव वाघ, सुभाष वाघ, सागर सानप, शुभम गाडे, यादव कावळे, योगेश दवंगे यांची नाशिक विभागीय संचालक मंडळात निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष कैलासराव भोसले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त करत कैलासराव भोसले यांच्या द्राक्षशेतीतील योगदानाचे फळ अध्यक्षपदाने मिळाले आहे. त्याचे चीज करून सामान्य शेतकऱ्यांना चांगली बाजारपेठ व निर्यातक्षम द्राक्ष जाती उपलब्ध करून देतील, असा विश्वास व्यक्त केला.

## पालकमंत्री दादा भुसे यांनी घेतला पूरपरिस्थितीचा आढावा

### प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक शहरातील गोदावरी नदीला गेल्या तीन दिवसांपासून यंदाच्या वर्षातला दुसऱ्यांदा पूर आला. नाशिक शहर व परिसरातील गेल्या तीन दिवसांपासून संततधार सुरू आहे. यामुळे गोदावरी नदीची पाणीपातळी वाढली आहे.**



काल सोमवार दि.२६ रोजी नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी नाशिक येथील होळकर पुलावर जाऊन पूरस्थितीचा आढावा घेतला. तसेच प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचनाही भुसे यांनी दिल्या. यावेळी होळकर पुलावर उपस्थित नागरिकांशी संवाद साधून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे खबरदारी घेण्याच्या सूचनाही पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केल्या.

## डांगसौंदाणे गावातील पुलाचा एक भाग वाहून गेला

**नाशिक : प्रतिनिधी**

**केळझर धरणाचे आराम नदीपात्रात चार हजार सातशे ७७ क्यूसेक पाणी आराम नदीपात्रात सोडण्यात आले असून, आरम नदी पात्र दुथडी भरून वाहत आहे. यामुळे केळझर धरणाच्या खाली धरणाच्यामधून सोडलेल्या पाण्यामुळे डांगसौंदाणे गावातील पुलाचा एक भाग वाहून गेल्याने डांगसौंदाणे ते साकोडे, तताणी, केळझर, साळवण, गुरुमाळ, साल्हेर, मानूर, आलियाबाद, गावांचा तसेच पठावे मोरकुरे, भिलदर, तळवाडे गावांचा मळगाव पिसोरे, भवाडे गावांचा संपर्क तुटला आहे.**



डांगसौंदणे येथील प्रवीण गांगुर्डे यांचा अंतिम संस्कार डांगसौंदाणे स्मशानभूमीऐवजी बुंधाटे गावी जाऊन करावा लागला.

डांगसौंदाणे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सात ते आठ फूट पाणी असल्याने स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता पाण्याखाली गेलेला होताद्र संततधार पडणाऱ्या तीन दिवसांपासून पाण्यामुळे डांगसौंदाणे परिसरातील जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. आराम नदी पात्रातील केळझर धरणापासून तताणी, भावनगर, करंजखेड, साकोरे, गुंदाटे, निकवेल, कंधाणे, चौधाणे, निरपूर, मळगाव, मुंजवाड, सटाणा, आराई आदी गावांना नदीपात्रापासून स्थलांतरित होण्याचे पाटबंधारे विभागाने व महसूल विभागाने सावधानतेचा इशारा दिलेला आहे.



सेन्सेक्स ५०० हून अधिक अंकांनी वाढला

पान ३

# नाशिक आज गांवकरी

मुंबई इंडियन्सनची नॉटिलस मोबाइलच्या रिअल क्रिकेटशी भागीदारी

पान ३




नाशिक, मंगळवार, दि. २७ ऑगस्ट २०२४


## महत्त्वाचे




### राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे आंदोलन

बदलापूर प्रकरणातील आरोपींना शिक्षा द्या

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार नाशिक जिल्हा ग्रामीण महिला आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे बदलापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या मुलीला न्याय मिळावा म्हणून आंदोलन घेण्यात आले. यावेळी महिला जिल्हाध्यक्ष संगीता पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मीराताई भोईर, जिल्हा सरचिटणीस भारती चित्ते, चारोस्कर ताई, शैला उफाडे आदी महिला पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### मुलींना मिळाले सुरक्षेचे धडे



**नाशिक : प्रतिनिधी**

कुसुमाग्रज प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात मुलींची सुरक्षा आणि सशक्तीकरण संदर्भात समुपदेशन शाहू शिक्षण संस्था पंढरपूर संचलित कुसुमाग्रज प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि.२६) मुलींना सुरक्षिततेविषयी माहिती देण्यात आली. आडगाव विभागातील) दामिनी पथकातील पोलीस शिपाई धात्रक, एस. एन. सोनवणे तसेच (पंचवटी विभागाच्या निर्भया पथकातील पवार एम. एफ., एस. के. महाले आदी उपस्थित होते. इयत्ता तिसरी ते दहावीच्या सर्व मुलींना गुड टच आणि बॅड टच या संदर्भात प्रात्यक्षिक स्वरूपात माहिती देण्यात आली. तसेच मुलींनी स्वतःची सुरक्षा कशी करावी याविषयी समुपदेशन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका पवार एस. के., समन्वयक गवंडर जे. आर., सहशिक्षिका जावळे, अश्विनी अडसरे, वैशाली बोरसे, मनीषा बैरागी आदी उपस्थित होत्या.

### संस्कृती सोनवणेचे मलखांब स्पर्धेत प्रथम

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिक रोड येथील जेडीसी बिटको महाविद्यालयामधील संस्कृती सोनवणे हिने १९ वर्षांखालील मलखांब स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिकमार्फत आयोजित जिल्हास्तरीय शालेय मलखांब स्पर्धेत यशवंत व्यायामशाळा येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विश्व जिज्ञासा स्पोर्ट्स अॅकॅडमी प्रशिक्षण घेणाऱ्या खेळाडूंनी यश मिळविले. यात संस्कृती सोनवणेने प्रथम क्रमांक मिळविला. तर सतरा वर्षांखालील गटात अस्मि गोविंद पितळे प्रथम, चौदा वर्षांआतील मुलींमध्ये जिज्ञासा प्रशांत जोशी तर १९ वर्षांआतील मुलांमध्ये बिटकोचा इंद्रनील जाधव, बिटको १७ वर्षे गटात नमिता जोशीने यश मिळविले. विजयी खेळाडूंना क्रीडाशिक्षक प्रशांत जोशी, अतुल पाटील यांचे सहकार्य मिळाले.

# कोट्यवधींची उधळण; रस्त्यांची 'चाळण'च!

## दुरुस्ती नावालाच; भगूरमधील घटनेच्या पुनरावृत्तीची भीती

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक शहरात मागील तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शहरातील मुख्य रस्त्यासह कॉलनीअंतर्गत रस्ते उखडले आहेत. कोट्यवधी खर्चूनही रस्त्यांची चाळण झाली असून, नाशिककरांच्या नशिबी खड्डेच आहे. याप्रकरणी नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जातो आहे. दरम्यान, रस्ते दुरुस्तीसाठी पालिकेने नुकतीच वीस कोटींचा बार उडवला आहे. मात्र, प्रत्येक वर्षी खड्डे दुरुस्तीच्या नावाखाली ठेकेदारांची चंगळ होत असून, दोन दिवसांच्या पावसाने रस्ते दुरुस्तीचा पंचनामा केला आहे.**

नाशिक शहरात पावसाळ्यापूर्वीपासून रस्त्यांची चाळण झाली आहे. विशेष म्हणजे, रस्ते दुरुस्ती करूनही त्याकडे प्रशासनाने सपशेल दुर्लक्ष केले आहे. धक्कादायक म्हणजे ज्या ठिकाणी बांधकाम विभागाने रस्ते दुरुस्ती केली तेथील रस्ते उखडले आहेत. रस्ते खराब झाल्याने सर्वत्र चिखल झाला असून, काही ठिकाणी खड्ड्यात पाणी साचत असून, वाहनधारकांना याचा कुठलाही अंदाज येत नसल्याने अपघात होण्याची भीती आहे. तसेच खड्ड्यांमुळे नागरिकांची हाडे खिळखिळी होत असून, हाडांचे आजार जडण्याची शक्यता आहे. जेलरोड ते नांदूर नाका, दत्त मंदिर रोड, नाशिक-पुणे महामार्ग, द्वारका, टाकळी रोड, पंचवटी, सिडको, सातपूर या परिसरातील काही ठिकाणचे रस्ते पूर्णपणे उखडून गेले आहेत. महापालिकेकडून तात्पुरती डागडुजी केली जाते. परंतु काही दिवसांतच रस्त्यांवर खड्डे पडत आहेत. त्यातच खड्ड्यांत मातीच टाकली गेल्याने रस्त्यावर सर्वत्र चिखलाचे साम्राज्य झाले आहे. ठेकेदारांकडून निकृष्टपणे काम केले जात असून, त्यांच्यावर पालिका प्रशासनाचा कुठेही वचक नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

### येथे खड्डेच खड्डे

रविवार कारंजा, पेठरोड, पेठ नाका सिग्नल, निमाणी बसस्थानक, मेळा बसस्थानक, दिंडोरी नाका यांसह परिसरात खड्ड्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. पेठरोडवासीयांची खराब रस्त्यातून सुटका होत नसल्याने येथील नागरिकांचा महापालिकेविरोधात मोठा रोष आहे.


निमाणी बसस्थानक


मेळा बसस्थानक



सीबीएस परिसर


पेठरोड


रविवार कारंजा सर्कल


दिंडोरी नाका

(सर्व छायाचित्रे : रविकांत ताम्हणकर)



जेलरोड परिसरातील रस्त्यांची अवस्था वाईट असून, अधिकारी येथे अपघात होण्याची वाट पाहत आहेत. नागरिक कोट्यवधींचा कर भरूनही त्यांना चांगले रस्ते मिळत नाहीत. महापालिकेच्या बांधकाम विभागाने जेलरोड परिसरातील रस्ते दुरुस्ती तात्काळ करावी; अन्यथा शिवसेना ठाकरे गटाकडून पालिकेविरोधात जनआंदोलन करावे लागेल.

**- सागर भोजने,** उपमहानगरप्रमुख, ठाकरे गट



भगूर येथील नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला. याविरोधात भगूर नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच नाशिक शहरात जागोजागी मोठाले खड्डे पडले आहेत. नाशिकरोडमध्येही परिस्थिती भयानक असून, येथील उपअभियंता काय करताय. भगूरसारखीच घटना शहरात होण्याची वाट पाहिली जात आहे का? मनपा प्रशासनाने तात्काळ खड्डे दुरुस्ती करावी; अन्यथा प्रहारकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल.

**-शरद शिंदे,** जिल्हाध्यक्ष, प्रहार संघटना, नाशिक



# फेरीवाला बाजारशुल्क वसुलीचे खासगीकरण नको

## श्रमशक्ती कामगार संघटनेची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक महानगरपालिकेने फेरीवाला बाजारशुल्क वसुलीचे खासगीकरण करण्याकरिता जाहिरात निविदा काढून खासगीकरण करण्याचे काम सुरू केले आहे. त्याला श्रमशक्ती कामगार संघटनांचा विरोध असून, सर्वप्रथम नाशिक महानगरपालिकेने नाशिक शहरातील बायोमेट्रिक झालेले सर्व फेरीवाले हॉकर्स यांची अनेकांची नावे हे त्यामधून गहाळ झाली आहे.**

प्रथम त्या यादीमध्ये समाविष्ट करावे. नाशिक महानगरपालिकेने त्यांच्या पद्धतीने हॉकर्स झोन निर्माण केले आहे. प्रथम नाशिक शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या भागांमध्ये फेरीवाले हॉकर्स हे गेले ५० वर्षांपासून त्या ठिकाणी काही लोक व्यवसाय करत आहे. अशी ठिकाणे हॉकर्स झोनमध्ये समाविष्ट करावे.

हॉकर्स झोन नाशिक महानगरपालिकेने पुन्हा सर्व्हे करून हॉकर्स झोन तेथील फेरीवाले हॉकर्स यांना विचारात घेऊन ते करावे. एकीकडे राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंतर्गत नाशिक महानगरपालिकेने फेरीवाला क्षेत्राकरिता निवडणूक प्रक्रिया सुरू केली असताना, दुसरीकडे या फेरीवाला बाजारशुल्क वसुलीचे खासगीकरणाचा घाट रचला जात आहे.

तो आम्ही कधीही यशस्वी होऊन देणार नाही. प्रथमतः स्थानिक भूमिपुत्र असलेल्या फेरीवाल्यांना न्याय द्या, अन्यथा श्रमशक्ती कामगार संघटना मोठ्या स्वरूपात आंदोलन छेडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा श्रमशक्ती कामगार संघटनेचे अध्यक्ष वसंत ठाकूर यांनी निवेदनाद्वारे दिला.

यावेळी संतोष दाते, सरचिटणीस अक्षय परदेशी, धोंडीराम बोडके, मीराताई साबळे, दत्ता कोळपकर, लक्ष्मीकांत तांबोळी, अहमद पटेल, संतोष हिवाळे, अरविंद साबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रस्त्याचे निकृष्ट काम : ठेकेदारांना काळ्या यादीत टाका

## मनसेची मागणी; अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रदीप चौधरी यांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहरातील चांगले रस्ते गॅस पाइपलाइन टाकण्यासाठी खोदण्यात आले. परंतु त्यानंतर ते रस्ते पुन्हा व्यवस्थित करण्यात आले नाही. तसेच स्मार्ट सिटीने विकासकामांच्या नावाखाली खोदलेले रस्ते व कामे अर्धवट सोडल्याने गणेशोत्सवात याचा त्रास नागरिकांना होणार आहे. शहरातील जुन्या रस्त्यांवर खड्डे नसून, नवीन केलेल्या रस्त्यांवर खड्डे पडल्याने ठेकेदारांनी केलेले काम हे निकृष्ट दर्जाचे आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदारांची चौकशी करून दोषी ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी मागणी मनसेचे माजी सभागृहनेते दिलीप दातीर यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रदीप चौधरी यांना देण्यात आले.**



अमित गांगुर्डे, निखिल सरपोतदार, गणेश मोरे, ललित वाघ, सौरभ खैरनार, योगेश पाटील, कुणाल पाटील, दर्शन बोरसे, किशोर वडजे, दीपक नवले आदी महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते. शहरातील इतर ठिकाणच्या रस्त्यांवर पावसाच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे नागरिकांनी वारंवार तक्रार केल्यावर यातील मोजकेच खड्डे पेव्हरब्लॉक तसेच फक्त माती टाकून खड्डे बुजवले गेल्याने ते पुन्हा जैसे थे झाले.

खड्ड्यांमध्ये पेव्हरब्लॉक टाकल्याने रस्त्यापेक्षा पेव्हरब्लॉक उंच होऊन वाहनांच्या टायरला त्याचा हादरा बसल्याने अनेक अपघात होऊन काही नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहे. त्याचबरोबर खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग कमी होऊन ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होते. वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिकेला जाण्यासाठी विलंब होत असल्याने रुग्णांचे हाल होताना दिसत आहे.


नाशिक शहरातील विविध ठिकाणी विशेषतः संध्याकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने वाहतूक सुरळीत करण्यासाठी पूर्वीप्रमाणे ट्रॅफिक वॉर्डनची नेमणूक करण्यात यावी. शहरातील सर्व खड्डे पावसाळी डांबर टाकून बुजवावे, अन्यथा मनसे तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन उभारेल. त्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास मनपा प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

# जिल्हा उद्योग मित्रची आज बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्हा उद्योग मित्रच्या बैठकीला अखेर मुहूर्त सापडला असून, आज दिनांक २७ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा उद्योग मित्रच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

तब्बल आठ महिन्यांनंतर या बैठकीचे आयोजन करण्यात आल्यामुळे उद्योजकांमध्ये नाराजीचा सूर दिसून येत आहे. यापूर्वी दिनांक २८ डिसेंबर २०२३ ला झालेल्या जिल्हा उद्योग मित्रच्या बैठकीनंतर थेट ऑगस्ट महिन्यात बैठक होत असल्यामुळे उद्योजकांचे प्रश्न किती जबाबदारीने आणि तत्परतेने सोडवले जातील, अशी शंका उद्योजक व्यक्त करत आहेत. मागील जिल्हा उद्योग मित्रच्या बैठकीमध्ये उद्योजकांच्या प्रश्नांसाठी मनपा, वीज वितरण कंपनी व एमआयडीसी यांच्या स्वतंत्र बैठका घेऊन बैठकीतले प्रश्न मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी विषय पत्रिकेवर ६० विषय नमूद करण्यात आले होते. त्यात ४८ विषय हे पत्रिकेतील विषय होते, तर बारा विषय हे आयत्यावेळी आलेल्या विषयांमध्ये उपस्थित झालेले होते. दरम्यानच्या काळात एमआयडीसीच्या तीन बैठका झाल्या. महावितरणने एक बैठक घेतली. मात्र, सर्वांत जास्त तक्रारी असलेल्या मनपा प्रशासनाला या बैठकीबाबत फारशी उत्सुकता दिसून आली नाही. उद्योजक संघटना निमाच्या वतीने सात ते आठ स्मरणपत्र देऊनही एकही बैठक त्यांनी घेतलेली नसल्याबद्दल उद्योजक नाराजी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे या बैठकीला केवळ सोपस्कार म्हणावे काय, असा सवाल उद्योजकांकडून उपस्थित केला जात आहे.



जिल्हा उद्योग मित्र बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी जलद शर्मा असणार असून, त्यांच्याकडे मनपाचाही प्रभारी कारभार असून, त्यांनी मनपाशी निगडित कामाबाबत प्रभावी निर्णय घ्यावेत अशी उद्योजकांना अपेक्षा आहे. बैठकीला सर्व निर्णयक्षम अधिकाऱ्यांची उपस्थिती राहावी, अन्यथा उद्योजकांकडून वॉक आऊट केले जाईल.

**- धनंजय बेळे,** अध्यक्ष, निमा

# फेरलिलावातही गणपती स्टॉलला प्रतिसाद नाही

## पालिकेला आर्थिक फटका; अवघ्या ४८ गाळ्यांचा लिलाव

**नाशिक : प्रतिनिधी**

**मागील वर्षीप्रमाणेच यंदाही गणेशमूर्ती विक्री स्टॉलकडे विक्रेत्यांनी पाठ फिरवली असून, फेरलिलावातही कोणीही व्यावसायिक या लिलावाकडे फिरकले नसल्याचे दिसून आले. अवघ्या ४८ गाळ्यांचाच लिलाव होऊ शकल्याने महापालिकेच्या महसुलास याचा फटका बसला आहे. रविवारी (दि.२६) महापालिकेने सहाही विभागांसाठी गणपती स्टॉलकरिता फेरलिलाव ठेवण्यात आला होता. परंतु सलग दुसऱ्यांदा व्यावसायिकांनी प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून आले.**

मनपाला पहिल्या लिलावातच बंपर प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र, अल्प प्रतिसाद लाभला. त्यानंतर दुसरा लिलाव झाला. त्यात केवळ तीनच स्टॉलचा लिलाव झाला. विक्रेत्यांचा प्रतिसाद लाभला नाही. गोल्फ क्लब ईदगाह मैदान येथे ५० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. संदीप हॉटेलसमोरील मोकळ्या जागेत १० तर गंगापूर रोडवरील माणिकनगरमधील शिवसत्य मैदानात ५ स्टॉल उभारण्यात येणार असून, त्यांचा लिलाव मनपाचे विभागीय कार्यालय, नाशिक पश्चिम येथील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. राणेनगर, चेतनानगर येथील युनिक मैदानाशेजारी शारदा विद्यालयासमोरील मोकळ्या भूखंडावर १० स्टॉल उभारले जाणार आहेत. साईनाथनगर सिग्नल भाजी मार्केट शेजारील जागेत एक, इंदिरानगर उपकार्यालय परिसरात दोन, शिवाजीवाडी भारतनगर येथे दोन जागांवर स्टॉल उभारण्यात आले होते. दरम्यान, सात सप्टेंबरला गणपतीचे आगमन होत आहे. त्यादृष्टीने मनपाने शहरातील सहाही विभागात खुल्या ४६९ जागांवर गणेशमूर्ती स्टॉल विक्रीची तयारी केली. पहिला लिलाव पार पडला. परंतु त्यास अपेक्षित असा प्रतिसाद लाभला नाही. अवघ्या ४५ स्टॉलचा लिलाव होऊ शकला. सातपूर व नाशिक पश्चिमला तर लिलावाचे खातेही उघडू शकले नाही. नाशिक पश्चिम, पंचवटी व सातपूर या तीन विभागांत एकाही स्टॉलचा लिलाव झाला नाही. नाशिक पश्चिममध्ये एकूण ६५ स्टॉलचे नियोजन करण्यात आले होते. गेल्या वर्षीही या विभागातून विक्रेत्यांनी पाठ फिरविली होती. पंचवटीतून ४२ तर सातपूरमधून १८ स्टॉलचा लिलाव करण्यात येणार होता.

### दर कमी करूनही अपयश

गतवर्षीच्या तुलनेत महापालिकेने यंदा गणेशमूर्ती स्टॉलच्या संख्येत वाढ करून व लिलावाचे दरही कमी केल्यानंतर स्टॉल लिलावाकडे विक्रेत्यांनी पाठ फिरविली आहे. गतवर्षी २२० तर यावर्षी ४६९ म्हणजेच तब्बल २४९ जागांची वाढ करूनही मनपाच्या महसुलावर पाणी फेरले गेले आहे. महत्त्वाचे म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत १८ जागांचा लिलाव आणखी कमी झाला. पालिकेला गणेशमूर्ती विक्री स्टॉल, कालिका जत्रा स्टॉल लिलावातून आर्थिक उत्पन्न मिळते. मात्र, मागील काही दिवसांपासून गणेशमूर्ती स्टॉल लिलावाकडे विक्रेते पाठ फिरवत असल्याचे चित्र आहे.

| विभाग | शिल्लक | लिलाव |
|---|---|---|
| पंचवटी | ५ | ० |
| सिडको | ४२ | १२ |
| सातपूर | १८ | ० |
| नाशिक पश्चिम | ६५ | ० |
| नाशिक पूर्व | १५ | १ |
| नाशिकरोड | ३२४ | ३५ |
| एकूण | ४६९ | ४८ |

# संपादकीय

## भावनांना जखम

महाराष्ट्राचे आराध्यदैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी महाराष्ट्रातीलआणि देशातील तमाम जनतेला नीतांत आदर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा गौरव सर्वच राजकीय पक्ष सतत करत असतात. महाराष्ट्रात सर्वच राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना शिवाजी महाराज यांचे नाव घेतल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. अठरापगड जातींना एकत्रित करुन मुघल आणि परकियांविरुध्द लढून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करुन रयतेचे रक्षण केले. त्यांच्याबद्दल सर्वांनाच आदर आहे. त्यांना आराध्यदैवत म्हटले जाते. शिवाजी महाराजांची प्रतिमा असो की पुतळा मराठी मराठी माणूस त्यापुढे नतमस्तक होत असतो. शिवाजी महाराजांविषयी वादग्रस्त लिखाण, वक्तव्ये मराठी माणसाने कधीही सहन केले नाहीत. हे लक्षात घेता छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोठेतरी कोसळला असेल, तर शिवप्रेमींच्या मनाला जखम होणे स्वाभाविक आहे. पंतप्रधान नरेंद मोदी यांनी अनावरण केलेला पुतळा आठ-नऊ महिन्यांत पडलाच कसा? या पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार झाला काय? पुतळ्याचे बांधकाम निकृष्ट झाले होते काय? पुतळा पडल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा सरकारने अवमान केला नाही काय? या घटनेला जबाबदार कोण? पुतळा उभारण्यात घाई केली गेली काय? असे अनेक प्रश्न उपस्थित नागरिकांनी उपस्थित केले आहेत. या संपूर्ण घटनेची चौकशी करुन दोषींना शासन करण्याची मागणीही केली जात आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा सोमवारी २६ ऑगस्ट रोजी अचानक कोसळला. यावरुन शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. शिवाजी महाराजांना भारतीय नौदलाचे संस्थापक संबोधले जाते. भारतात दरवर्षी नौदल दिन ४ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. गेल्यावर्षी पंतप्रधान नरेंद मोदी यांनी नौदल दिनाचे औचित्य साधून ४३ फूट उंचीच्या महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण मोठ्या उत्साहात केले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार आणि नौदल प्रमुख ॲडमिरल आर. हरी कुमार यांच्यासह लोकप्रतिनिधी, नौदल व शासकीय अधिकारी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनावरण करुन लोकार्पण केलेला हा पुतळा अवघ्या आठ-नऊ महिन्यांतच पडला. याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पण, या घटनेचे राजकारण केले जात आहे. विरोधकांच्या निशाण्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच असतात. मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या अयोध्येतील



राममंदिरात गळती होत असल्याचे लक्षात आले तेव्हा पंतप्रधानांवर टीका करण्यात आली. मोदींनी उद्घाटन केलेल्या नवीन संसद भवनालाही गळती लागली तेव्हा अशीच टीका करण्यात आली. आता त्यांच्याच हस्ते अनावरण झालेल्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पडल्याने मोदींवर टीका होत आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक येत्या चार महिन्यांत होणार असून, निवडणुकीची तयारी सर्वच राजकीय पक्षांनी सुरू केली आहे. सरकारची 'लाडकी बहीण' योजना जोरात सुरू असताना बदलापूर घटनेने सत्ताधारी महायुतीची कोंडी करण्याची एक संधी विरोधकांना मिळाली. आता शिवाजी महाराज यांचा पुतळा विरोधकांच्या हातात आला आहे. राजकोट येथील पुतळा कशामुळे पडला, याचे कारण समोर आलेले नाही. वादळी पावसात ताशी ४५ किमी वेगाने वारे वाहत असल्याने पुतळा पडला असण्याची शक्यता जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. हा पुतळा नौदलाकडून उभारण्यात आला होता, असेही त्यांनी सांगितले. पुतळा कोणी उभारला याला राजकीयदृष्ट्या महत्व नाही. पुतळ्याचे अनावरण पंतप्रधानांच्या हस्ते आणि राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थित झाल्याचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. पुतळ्याच्या बांधकामात, तो पुतळा बसवण्यात जो काही हलगर्जीपणा झाला काय? या कामात भ्रष्टाचार झाला आहे काय? याची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने समिती नेमली पाहिजे, अशी मागणी स्थानिक शिवसेना ठाकरे गटाचे आमदार वैभव नाईक यांनी केली आहे. संतापाच्या भरात आ. नाईक यांच्या समर्थकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची तोडफोड केली असल्याचे वृत्त आहे. पुतळ्याची देखभाल आणि निगा राखण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होती. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ही घटना घडल्याचा आरोपही नाईक यांनी केला आहे. या घटनेबाबत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज संभाजीराजे भोसले यांनी उपस्थित केलेला प्रश्न महत्वाचा आहे. हा पुतळा खूप घाईगडबडीत उभा केला होता. तसेच हा पुतळा आकारहीन व शिल्पशास्त्रास अनुसरून बनवला नव्हता. त्यामुळे आम्ही हा पुतळा बदलण्याची मागणी केली होती. मात्र सरकारने याकडे दुर्लक्ष केलं असे विधान संभाजीराजे यांनी केले आहे. पंतप्रधान आणि केंद्र सरकारला यासंदर्भात पत्र पाठवले होते. याचा अर्थ त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. राहिला प्रश्न तो पुतळा परत उभारण्याचा. तो तर उभारावा लागणार आहे. मुखमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी तसे म्हटलेही आहे. विधानसभा निवडणुकांपूर्वी नवीन पुतळा उभारण्याची घाई केली जाऊ शकते, याकडे संभाजीराजेंनी लक्ष वेधले आहे. या ठिकाणी पुन:श्च महाराजांचे उचित स्मारक उभारणे गरजेचेच आहे. पण, निवडणुकीच्या आधी ते उभारण्याच्या इर्षेत परत काही गडबड करू नये. उशीर होऊ दे, पण शास्त्रोक्त पद्धतीने या स्मारकाची पुनर्बांधणी झाली पाहिजे, अशी त्यांनी केलेली मागणी रास्त आहे. आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता, महाविकास आघाडीतील नेत्यांनी पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महायुती यांना धारेवर धरणे अपेक्षितच आहे. पण, या घटनेची सखोल चौकशी करणेही तितकेच महत्वाचे आहे. केवळ ऐछ-नऊ महिन्यांत पुतळा पडत असेल, तर त्याला यंत्रणा जबाबदार आहे. यापुढे कोणताही पुतळा बसविताना योग्य ती काळजी घेण्याची जबाबदारी सरकार आणि संबंधित विभागाने घेणेही तितकेच महत्वाचे आहे. पुतळा पडल्याची घटना दुर्दैवी आहे. त्यामुळे तमाम शिवप्रेमींना दु:ख झाले आहे. त्याच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.

## विचारधन



### समाधान हा वृत्तीचा गुण, देहाचा नव्हे

सर्व ठिकाणी राम भरलेला जो पाहील त्यालाच समाधान मिळेल. ज्या घरात समाधान, तेथे भगवंताचे राहणे जाण. जे घडते ते भगवंताच्या इच्छेने घडते, अशा खऱ्या भावनेने एक वर्षभर जो राहील, त्याला समाधान हे काय ते खात्रीने कळेल. समाधान हा वृत्तीचा गुण आहे, देहाचा नव्हे. प्रपंचाबद्दल काहीही न सांगणारा आणि अत्यंत समाधान असणारा मनुष्य भेटावा असे वाटते. त्याच्या मागे सारे जग लागेल. जगामध्ये आपल्याला समाधान कुणी देत नाही. समाधानाला निष्ठेची अत्यंत जरुरी आहे. पांडवांना वनवासात जे समाधान होते, ते राज्यपदावर असणाऱ्या कौरवांना नव्हते. म्हणून परमात्मा ठेवील त्यामध्ये सुखी राहावे. 'ठेविले अनंतें तैसेंचि राहावें । चित्तीं असो द्यावें समाधान।।' हेच संतश्रेष्ठ तुकारामबुवांचेही सांगणे आहे. भगवंताची देणगी सर्व बाजूंनी गोड असली पाहिजे. पैसा ही भगवंताची देणगी नव्हे; त्याने तळमळ आणि अतृप्ती होते. खरोखर, समाधान हीच भगवंताची देणगी होय. मनुष्याला किती असले म्हणजे पुरे होईल हे ठरलेले नाही. आहे त्या परिस्थितीत आपण समाधान मानले की, जे आहे ते पुरेल. ज्याचे मन समाधानात आहे, त्याचे शरीर कसेही असले तरी चालेल. समाधानालाच खरे महत्त्व आहे. घेण्यापेक्षा देण्यामध्येच फार समाधान आहे. शिवाय, घेण्याला काही अंतच नाही. कितीही मिळाले तरी आपली मागण्याची बुद्धी कायम राहते. पण आपले सर्व काही दिले की देण्याला अंत आला, म्हणून त्यामध्ये समाधान आहे. आपण उपाधीने झाकले गेलो आहोत. एक एक उपाधी टाकीत गेले तर आपले खरे स्वरूप प्रकट होईल. तिथे खरे समाधान होते. 'राम कर्ता आहे' ही भावना होणे हे वासनेचे मरण होय. मनुष्य काही तरी हेतू ठेवून कर्म करतो. पण प्रत्येक ठिकाणी 'भगवंताच्या इच्छेने काय व्हायचे आहे ते होऊ दे', असे अनुसंधान असेल तर फलाविषयी सुखदु:ख राहणार नाही. आपल्याला सगळे कळते, पण आयत्या वेळेला आपण विसरतो. आलेली ऊर्मी आपण सहन करावी. दिवा बरोबर नेला की अंधार नाहीसा होतो, तसे अनुसंधानाचा दिवा बरोबर न्यावा, म्हणजे आपण आपल्या ऊर्मींना आवरू शकू. प्रत्येकाचा रोग निराळा असला तरी औषध एकच आहे, ते म्हणजे भगवंताचे अनुसंधान. हे औषध जरी चांगल्या डॉक्टरकडून घेतले, तरी रोग्याला पथ्ये सांभाळावीच लागतात. शास्त्राने, सद्धर्माने आणि अभ्यासाने वागून अनुसंधानात राहणे जरूर आहे. अनुसंधानाने जे साधेल ते शतकोटी साधनांनी साधणार नाही. असे अखंड नामानुसंधान म्हणजेच खरी भक्ती.

# श्रीकृष्ण जन्मोत्सव : आनंदाचा महासागर!

**बाल कृष्ण हा फार प्रिय होता. असे मानले जाते की, बाल कृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर गोपाळकाला तयार करून सर्व वाटून खात असत. गोमंतकातील काल्याला गवळण कालासुद्धा म्हटले जाते. हे एक मिश्रण पौष्टिक आहार असते, म्हणूनही गोकुळाष्टमीचे महत्त्व अधिक आहे. कोकणात व महाराष्ट्रात उत्सवानिमित्त दहीकाला होतो. या ठिकाणीही हंड्या फोडून तर काही ठिकाणी गोपाळकाला होतो. गोकुळाष्टमीचे एक व्रतही सांगितले असून, ते केल्याने संतती, संपत्ती व वैकुंठ लोक यांची प्राप्ती होते, असे वयोवृद्ध सांगतात.**

हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार सृष्टी पालनकर्ता श्रीहरी विष्णूचे अठरावे अवतार प्रभू श्रीकृष्ण आहे. म्हणून त्याच्या जन्मदिवशी गोकुळाष्टमी साजरी केली जाते. त्याच्याबद्दल सांगायचे झाले तर त्यांनी आपल्या भूतलावर म्हणजे पृथ्वीवर एक साधारण माणसाचा जन्म घेतला होता. त्याचा जन्म हा मानवधर्माचे रक्षण करण्यासाठी झाला होता. त्यामुळे संपूर्ण भारतभर हजारो वर्षांपासून हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गोकुळाष्टमी भारतामध्ये वेगवेगळ्या भागांत वेगवेगळ्या पद्धतीने भ. श्रीकृष्ण मूर्तीचे पूजन करून केले जाते. त्यास कान्होबा बसविणे किंवा मांडणे म्हटले जाते. काही ठिकाणी भक्ती संगीत गायले जाते. तर काही ठिकाणी कृष्णमूर्तीला दही दुधाचा अभिषेक घातला जातो. श्रीकृष्ण जयंती व जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी हा सण भारतामध्ये खूप आनंदाने साजरा केला जातो. या दिवशी भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला होता. त्यामुळे संपूर्ण भारतामध्ये त्यांच्या जन्मदिवशी कान्होबा बसविणे वा दहीहंडीसारखे कार्यक्रम साजरे केले जातात. या दिवशी भगवान श्रीकृष्णाला वेगवेगळ्या नावांनी बोलावले जाते. जसे की गोविंद, बालगोपाल, कान्हा, कान्होबा, गोपाल, केशव ही सर्व श्रीकृष्णांची प्रसिद्ध नावे आहेत. गोकुळाष्टमी ही भगवान श्रीकृष्णाच्या जन्मापासून हिंदू पंचांगानुसार भाद्रपद महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या आठव्या दिवशी प्रत्येक वर्षी साजरी केली जात असल्याचे सांगितले जाते.

भ. श्रीकृष्णाचा जन्म श्रावण महिन्यात वद्य अष्टमीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदीशाळेत झाला. म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. अष्टमीच्या दिवशी काही लोक व्रतसुद्धा करतात. या दिवशी एकभक्त राहून पांढऱ्या तिळाचा कलप अंगाला लावून स्नान करतात. व्रताचा संकल्प करून देवघर फुले व पाकळ्यांनी सुशोभित करतात. त्या स्थानी देवकीचे सुतीकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि श्रीकृष्ण यांच्या मूर्तीची स्थापना करतात. बाजूला यशोदा व तिची नवजात कन्या, वसुदेव व नंद यांच्याही मूर्ती बसवतात. त्या वेळी मथुरेमधील राजा अत्याचारी कंस याला प्रजा कंटाळली होती. तो प्रजेला असह्य यातना आणि त्यांच्यावर फार जुलूम करत होता. त्यामुळे तेथील प्रजा खूपच दु:खी व कष्टी होती. लोकांना त्या अत्याचारी राजापासून मुक्ती देण्यासाठी भ. श्रीकृष्णाने पृथ्वीवर जन्म घेतला. गोकुळाष्टमी यानिमित्त होणारी हालचाल संपूर्ण भारतामध्ये दिसून येते. त्याचबरोबर परदेशी



राहणाऱ्या भारतीय लोकांतसुद्धा गोकुळाष्टमी खूप धुमधडाक्यात

**गोकुळाष्टमी**

**के. जी. निकोडे**
७७७५०४१०८६

साजरी केली जाते. भ. श्रीकृष्णाने पृथ्वीवर देवकी आणि वासुदेव यांच्या पोटी जन्म घेतला. भ. श्रीकृष्णाच्या जन्माच्या वेळेस आकाशवाणी झाली होती की, देवकीचा आठवा पुत्र कंसाचा वध करेल. कंसाच्या अत्याचारांनी संपूर्ण मथुरा नगरी त्रस्त झालेली होती. त्याच्या राज्यात राज्यांमध्ये निर्दोष लोकांनासुद्धा शिक्षा केली जाई. आपल्या मृत्यूच्या भीतीने त्याने एवढेच नव्हे तर आपली बहीण देवकी आणि तिचा पती वासुदेव यांनासुद्धा काळ कोठळीमध्ये टाकले होते. एवढेच नव्हे तर कंसाने आपल्या अत्याचाराने देवकीचे सहा पुत्रही आधीच मारून टाकले होते.

भ. श्रीकृष्णांच्या जन्मदिवशी आकाशामधून घनघोर पावसाचा वर्षाव होण्यास सुरुवात झाली. बाल कृष्णाला सुरक्षित स्थानावर घेऊन जाण्यासाठी वसुदेव यांनी त्याला एका टोपलीत घेतले. यमुना नदी पार करत त्यांनी त्याला आपला मित्र नंद गोपालकडे नेले आणि त्यांनी आपल्या पुत्राला- बाल कृष्णाला यशोदा मातेपाशी झोपून ठेवून त्यांची कन्या घेऊन परत आले. अशा प्रकारे देवकीपुत्र भ. श्रीकृष्णाचे पालन-पोषण यशोदा मातेने केले. अशाप्रकारे भ. श्रीकृष्णाच्या दोन माता होत्या, एक जन्मदात्री आणि दुसरी पालनकर्ती. एक म्हणजे देवकीमाता आणि दुसरी म्हणजे यशोदामाता होय.


बाल कृष्ण हा फार प्रिय होता. असे मानले जाते की, बाल कृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर गोपाळकाला तयार करून सर्व वाटून खात असत. गोमंतकातील काल्याला गवळण कालासुद्धा म्हटले जाते. हे एक मिश्रण पौष्टिक आहार असते, म्हणूनही गोकुळाष्टमीचे महत्त्व अधिक आहे. कोकणात व महाराष्ट्रात उत्सवानिमित्त दहीकाला होतो. या ठिकाणीही हंड्या फोडून तर काही ठिकाणी गोपाळकाला होतो. गोकुळाष्टमीचे एक व्रतही सांगितले असून, ते केल्याने संतती, संपत्ती व वैकुंठ लोक यांची प्राप्ती होते, असे वयोवृद्ध सांगतात. सप्तमीच्या मध्यरात्री सुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सहपरिवार भ. श्रीकृष्णाची पूजा करतात. अष्टमीच्या दिवशी देवालाही फराळ, नैवेद्य दाखवतात. गोपाल म्हणजे गायीगुरे व कायद्याचे पालन करणाऱ्या या भ. श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने दुसऱ्या दिवशी- गोपाळकाल्याच्या दिवशी काल्याचा प्रसाद केला जातो. यामध्ये काला म्हणजे एकत्र मिळवणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, लिंबू व आंब्याचे लोणचे, दही, भिजवलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी आदी घालून एक खाद्यपदार्थ तयार होतो, त्यास गोपालकाला असे म्हणतात.

श्रीकृष्णभक्त गोकुळाष्टमीच्या उत्सवावर उपवास ठेवत असतात, मंदिरांना सजवले जाते तसेच गोपाळमूर्तीला पाळण्यात ठेवून झोका दिला जातो. भजन-कीर्तन केले जाते आणि त्यासोबतच तरुणांमध्ये दहीहंडी फोडण्याची स्पर्धा घेतली जाते. श्रीकृष्णनगरी मथुरामध्येसुद्धा दुरून दुरून भक्तमंडळी दर्शनासाठी येत असतात. त्या दिवशी संपूर्ण मथुरानगरी भ. श्रीकृष्णाच्या नामोच्चाराने दुमदुमून जाते. श्रीकृष्णाच्या लहानपणी लोणी, दही, दूध आपल्या मित्रांसोबत एकत्र येऊन चोरून खाण्याचा प्रयत्न करीत असत. दही हे त्यांचे आवडते खाद्य होते. म्हणून दहीहंडी महोत्सव त्यांच्या आठवणीनिमित्त साजरा केला जातो. उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपाळकाला असे म्हणतात.

कृष्णजयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात विशेषत कोकणात या सणानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीकाला केला जातो. त्याचे जेवण करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे गोविंदा आला, गोकुळात आनंद झाला. असे गाणे म्हणत लहान-मोठे पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात. कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून श्रीकृष्ण चरित्रातील सोंगे करण्याचीही प्रथा आहे. या दिवशी महाराष्ट्रात मुंबई येथे उच्च मडक्यात दही, दूध यांनी भरलेला हंडा ठेवून तिथपर्यंत मानवी मनोरेची स्थापना करून दहीहंडा फोडण्याचा साहसी खेळ होतो. अशाप्रकारे गोकुळाष्टमी भारतातील विविध राज्यात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरी केली जाते.

# अजरामर पार्श्वगायक मुकेश

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा आज



स्मृतिदिन. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथुर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथुर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते. त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपटसृष्टीचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई-वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या, मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही. त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात

**स्मृतिदिन**

**श्याम ठाणेदार**
९९२२५४६२९५

त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपटसृष्टीत त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वत:ची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपटसृष्टीत मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते. तेव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपटसृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंतर राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला, मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. स्मृतिदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

# ताई, तू रडकी नाही तर लढ की म्हणणारे भाऊ पाठीशी..!

**कोलकाता येथे एका डॉक्टर मुलीवर अत्याचार करून तिचा निर्दयी खून झाला. बदलापूर येथे चिमुकल्या मुलींवर अतिप्रसंग किंवा राज्याच्या कानाकोपऱ्यात दररोज महिला, मुलींवर अत्याचार, अतिप्रसंग किंवा विनयभंगाचे प्रकार उघडकीस येत आहेत. त्याचे लोण नाशिकमध्येही पसरले आहेत. नराधमांना शिक्षा होणारच. परंतु छत्रपती संभाजीनगर येथील एका घटनेने मात्र संवेदनशील मनाला पुन्हा एकदा भयंकर त्रास झाला आहे. मन सुन्न झाले आहे...**

संभाजीनगर येथे डॉक्टर असलेल्या महिलेने पतीच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली आहे. संबंधित डॉक्टर पती प्रीतम सध्या फरार असला तरी एका महिलेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, मृत्यूला कवटाळण्यापूर्वी त्या डॉक्टर महिलेने लिहिलेली सुसाईड नोट नक्कीच डोक्यात मुंग्या आणणारी आहे. २६ वर्षीय प्रतीक्षा गवारे असे मृत डॉक्टर महिलेने आपल्या सुसाईड नोटमध्ये पतीवर असलेले निस्सीम प्रेम व्यक्त केले आहे. पतीने केलेला छळ आणि त्याच्या डोमिनेटिंग नेचरवर प्रकाश टाकला आहे. पतीने तिच्यावर केलेले चारित्र्याचे आरोप असो किंवा तिच्या माहेरच्या व्यक्तींशी बोलण्यास केलेली बंदी असो अथवा तिला वारंवार तिचा मोबाइल नंबरही बदलण्यास भाग पाडले. सात पानांची सुसाईड नोट जणू तिच्या जगण्याची व्यथाच सांगून गेली. पतीच्या मनधरणीसाठी आणि आपली संसारवेल फुलविण्यासाठी त्याच्या सर्व अटी-शर्थीही तिने



मान्य केल्या. संसारवेलीला एक अपत्यरूपी फुलही उमलाव यासाठीही तिने प्रयत्न केले. अखेर पतीच्या छळापुढे सर्वकाही सपशेल फेल ठरले आणि डॉ. प्रतीक्षाने जगण्याची प्रतीक्षा मृत्यूला कवटाळून संपवली. तिच्या सुसाईड नोटमधील शेवट अत्यंत हेलावणारा आहे. ती म्हणते की, डिअर अहो, तुमच्यासोबत मला जगायचं होतं, माणसानं एवढं पजेसिव्ह नसावं, मी तुमची प्रायव्हेट प्रॉपर्टी होते तर जपायचं होतं, मला तुमच्यापासून दूर जाण्याची अजिबात इच्छा नव्हती, तुम्ही मला कधी समजून घेतलं नाही. तुम्ही फक्त रिस्ट्रीक्सन्समध्येच ठेवले. मला नेहमी रडकीच म्हणत आलात. तुम्ही दिसायला गोड आहात, गोडच राहा..

**निमित्त**

**चंद्रमणी पटाईत**

आणि कधी माझ्यावर थोडं जरी प्रेम केलं असेल तर मला गच्च मिठी मारुन चितेवर ठेवा.. बाकी आयुष्य मला विसरून आनंदाने जगा...

हा तिचा एकतर्फी पत्रसंवाद वाचताना डोळ्यांतून आपसूकच अश्रू तरळून गेले. तिने आपल्या आत्महत्येला स्वत:च न्याय देण्याची भाषाही केली आहे. माझा न्याय मी स्वामींकडून घेईल अशी तिने म्हटले आहे. मात्र, कुणाची तरी लाडकी बहीण अशा पद्धतीने आपली जीवनयात्रा संपवत असेल तर महिला सक्षमीकरणाच्या गप्पा करणाऱ्यांसाठी ही चपराकच म्हणावी लागेल.

एकीकडे लाडक्या बहिणींसाठी सर्व स्तरातून प्रयत्न होत असताना एकीकडे महिलांवरील अत्याचार आणि महिलांच्या आत्महत्या मनाला हेलावून सोडत आहेत. त्यामुळे ज्या जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, माता रमाई, झाशीची राणी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आदी राष्ट्रमातांचा गौरव आपण करतो त्यांच्या वंशज असलेल्या या रणरागिणींना आज आत्महत्येचा विचार कसा शिवतो हेच कळेनासं झाले आहे. महाराष्ट्राला धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचा वारसा आहे. महिलांना देवीच्या स्थानी मानले जाते. मग या देवींनाच का असा निर्णय घ्यावा लागतो? आदिशक्तीची रूपे आपण महिलांमध्ये पाहतो मग या माता भगिनींवर अशी वेळ का यावी?

असो, आपल्या देशात रामज्य आल्याची भावना जर आपलाला रुजवायची असेल तर माता- भगिनींचा सन्मात, आदर आणि त्यांच्या कष्टाची कदर प्रत्येकाने करायला हवी. महिलांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्याची जबाबदारी समाज म्हणून आपणा सर्वांची आहे. महिलांवर हात टाकणाऱ्यांचे हात कलम करावे लागतील. विकृत प्रवृत्तींना वेळीच ठेचावे लागेल तरच डॉ. प्रतीक्षासारख्या बहिणींना खरी श्रद्धांजली ठरेल. महिलांनीही रडकी म्हणणाऱ्यांना प्रत्युत्तर देऊन लढवय्यी असल्याचे दाखवून दिले पाहिजे. त्यामुळे ताई तू रडकी नाही तर लढ की म्हणणारे भाऊ त्यांच्या पाठीशी उभे राहावेत एवढेच.

## जनमनाचे प्रतिध्वनी

### सण, उत्सवांचे विकृत स्वरूप

'सण आणि उत्सव' हे कुठल्याही समाजाचे प्रतिबिंब असतात. ते साजरे करण्यामागील मूळ धर्मशास्त्र समाजाला न शिकवल्याने त्यामध्ये आज अनेक अपप्रकार वाढले आहेत. त्यामुळे ते साजरे करताना सहस्त्र तरुणांचा वेळ वाया जाण्याबरोबरच वारेमाप पैसाही खर्च होत आहे. सणांचे मूळ स्वरूप पालटून त्यांचे अयोग्य असे व्यवसायीकरण आणि राजकीयकरण झाले आहे. परंपरा आणि संस्कृती यांच्या नावाखाली अत्यंत हिडीस आणि विकृत प्रथा रुजू होऊ लागली आहे. उदाहरणार्थ, जास्तीत जास्त उंचावर दहीहंडी बांधून सर्वांचे जीवन धोक्यात घालून, त्यासाठी भरपूर पैशांचे अशमिष दाखवून ती फोडण्यास प्रवृत्त करणे. तसेच सार्वजनिक गणेशोत्सवात सेवेच्या नावाखाली रात्री दारू पिऊन धिंगाणा घालणे, जुगार खेळणे. गणपती विसर्जन करताना सात्त्विक कृती न करता डीजेच्या तालावर हिडीस हावभाव करत नृत्य करणे. स्त्रियांची छेडछाड करणे. ही विकृती अशीच चालू राहिली, तर कालांतराने त्यावरच 'प्रथा आणि परंपरां'चे शिक्कामोर्तब होईल. देवतांची योग्य प्रकारे आराधना करणे, त्यासाठी समाजाला भक्तिमार्गाकडे वळवणे आणि समाजाचे संघटन करण्यासाठी धर्मशिक्षण देणे अतिशय आवश्यक आहे. तसेच अयोग्य प्रथा आणि परंपरांमुळे होणारी 'धर्महानी' लक्षात आणून देऊन अनेक उपक्रमांद्वारे समाजाचे विविध स्तरावर प्रबोधन करणे आवश्यक आहे. लोकमान्य टिळकांनी प्रबुद्ध (विद्वान) आणि प्रगल्भ समाज निर्माण करण्यासाठी 'गणेशोत्सव' आणि 'शिवजयंती' या उत्सवांचे सार्वत्रिकरण केले. प्रगल्भ नेतृत्वाच्या अभावी रस्ते अडवून आणि पूर्वजांनी घालून दिलेले सर्व नियम धाब्यावर बसवून साजरे होणारे आजचे सण, उत्सव, समारंभ आपल्या संस्कृतीचा ऱ्हासच दाखवत नाहीत काय?

**- स्मिता धुरी, मीरा रोड**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### 'सावली होईन सुखाची'च्या कलाकारांची नाशिकच्या अनाथाश्रमाला दिली भेट

**मुंबई :**



सन मराठीची लोकप्रिय मालिका 'सावली होईन सुखाची'च्या प्रमुख कलाकारांनी नुकतीच नाशिकच्या अनाथाश्रमाला भेट दिली. या मालिकेतील प्रमुख नायिका गौरी म्हणजेच सीमा कुलकर्णी हिने आश्रमातील मुलांसाठी खास स्वतःच्या हाताने स्वयंपाक करून, खाऊ घातलं . तसेच त्यांनी येथील मुलांना उपयोगी भेटवस्तू दिल्या. या अनोख्या उपक्रमामुळे येथील मुलांना खूप आनंद झाला आणि एक रोजचा साधा असा दिवस आनंददायक उत्सवात बदलला. त्यानंतर अभिनेता रोनक शिंदे आणि सीमा कुलकर्णी यांनी नाशिकच्या पवित्र काळाराम मंदिरात जाऊन आशीर्वाद घेतले. यावेळी अभिनेत्री सीमा म्हणाली, 'सावली होईन सुखाची'मध्ये साकारत असलेली गौरीची भूमिका ही माझ्या स्वतःच्या खूप जवळ जाणारी आहे. त्यामुळे एक अभिनेत्री म्हणून, माणूस म्हणून प्रगल्भ करणारी, आणि आत्मिक समाधान देणारी अशी ही भूमिका आहे. आजवर केलेल्या सर्व भूमिकांमध्ये माझी सर्वात आवडती भूमिका आहे. आज येथे येऊन या गोड गोड लहान बाळांसाठी स्वतःच्या हाताने खाऊ बनवण्यात आणि त्यांना खाऊ घालण्यात जे सुख मिळालं त्याला तोड नाही. त्यांचा आनंदी, तृप्त चेहरा पाहून मन भरून आलं. 'सावली होईन सुखाची'ही मालिका आपल्या सर्वांच्याच चांगल्या परिचयाची आहे. गेल्या एक वर्षांपासून रुद्र जो प्रयत्न करतोय तो प्रयत्न शेवटी फळाला आला. रुद्र ने गौरीचं मन जिंकलं आणि तिने लग्नाला होकार दिला. मालिकेमध्ये गौरी तिच्या आश्रमातल्या मुलांसाठी खूप कष्ट घेते. त्यांचं चांगलं संगोपन करते. त्यात रुद्र सुद्धा तिच्या पाठीशी खंबीर पणे उभा आहे. म्हणून आयुष्यातला हा नवीन प्रवास त्यांनी या मुलांच्या शुभेच्छा घेऊन, त्यांना काही भेट वस्तू देऊन सुरू केली. गौरी - रुद्रच्या नवीन प्रवासाची सुरूवात २४ ते ३१ ऑगस्टला रात्री ९ वाजता सन मराठीवर पाहायला मिळणारं आहे.

### चांदीची मागणी वाढली

**नवी दिल्ली :**

दिवसेंदिवस चांदीच्या मागणीत वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं यावर्षी चांदीची आयात दुप्पट होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २०२४ मध्ये भारतातील चांदीची आयात ६,५०० ते ७००० टनांपर्यंत वाढू शकते, ज्यामुळे जागतिक किमती देखील वाढण्याची शक्यता आहे. माहितीनुसार, भारतात चांदीची आयात यावर्षी जवळपास दुप्पट होणार आहे. हे सौर पॅनेल आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादकांकडून वाढत्या मागणीमुळे होत आहे. तसेच, सोन्यापेक्षा चांदी चांगला परतावा देईल, असा विश्वास गुंतवणूकदारांना वाटत आहे. जगातील सर्वात मोठ्या चांदीच्या ग्राहकाने केलेल्या उच्च आयातीमुळं जागतिक चांदीच्या किमतींना आणखी आधार मिळू शकेल, जे सध्या एका दशकापेक्षा जास्त काळातील सर्वोच्च पातळीच्या जवळ आहेत. गेल्या वर्षी भारताने ३,६२५ टन चांदीची आयात केली होती. मात्र, यावर्षी औद्योगिक मागणी वाढल्याने यावर्षी चांदीची खरेदी ६,५०० ते ७,००० टन दरम्यान होऊ शकते. २०२४ च्या पहिल्या सहामाहीत भारताची चांदीची आयात एका वर्षापूर्वी ५६० टनांवरून वाढून ४,५५४ टन झाली आहे. चांदीच्या दागिन्यांना पारंपरिक मागणी आहे. आता लोक गुंतवणुकीसाठीही खरेदी करत आहेत.

# सेन्सेक्स ५०० हून अधिक अंकांनी वाढला

**मुंबई :**

आठवड्याच्या पहिल्या व्यवहाराच्या दिवशी, सेन्सेक्स ५०० हून अधिक अंकांच्या वाढीसह ८१,६०० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. निफ्टी देखील १२० अंकांनी वाढून २४,९५० च्या पातळीवर व्यवहार करत आहे. सेन्सेक्समधील ३० समभागांपैकी २३ वाढत आहेत आणि ७ घसरत आहेत. ५० निफ्टी समभागांपैकी ४३ वधारत आहेत तर ७ घसरत आहेत. फार्मा, हेल्थकेअर आणि एफएमसीजी वगळता सर्व क्षेत्रीय निर्देशांक तेजीत आहेत.

एचडीएफसी बँक, इन्फोसिस, टी-सीएस आणि रिलायन्स बाजाराला अधिक चालना देत आहेत. बाजार वाढवण्यात कळ्ळ्ळ बँकेचे सर्वाधिक योगदान ७१.१५ अंकांचे आहे. तर, आयटीसी, आय-सीआयसीआय बँक आणि सन फार्मा बाजार खाली खेचत आहेत.

आशियाई बाजारात, जपानचा निक्की १.०९% आणि हाँगकाँगचा हँग सेंग ०.८५% वाढला. चीनचा शांघाय कंपोझिट ०.२६% आणि कोरियाचा कोस्पी ०.३२% घसरला.

२३ ऑगस्ट रोजी शेवटच्या व्यवहाराच्या दिवशी, अमेरिकन बाजारातील डाऊ जोन्स १.१४% च्या वाढीसह ४१,१७५ च्या पातळीवर बंद झाला.

प्रीमियर एनर्जी लिमिटेडची इनिशियल पब्लिक ऑफरिंग २७ ऑगस्ट रोजी उघडेल. या IPO साठी गुंतवणूकदार २९ ऑगस्टपर्यंत बोली लावू शकतील. कंपनीचे शेअर्स बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंजमध्ये ३ सप्टेंबर रोजी सूचीबद्ध केले जातील.

याआधी शुक्रवारी म्हणजेच २३ ऑगस्ट रोजी शेअर बाजारात वाढ झाली होती. सेन्सेक्स ३३ अंकांच्या वाढीसह ८१,०८६ वर बंद झाला. निफ्टीही ११ अंकांनी वाढून २४,८२३ च्या पातळीवर बंद झाला. सेन्सेक्समधील ३० समभागांपैकी १५ शेअर्स वर तर १३ खाली आले. निफ्टीच्या ५० समभागांपैकी २२ वर तर २८ समभाग खाली आले.

एनएसई क्षेत्रीय निर्देशांकांबद्दल बोलायचे तर, ऑटो क्षेत्र वगळता इतर



सर्वांमध्ये घसरण झाली. ऑटो सेक्टरमध्ये १.१२% वाढ झाली आहे. तर, निफ्टी रियल्टीमध्ये सर्वाधिक २.४३% ची घसरण झाली.

# बाजार स्टाइल रिटेलची प्रारंभिक सार्वजनिक समभागविक्री शुक्रवारपासून खुली होणार

**मुंबई :**

'व्हॅल्यू रिटेल' स्टोअर्सच्या साखळीव्दारे



पोशाख आणि सामान्य व्यापार विभागांतर्गत दर्जेदार आणि परवडणारी वस्त्र उत्पादने सादर करणारी आघाडीची व्हॅल्यू फॅशन रिटेलर कंपनी असलेल्या बाजार स्टाइल रिटेल लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी ५/- दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी समभागाची किंमत ३७० ते ३८९ अशी निश्चित केली आहे. कंपनीची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा ऑफर) शुक्रवार, ३० ऑगस्ट, २०२४ रोजी गुंतवणूकीसाठी खुली होत असून मंगळवार, ३ सप्टेंबर २०२४ रोजी बंद होणार आहे. गुंतवणूकदार किमान ३८ इक्विटी समभागांसाठी बोली लावू शकतात आणि त्यानंतर ३८ इक्विटी समभागांच्या पटीतही आणखी बोली सादर करु शकतील.

आयपीओमध्ये नवीन इश्यू अंतर्गत १४८ कोटी रुपयांपर्यंतचा निधी उभारला जाणार आहे आणि प्रवर्तक समुह समभागधारक तसेच गुंतवणूकदार समभागधारक यांच्याकडून केल्या जाणाऱ्या समभाग विक्रीत १,७६,५२,३२० इक्विटी समभाग हे प्रामुख्याने ऑफर फॉर सेल (ओएफएस) साठी समाविष्ट आहेत.

ताज्या समभागविक्रीतून मिळालेल्या रकमेपैकी १४६ कोटी रुपयांपर्यंतची रक्कम ही कंपनीने घेतलेल्या सर्व किंवा काही थकित कर्जाच्या काही भागाची पूर्वपरतफेड किंवा परतफेड करण्यासाठी तसेच सामान्य कंपनी कामकाजासाठी वापरली जाणार आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला, बाजार स्टाईल रिटेल लिमिटेडने व्होल्राडो व्हेंचर्स पार्टनर्स फंड खख कडे आपले ९,५६,०७२ इक्विटी समभाग खासगीरित्या ठेवले आणि ३८७ रुपये प्रति इक्विटी समभाग (प्रति इक्विटी समभागांसाठी ३८२ रुपयांच्या प्रीमियमसह) या दराने ३७ कोटी रुपयांचा निधी उभा केला. त्यामुळे नवीन समभागविक्रीव्दारे उभारल्या जाणाऱ्या रक्कमेत कपात झाली आहे.

टेक्नोपॅकच्या अहवालानुसार, २०१३ मध्ये स्थापना झालेल्या स्टाईल बाजार कंपनीचा पश्चिम बंगाल आणि ओडिशा राज्यांमधील संघटित मूल्याधारित रिटेलच्या बाजारपेठेत अनुक्रमे ३.०३ आणि २.२२ टक्के हिस्सा होता. सूचीबद्ध मूल्य रिटेल विक्रेत्यांच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२४ मध्ये पूर्व भारतात ग्राहकांचा सर्वात मोठा रिटेल फुटप्रिंट स्टाईल बाजारचाच आहे. द टेक्नोपॅकच्या अहवालानुसार व्ही टू रिटेल लिमिटेड आणि व्ही-मार्ट रिटेल लिमिटेड (लिस्टेड व्हॅल्यू रिटेलर्स) यांच्या तुलनेत स्टोअरची संख्या आणि कामकाजातील कमाई या दोन्ही बाबतीत, कंपनी २०१७ ते २०२४ दरम्यान सर्वात वेगाने वाढणारी रिटेल विक्रेता कंपनी ठरली. कंपनीचे बहुतेक स्टोअर्स 'स्टाईल बाजार' या ब्रँड नावाने चालवले जातात. कंपनीने गेल्या काही वर्षांमध्ये उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीद्वारे 'स्टाईल बाजार' हा आपला ब्रँड विकसित केला आहे. त्यामुळे ग्राहकांची कंपनीप्रती कायमस्वरुपी निष्ठा तयार झाली असून कंपनीची एक वेगळी ओळख तयार झाल्याचा स्टाईल बाजारचा विश्वास आहे.

कोलकाता-आधारित ही कंपनी रिटेल विक्रेते कपडे आणि सामान्य मर्चेंडाईज अशा वेगवेगळ्या विभागांतर्गत विविध पर्याय ग्राहकांना देते. पोशाख विभागात कंपनी पुरुष, स्त्रिया, मुले, मुली आणि लहान मुलांसाठी विविध डिझाइन्सची वस्त्रे सादर करते, तर सामान्य मर्चेंडाईज विभागात नॉन-पॅरेल्स आणि होम फर्निशिंग उत्पादने यांचा समावेश करण्यात आलेला आहे. हे विभाग कौटुंबिक-केंद्रित खरेदीचा अनुभव प्रदान करण्यावर आपले लक्ष केंद्रित करते.

# कॅरारो इंडियातर्फे १,८१२ कोटींच्या आयपीओसाठी डीआरएचपी प्रस्ताव दाखल

**मुंबई :**

ट्रॅक्टर आणि महामार्गाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी वापरली जाणारी अवजड वाहने आणि कृषी आणि बांधकाम उपकरणांसाठी विविध ट्रान्समिशन यंत्रणा बनवणाऱ्या पुण्याच्या कॅरारो इंडिया लिमिटेडने प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ) व्दारे भांडवल उभारणीसाठीचा प्रस्ताव (रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस-डीआरएचपी) भांडवली बाजाराचे नियमन करणाऱ्या सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ला सादर केला आहे.

प्रत्येक समभागाचे दर्शनी मूल्य १० रुपये असणारा हा आयपीओ कॅरारो इंटरनॅशनस एसईतर्फे १,८११.६५ कोटी रुपयांसाठी संपूर्ण हिस्सा विक्रीचा प्रस्ताव (ओएफएस) आहे.

भांडवलविक्रीचा हा प्रस्ताव बुक-बिल्डींग प्रक्रियेव्दारे सादर केला जात असून यात पात्रताधारक संस्थांत्मक खरेदीदारांसाठी एकूण समभागांपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक हिस्सा वाटपासाठी उपलब्ध राहणार नाही, तर गैरसंस्थात्मक गुंतवणूकदारांसाठी किमान १५ टक्के तर रिटेल वैयक्तिक गुंतवणूकदारांसाठी प्रस्तावाच्या किमान ३५ टक्के हिस्सा वाटपासाठी उपलब्ध राहील.

कॅरारो एस. पी. ए. ची उपकंपनी असलेल्या कॅरारो इंडियाची स्थापना १९९७ मध्ये करण्यात आली असून १९९९ मध्ये कंपनीने ट्रान्समिशन सिस्टीमचे तर २००० मध्ये ॲक्सलच्या उत्पादनास सुरूवात केली. कॅरोरा समूहातील अन्य संस्थांकडून प्रदान करण्यात आलेल्या आयपी हक्कांचा वापर करुन कंपनीने आपले उत्पादन सुरु केले आणि यंत्रसामुग्रीच्या मूळ उत्पादक ग्राहकांसाठी अतिशय अवघड आणि अव्वल दर्जाची अभियांत्रिकी उत्पादने आणि पर्याय विकसित करण्यात नैपुण्यता प्राप्त केलेली आहे. कंपनी सध्या कृषी ट्रॅक्टर आणि बांधकाम वाहनांसाठी ॲक्सल आणि ट्रान्समिशन यंत्रणा तयार करण्यावर केंद्रीत असून स्वतंत्र्यरित्या टीअर वन पुरवठादार आहे.

कॅरोरा इंडियाच्या संचालक मंडळाचे नेतृत्व इत्तोर फ्रान्ससेस्को सेक्कॉय हे करत असून ते अध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक आहेत; तसेच १९९२ पासून करोरा समूहासोबत असलेले आणि कंपनीच्या व्यवसाय आणि धोरणात्मक बाजारपेठेतील स्थितीला आकार देण्यात मूलभूत भूमिका बजावणारे संचालक आणि उपाध्यक्ष टोमॅस्को कॅरोरा हेही संचालक मंडळात आहेत. मंडळातील इतर सदस्यांमध्ये व्यवस्थापकीय संचालक बालाजी गोपालन, मुख्य वित्तीय अधिकारी डेव्हिड ग्रोसी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुधेंद्र मण्णीकर, बिगर-कार्यकारी संचालक एनरिको गोमिएरो आणि अँड्रिया कॉन्शेटो आणि स्वतंत्र संचालक म्हणून उमा मांडवगणे आणि किशोर सालेतोरे यांचा समावेश आहे.

कॅरारो ग्रुप हा भारतातील कृषी ट्रॅक्टर आणि बांधकाम वाहन उद्योगांमध्ये ट्रान्समिशन सिस्टीमसाठी टीयर वन पातळीचा प्रमुख स्वतंत्र पुरवठादार तर एक्सलसाठी प्रमुख पुरवठादार आहे. याव्यतिरिक्त, १५०HP क्षमतेच्या ट्रॅक्टरपासून ते चार-चाकी ड्राइव्ह क्षमता असलेल्या वाहनांपर्यंत ट्रान्समिशन सिस्टीम प्रदान करण्यात कंपनीने स्वतःला बाजाराची प्रमुख कंपनी म्हणून स्थापित केलेले आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या, कॅरारो इंडियाच्या डिझाइन क्षमता कॅरारो टेक्नॉलॉजीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि कॅरोरो समूहातर्फे प्रदान केल्या गेल्या आहेत. तथापि, १ ऑक्टोबर, २०२३ रोजी आयपी अधिकारांचे हस्तांतरण आणि जून २०२४ मध्ये उढखझङ च्या संपादनामुळे कंपनी आता आपल्या ग्राहकांना एकत्रित डिझाइनची सेवा पुरविते आणि त्यामुळे कंपनीची भारतातील स्पर्धात्मक पातळीरील स्थिती अतिशय मजबूत झाली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष १९९७ मध्ये निर्यात केलेल्या जवळपास सर्व उत्पादनांमधून देशांतर्गत बाजारपेठेत आपला व्यवसाय वाढवत नेला आहे. आर्थिक २०२४ मध्ये देशांतर्गत विक्रीतून कंपनीला अंदाजे ६४.८२ टक्क्यांपर्यंत उत्पन्न मिळालेले आहे.

कंपनीची उत्पादने ही त्यांच्या ग्राहकांच्या अंतिम उत्पादनांचे महत्त्वपूर्ण घटक आहेत. या उत्पादनात विविध ऑफ-हायवे वाहने, गियर्स, शाफ्ट्स आणि औद्योगिक आणि ऑटोमोटिव्ह वाहनांसाठी रिंग गियर यांचा समावेश आहे. कंपनीच्या विस्तृत उत्पादनाच्या श्रेणीमध्ये बॅकहो लोडर, माती कॉम्पॅक्टर्स, क्रेन, सेल्फ-लोडिंग काँक्रीट मिक्सर आणि लहान मोटर ग्रेडरसह कृषी ट्रॅक्टर आणि बांधकाम वाहनांच्या श्रेणीसाठी एक्सेल आणि ट्रान्समिशन सिस्टम आदींचा समावेश आहे.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने साजरा केला महिला समानता दिवस

**नाशिक : प्रतिनिधी**

महिला समानता दिनानिमित्त,टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) स्त्री-पुरुष समानतेला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या महिलां कर्मचाऱ्यांना आणि त्याबाहेरील महिलांना सक्षम बनवण्याच्या आपल्या दृढ वचनबद्धतेची पुष्टी करते. युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स (एसडीजी), विशेषत: एसडीजी ५ (लिंग समानता) आणि एसडीजी ८ (चांगले काम आणि आर्थिक विकास) यांच्याशी संरेखित करून, टीकेएमने सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण कार्यस्थळाला चालना देण्याच्या उद्देशाने परिवर्तनकारी उपाय योजले आहेत.

त्याच्या दीर्घकालीन दृष्टीकोनाचा एक भाग म्हणून, टीकेएमने २०३० पर्यंत आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये महिलांची संख्या ३०% पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, टीकेएमने मजबूत विविधता, समानता आणि समावेश (डीईआय) उपक्रमांची मालिका राबवली आहे. ज्यामध्ये डीईआयला समर्पित वरिष्ठ पातळीवरील टीमची निर्मिती, संपूर्ण उद्योगांमध्ये व्यापक बेंचमार्किंग आणि महिलांसाठी अधिक संधी निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या २०३० अजेंड्यासह संरेखित करणे समाविष्ट आहे.

१३ मार्च २०२४ रोजी, टीकेएमने ५५ महिला पर्यवेक्षकांच्या पहिल्या बॅचच्या कॅपिंग समारंभासह एक महत्त्वपूर्ण टप्पा साजरा केला, तसेच १६० नवीन महिला टीम सदस्यांना समाविष्ट केले, ज्याद्वारे कंपनीतील एकूण महिलांची संख्या ४५० पेक्षा जास्त झाली आणि वर्षाच्या अखेरीस ८५० पेक्षा अधिक पोहोचण्याची योजना आहे. टीकेएमने लैंगिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी सर्वोत्तम पद्धतींचा तपशील देणारी लिंग विविधता मानक कार्यप्रणाली पुस्तिका देखील सादर केली आहे. यावेळी बोलताना,एक्झिक्युटीव्ह वाइस प्रेसिडेंट, फायनान्स आणि ॲडमिनिस्ट्रेशन, श्री जी. शंकरा - म्हणाले, टोयोटा किर्लोस्कर मोटरमध्ये, आमचा विश्वास आहे की स्त्री-पुरुष समानता हे केवळ एक ध्येय नाही, तर आमच्या यशाचा आणि टिकाऊपणाचा एक महत्वाचा चालक आहे. सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण कार्यस्थळाला प्रोत्साहन देण्याची आमची वचनबद्धता आमच्या संस्थात्मक मूल्यांमध्ये खोलवर रुजलेली आहे आणि आमच्या कर्मचाऱ्यांमध्ये महिलांना सक्षम बनवण्यात महत्त्वपूर्ण प्रगती केल्याचा आम्हाला अभिमान आहे. टीकेएमची लैंगिक वैविध्यतेची वचनबद्धता त्याच्या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या विस्ताराद्वारे आणखी स्पष्ट होते. टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (टीटीटीआय) मधील तीन वर्षांचा निवासी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची संख्या आता दुप्पट होऊन १२०० झाली आहे, ज्यामध्ये ६०० विद्यार्थिनी आहेत, तर टोयोटा कौशल्य कार्यक्रम ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांचा प्रशिक्षण कार्यक्रम ऑफर करतो. या उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी, टीकेएमने टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (टीटीटीआय) मधील ६०० महिला विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतिगृह बांधणे आणि सुरक्षा वैशिष्ट्ये आणि अपग्रेडेड टॉयलेट आणि लॉकर रूम यासारख्या सुविधा वाढवणे यासह महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली आहे.

# आयसीआयसीआय प्रुडेन्शियल व्हॅल्यू डिस्कव्हरी फंडची २० वर्षे पूर्ण

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतातील सर्वात मोठा व्हॅल्यू फंड असलेल्या आयसीआयसीआय प्रुडेन्शियल व्हॅल्यू डिस्कव्हरी फंडने क्लोजिंग ॲसेट्स अंडर मॅनजमेंट (एयूएम) द्वरे यशस्वीरीत्या २० वर्षे पूर्ण केली आहेत. या योजनेत ४८,८०५.९७ कोटी रूपयांचे क्लोजिंग एयूएम आहे. हे मूल्य श्रेणीत एकूण एयूएमच्या जवळपास २५.९ टक्के आहे. यातून योजनेत व्हॅल्यू इन्व्हेस्टर्सचा मोठा गुंतवणूकदार विश्वास दिसून येतो. माहिती ३१ जुलै २०२४ नुसार (स्त्रोतः व्हॅल्यू रिसर्च).

ही योजना स्टॉक्सच्या वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओमध्ये गुंतवणूक करून मूल्य गुंतवणूक स्टाइल साध्य करते, जेथे स्टॉक्सचे मूल्यांकन आकर्षक आहे, परंतु ते आपल्या मूलभूत मूल्याच्या सवलतीत दर लावत आहेत.

स्थापनेच्या वेळी १० लाख रूपयांची एकूण गुंतवणूक (१६ ऑगस्ट २००४) आता ३१ जुलै २०२४ नुसार ४.५६ कोटी रूपयांची म्हणजे २१.०९ टक्के सीएजीआर असेल. निफ्टी ५० मधील अशाच प्रकारच्या गुंतवणूकीने १६.२ टक्के सीएजीआरने जवळपास २ कोटी रूपयांचा परतावा दिला असता.

२० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मत व्यक्त करत आयसीआयसीआय प्रुडेन्शियल एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निमेश शाह म्हणाले, ''मूल्य गुंतवणूकीसाठी संयमाची गरज असल्याचे जाणून घेणे महत्त्वाचे आहे, प्रत्यक्ष संपूर्ण फायदे मिळण्यासाठी वेळ लागू शकतो. आयसीआयसीआय प्रुडेन्शियल व्हॅल्यू डिस्कव्हरी फंडच्या प्रवासामधून निदर्शनास आले आहे की, मूल्य गुंतवणूक दृष्टिकोन भारतातील बाजारपेठेत देखील प्रभावी आहे. आम्हाला अभिमान वाटतो की, या योजनेने सतत संयमी गुंतवणूकदारांना दीर्घकालीन संपत्ती संपादित करण्यास मदत केली आहे.''

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल एएमसी लि.चे कार्यकारी संचालक व सीआयओ एस. नरेन आपले मत व्यक्त करत म्हणाले, ''आयसीआयसीआय प्रुडेन्शियल म्युच्युअल फंडने २००४ मध्ये आपला व्हॅल्यू डिस्कव्हरी फंड सुरू केला तेव्हा मूल्य गुंतवणूक भारतासारख्या विकसित बाजारपेठेत विकसित होऊ शकेल का याबाबत शंका होती. पण, आमचा दृढ विश्वास होता की यूएसए सारख्या इतर विकसित अर्थव्यवस्थांमध्ये यशस्वी ठरलेले मूल्य गुंतवणूक येथे देखील यशस्वी ठरेल.''

ते पुढे म्हणाले, ''गेल्या दोन दशकांमध्ये आयसीआयसीआय प्रुडेन्शियल व्हॅल्यू डिस्कव्हरी फंडने निदर्शनास आणले आहे की, मूल्य गुंतवणूक भारतासारख्या विकसित बाजारपेठेत उपयुक्त ठरू शकते. मे २००६ ते फेब्रुवारी २००९, तसेच २०१६ ते २०१८ दरम्यान कामगिरी उत्तम राहिली नाही, तरीदेखील दीर्घकालीन निष्पत्तींमधून मूल्य गुंतवणूकीची शाश्वत क्षमता दिसून येते. आम्हाला विश्वास आहे की, अशा टप्प्यांनंतर देखील मूल्य गुंतवणूकीचे दीर्घकालीन पैलू प्रबळ आहेत.


आमचा विश्वास आहे की, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल व्हॅल्यू डिस्कव्हरी फंड विशेषत: सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) मार्गाच्या माध्यमातून भारतातील दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी उत्तम गुंतवणूक पर्याय आहे.

# मुंबई इंडियन्सची नॉटिलस मोबाइलच्या रिअल क्रिकेटशी भागीदारी

**नाशिक : प्रतिनिधी**

आपल्या जगभरात प्रसिद्ध रियल क्रिकेट सिरीजसाठी प्रसिद्ध असलेल्या जेटसिंथेसिसच्या नॉटिलस मोबाइलने मुंबई इंडियन्सशी भागीदारी केल्याचे सहर्ष जाहीर केले आहे. मुंबई इंडियन्स ही जागतिक फ्रँचाईज क्रिकेट इकोसिस्टममधली एक आघाडीची टीम आहे. या भागीदारीतून एका नवीन, अधिकृत परवानाधारक मोबाइल क्रिकेट सिम्युलेशन गेमची सुरुवात झाली आहे, ज्यामध्ये मुंबई इंडियन्समधल्या खेळाडूंची दमदार उपस्थिती आणि त्या टीमची मोहक व्हिज्यूअल्स असतील.२५ ऑगस्ट २०२४ पासून रियल क्रिकेटच्या चाहत्यांना एका खास मोबाइल गेममध्ये मुंबई इंडियन्स खेळाडूंसोबत खेळण्याची संधी मिळेल. या गेममध्ये हार्दिक पंड्या, रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, जेराल्ड कोएट्झी, नेहल वाढेरा आणि २०२४ च्या चमूमधले इतर सदस्य असतील, ज्यामुळे जगभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी हा गेम वास्तविक आणि त्याच वेळी भलताच मनोरंजक होईल. सदर भागीदारीत या टीमचे अधिकृत लोगो, टीमच्या किट्स आणि हुबेहूब खेळाडू असतील, ज्यांच्यामुळे हा गेम अगदी खराखुरा वाटेल.

जेटसिंथेसिसचे संस्थापक आणि सीईओ राजन नवानी म्हणाले, मुंबई इंडियन्सशी भागीदारी हे रियल क्रिकेटसाठी एक लक्षणीय पुढचे पाऊल आहे आणि ते भारतीय ईस्पोर्ट क्षेत्राबाबतचे आमचे व्यापक उद्दिष्ट दर्शविते. एका अत्यंत प्रसिद्ध टीमशी भागीदारी हा आमच्या खेळाडूंसाठी एक महत्त्वाचा क्षण आहे आणि रियल क्रिकेटला भारताच्या प्रीमियर ईस्पोर्ट निर्यातीच्या रूपात स्थापित करण्याच्या आमच्या लक्ष्याला मजबूती देणारा हा निर्णय आहे. ही भागीदारी इनोव्हेशन




प्रती असलेली आमची निष्ठा आणि क्रिकेटच्या बाबतीतला आमचा उत्साह अधोरेखित करते. मोबाइल गेमिंगच्या भवितव्यावर याचा प्रभाव बघण्यास आम्ही उत्सुक आहोत.जेटसिंथेसिसच्या नॉटिलस मोबाइलचे संस्थापक आणि सीईओ अनुज मानकर म्हणाले, मुंबई इंडियन्सचे रियल क्रिकेट जगतात स्वागत करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. मी स्वतः मुंबईचा असल्यामुळे त्यांच्याशी भागीदारी करणे हे माझे पहिल्यापासून स्वप्न होते. आमच्या चाहत्यांना अत्यंत अस्सल क्रिकेट


सिम्युलेशन अनुभव देणे हाच आमचा उद्देश आहे आणि टी२० च्या श्रेष्ठ टीम्सपैकी एका टीमशी भागीदारी हे मोबाइल क्रिकेट गेमिंगमध्ये एक नवीन मापदंड प्रस्थापित करणारे आहे. या भागीदारीमुळे या गेमचे आकर्षण तर वाढेलच, शिवाय, जगातील सर्वात यशस्वी प्रीमियर लीग टीम बनून एक अद्भुत अनुभव निर्मितीची संधी चाहत्यांना मिळेल.मुंबई इंडियन्सचे प्रवक्ता म्हणाले, मुंबई इंडियन्स आजही जगातील एक अत्यंत लोकप्रिय क्रिकेट टीम आहे. आता रियल क्रिकेटशी भागीदारी केल्यावर आम्हाला नव्या, तरुण आणि वेगळ्या प्रकारच्या प्रेक्षकांना आपलेसे करून घेण्यास मदत

होईल. या भागीदारीत एक सशक्त नाते निर्माण करण्याची संधी दडलेली आहे आणि आम्ही अशा संधींचा शोध घेत राहू, ज्याच्यामुळे सहभाग वाढेल आणि संपूर्ण वर्षभर एमआय शी संबद्ध राहता येईल.२०१४ मध्ये लॉन्च झाल्यापासून रियल क्रिकेट सिरीज गाजते आहे आणि त्यांनी ३५० मिलियन डाउनलोड, जगभरातून एक मिलियनपेक्षा जास्त सक्रिय दैनिक डाउनलोड आणि ६.८ मिलियन मासिक सक्रिय यूझर्स साध्य केले आहेत. यामुळे गेमर मूलभूत सामने, टूर्नामेंट आणि करियर मोड्स खेळू शकतात, ज्यामुळे जगभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी हा गेम म्हणजे एक परिपूर्ण आणि रंजक पॅकेज ठरते.

# राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेचे ३ सप्टेंबर रोजी उद्घाटन

**मुंबई :**

केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती



तंत्रज्ञान मंत्रालयासह प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभाग आणि राज्य शासनाचा प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन उपविभाग सामान्य प्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २७ वी राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषद २०२४ दि. ३ व ४ सप्टेंबर, २०२४ रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

ही परिषद देशातील सर्वात मोठ्या सभागृहांपैकी एक असलेल्या जस्मीन हॉलमध्ये होणार आहे. परिषदेचे यजमानपद यंदा महाराष्ट्र राज्याकडे असून विकसित भारतः सुरक्षित आणि शाश्वत ई-सेवा पुरविणे हा या परिषदेचा विषय आहे. या परिषदेस प्रधानमंत्री कार्यालयाचे राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेच्या समारोप कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, हे उपस्थित राहणार आहेत.शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री तथा मुंबई शहर पालक मंत्री दीपक केसरकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा मुंबई उपनगर पालक मंत्री मंगलप्रभात लोढा हेही या परिषदेस उपस्थित राहणार आहेत. या परिषदेतून सु-प्रशासन तसेच ई- गव्हर्नन्ससाठीच्या उत्कृष्ट संकल्पनांचे आदान-प्रदान होणार आहे. या परिषदेत सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय सुधारणा, रचना व कार्यपद्धती या उपविभागाच्या नवीन नावांची घोषणादेखील केली जाणार आहे. या परिषदेमध्ये सहा मुख्य सत्रे आणि सहा उप-सत्रे होणार आहेत. त्यांमध्ये शासकीय, शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील व्याख्याते आणि पुरस्कार विजेते भाग घेणार असून नावीन्यपूर्ण ई-प्रशासन पद्धतींवर चर्चा आणि विचारविनिमय होणार आहे. या परिषदेत मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांची मार्गदर्शनपर भाषणे होणार असून डॉ. जितेंद्र सिंह, केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जातील. पुरस्कार विजेते, व्याख्याते आणि इतर सहभागींसाठी nceg.gov.in या पोर्टलवर नोंदणी सुरू झाली आहे.

**महत्त्वाचे**

## आयुर्वेद सेवा संघ पक्षाघात रोग विकार शिबिराचे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

आयुर्वेद महाविद्यालय व आरोग्यशाळा रुग्णालय गणेशवाडी, पंचवटी शताब्दी महोत्सवानिमित्त - पक्षाघात रोग विकार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ओ. पी. डी. नं. १४ येथे सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० पर्यंत शिबिर घेण्यात येणार असून अधिक माहितीसाठी वैद्य. नेहा बारी. वैद्य. संजीवनी राठोड - विभागप्रमुख कायचिकित्सा विभाग येथे संपर्क करण्याचे आवाहन केले आहे. या शिबिरात हातापायांची हालचाल न होणे, हातापायांना ताकद नसणे. हातापायांचे जखडणे व दुखणे. लकवा झाला असेल किंवा हातापायांचा एक भाग लुळा पडणे अशी लक्षणे असणाऱ्यांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आरोग्यशाळा आयुर्वेद महाविद्यायाने आवाहन केले आहे.

## आम्लपित्त विकार चिकित्सा शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**

आयुर्वेदसेवा संघ शतक महोत्सवानिमित्त आरोग्यशाळा रुग्णालय, गणेशवाडी, पंचवटी, येथे दि ३०-३१ ऑगस्ट या कालावधीमध्ये आम्लपित्त विकार चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले आहे. ॲसिडीटी, आंबट ढेकर/ पाणी येणे, छातीत जळजळ, अजीर्ण, पोटात गॅसेस होणे इत्यादी अनेक पचन विकार असणाऱ्या रुग्णांनी नावनोंदणी व पुढील मार्गदर्शन याकरिता पंचकर्म विभाग ओपीडी २० आरोग्यशाळा रुग्णालय, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक येथे सकाळी ९.३० ते संध्याकाळी ४.३० भेट द्यावी, असे आवाहन प्राचार्य वैद्य विनय सोनांबेकर, अधीक्षक वैद्य पंकज दीक्षित, विभागप्रमुख वैद्य सविता कुलकर्णी यांनी केले आहे. या शिबिरामध्ये वमन विरेचन इ. पंचकर्म, औषधे, आहारसल्ला माफक दरामध्ये केला जाईल.

## जिल्हा न्यायालय गट ड संघटनेची कार्यकारिणी जाहीर

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा न्यायलय गट ड संघटनेची वार्षिक



सर्वसाधारण सभा तत्कालीन पदाधिकारी मंगेश जोशी, जयदेव पवार, सुरेश नवले व सल्लगार भाऊसाहेब झाल्टे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच झाली. यात पुढील पाच वर्षांसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून, अध्यक्षपदी लोटन बैसाणे, कार्याध्यक्षपदी संदीप जाधव, सहसचिव देविदास लोहकरे, सचिवपदी गोकुळ देशमुख, उपाध्यक्ष विजय डांगळे, मालेगाव उपाध्यक्ष मालेगाव, नीलेश महाजन, खजिनदार सुनील जाधव, सहखजिनदार नरेंद्र जाधव तर जिल्हा संघटकपदी अशोक दाभाडे यांची निवड जाहीर करण्यात आली.

## प्राचार्य दीपक व्याळीज यांना महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार प्रदान

**इंदिरानगर : वार्ताहर**



लाइफ ब्ल्यूम इंडिया यांच्या वतीने महाराष्ट्र आयकॉन २०२४ हा पुरस्कार दीपक व्याळीज यांना प्रधान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार लाइफ ब्लूम इंडियाच्या वतीने देण्यात येतो. दीपक व्याळीज सध्या ग्रामोदय शिक्षण संस्था नाशिक संचलित ग्रामोदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन नाशिक येथे प्राचार्य पदावर कार्यरत आहेत. ते नेहमी शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवित असतात. त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध सहशालेय उपक्रमाचे आयोजन केले जाते. दीपक व्याळीज हे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी सहिष्णता आणि संस्कृती जपण्याची शिकवण नेहमी देत असतात. पालकांना व विद्यार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असतात. त्यांना महाराष्ट्र शासनाचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळालेला आहे. विविध क्षेत्रातील एकूण २५ पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत.

महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामोदय शिक्षण संस्था अध्यक्ष योगेश हिरे तसेच सरचिटणीस कृष्णाराव नेरे, महेश हिरे, ॲड. प्रवीण कुमार नेरे, आमदार सीमा हिरे तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## आगामी सणांनिमित्त सातपूरला शांतता समिती बैठक

**सातपूर : प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सव, गोकुळाष्टमी, दहीहंडी सणानिमित्त काल सातपूर पोलीस ठाण्यात वाद्यपथके आणि मंडळे यांची शांतता समिती बैठक संपन्न झाली. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख,सातपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित नलवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही शांतता समिती बैठक पार पडली. यावेळी डीजे, डॉल्बीला बंदी असून, धार्मिक वातावरणात कार्यक्रम साजरे करून कुठल्याही प्रकारे नियमांचे,कायद्याचे उल्लंघन होणार नाही, या हेतूने महत्त्वाच्या सूचनांबद्दल सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख यांनी सूचना करून मार्गदर्शन केले. याप्रसंगी सातपूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विश्वास पाटील,विलास गिते,दत्ता गायकवाड,प्रशांत पवार,सागर गुंजाळ, दिपक खरपडे आदी पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच गणेश मंडळाचे आणि दहीहंडी, गोकुळाष्टमी कार्यक्रमाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# पायी पैंजण वाजती...

## शहरात गोकुळाष्टमीचा उत्साह

**नाशिक : प्रतिनिधी**

**पायी पैंजण वाजती.. गवळण हरीला लाजती... अशा अनेक सुमधुर गीतांची आठवण करीत कृष्णगीते गोकुळाष्टमीला भजन -कीर्तनांमधून भगवान श्रीकृष्णांसाठी गायली जातात. शहर आणि उपनगरांमध्ये कृष्णजयंतीनिमित्त मंदिरे सजली असून, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कृष्णजन्म रात्रीचा असल्याने सायंकाळपासून कृष्ण भजन-कीर्तन, पूजन, अभिषेकाचे आयोजन करण्यात आले होते.**

गोकुळाष्टमी अर्थात कृष्ण जन्माष्टमीचा उत्साह शहरभरात दिसून येत आहे. श्रावणी सोमवार आणि गोकुळाष्मी एकत्रित आल्याने भाविकांच्या उत्साहाला उधाण आले होते. गोकुळाष्टमीनिमित्त शहरातील मंदिरे सजविण्यात आली होती. कापडबाजार येथील कृष्णमंदिर तसेच इस्कान मंदिरातही श्रीकृष्णजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिरांना सजविण्यात आले असून, कृष्णजन्म रात्री साजरा करण्यात आला. यावेळी गोपाळाच्या मूर्तीला पाळण्यात ठेवून झोका दिला जातो. भजन-कीर्तन करण्यात आले. कृष्णजन्मानंतर दुसऱ्या दिवशी गोपाळकाल्याचे आयोजन करण्यात येते. दहीहंडीचा उत्सव आयोजित करण्यात येतो. तरुणांमध्ये दहीहंडी फोडण्याची स्पर्धा केली जाते.

गेल्या चार ते पाच दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे शहरासह उपनगरांतही पावसामुळे भाविकांच्या मंदिर, दर्शन पूजाविधीस अडथळा आल्याचे चित्र होते. अनेकांनी घरातच पूजा, अभिषेक, नैवेद्य आरती, मंत्रोपचार करीत पूजन करण्यास पसंती दिली. या दिवशी उपवासाचे महत्त्व असून, एक गोकुळाष्टमी केल्यास एकवीस एकादशीचे फळ मिळते, अशी धारणा असल्याने गोकुळाष्टमीचा उपवास आवर्जून केला जातो.

श्रावण महिन्यात कृष्ण अष्टमी या तिथीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदिशाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. दहीहंडीसारखे कार्यक्रम साजरे केले जाते. या दिवशी भगवान श्रीकृष्णाला वेगवेगळ्या नावांनी बोलावले जाते. जसे की गोविंद, बालगोपाळ, कान्हा, गोपाल केशव ही सर्व श्रीकृष्णांची प्रसिद्ध नावे आहेत. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार सृष्टीचे पालनकर्ता म्हणणारे श्रीहरी विष्णूचे अठरावे अवतार प्रभू श्रीकृष्ण आहे आणि कृष्णाच्या जन्मदिवशी गोकुळाष्टमी साजरी केली जाते.

उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपाळकाला असे म्हणतात. कृष्णजयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. गोविंदा आला रे गोविंदा आला, गोकुळात आनंद झाला, असे गाणे म्हणत लहान-मोठे पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात.



## इस्कॉनतर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमी जल्लोषात

**नाशिक : प्रतिनिधी**

**कृष्ण जन्माष्टमी म्हणजे संपूर्ण विश्वभरातील इस्कॉन मंदिरांमध्ये साजरा केला जाणारा सर्वांत मोठा महोत्सव. द्वारका येथे स्थित इस्कॉनचे श्री श्री राधा मदनगोपाल मंदिरदेखील याला अपवाद नाही.**

कृष्ण जन्माष्टमीनिमित्त मंदिराची तसेच श्रीराधा-कृष्णांच्या विग्रहांची सुंदर सजावट करण्यात आली होती. सकाळपासून मंदिरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. महोत्सवाला सकाळी ५ वाजताच्या मंगल आरतीपासूनच सुरुवात झाली. त्यानंतर हरे कृष्ण महामंत्रा जप, दर्शन आरती, श्रीमद् भागवत प्रवचन झाले तसेच श्रीकृष्णांच्या विविध लिला प्रदर्शित करणारी लघु नाट्ये तसेच दिवसभर कीर्तन, भजनाचे विविध कार्यक्रम झाले. जन्माष्टमीनिमित्त मंदिरात २४ तास अखंड हरिनाम संकीर्तन आयोजित करण्यात आले होते. सुमारे १००० भाविकांनी संध्याकाळी श्रीराधा-कृष्णांच्या विग्रहांचा पंचामृताने अभिषेक केला. रात्री १२ वाजता भगवान श्रीकृष्णांना महाआरती व महाभोग अर्पण करण्यात आला. भगवान श्रीकृष्णांना सायंकाळी सुमारे १००८ पदार्थांचा नैवेद्य दाखविण्यात आला. मंदिराबाहेर विविध आध्यात्मिक ग्रंथांचे प्रदर्शन व विक्री केली जात होती. जन्माष्टमी महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी मंदिराचे अध्यक्ष कृष्णधन प्रभू, उपाध्यक्ष सहस्त्रशीर्ष प्रभू, विग्रह सेवा प्रमुख गोपालानंद प्रभू, सजावटप्रमुख सार्वभौमकृष्ण प्रभू, महोत्सव प्रमुख अच्युत प्राण प्रभू, सेवा प्रमुख लिलाप्रेम प्रभू, नृसिंह कृपा प्रभू, मारुतीप्राण प्रभू, अक्षय एडके, सुमेध पवार, नादिया कुमार दास, दिवाकर माताजी, अंतरंगा शक्ती देवी दासी, तुलसी सेविका माताजी, प्रिया गोरे माताजी, सत्यभामा कुमारी माताजी आणि इतर कृष्णभक्तांनी परिश्रम घेतले. जन्माष्टमीच्या निमित्ताने इस्कॉन मंदिरातर्फे 'तीन दिवसीय- गीता कोर्स' चे आयोजन करण्यात आले आहे. हा कोर्स ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७.३० ते ९.३० दरम्यान असेल व श्रीमान नृसिंह कृपा प्रभू यांचे प्रवक्ता असतील. तसेच विद्यार्थ्यांसाठी ''क्लाइंबिंग द लॅडर ऑफ सक्सेस'' ही कार्यशाळा आयोजित केली आहे. ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते ७ ही असेल व श्रीमान कृष्णधन प्रभू या कार्यशाळेचे प्रवक्ता असतील.



## महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनतर्फे सत्कार सोहळा

**नाशिक : प्रतिनिधी**

**सामाजिक उपक्रमांतर्गत महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनतर्फे महाराष्ट्रातील प्लंबिंग क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल अकरा प्लंबिंग मित्रांचा सत्कार नाशिक येथे आमदार सीमा हिरे यांच्या हस्ते करण्यात आला.**

या कार्यक्रमासाठी बृहन्मुंबई लायसन प्लंबर असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश पाटील, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ता प्रदीप पेशकार, प्राचार्य प्रशांत पाटील व महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनचे राज्याचे चेअरमन रवी पाटील उपस्थित होते.

आज आपल्या देशात प्लंबिंग साहित्य निर्मिती व प्लंबिंग काम सेवा असे दोन्ही मिळून दर वर्षी देशांतर्गत बाजारातली उलाढाल तीन लक्ष कोटी आहे. महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनचे राज्याचे चेअरमन रवी पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात प्लंबिंग क्षेत्राची वाटचाल विशद केली.

बृहन्मुंबई लायसन प्लंबर असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी भारतातील एकमेव महानगरपालिका आहे की तिचे स्वतः चे प्लंबिंग कामाचे नियम व उपनियम आहेत. भारतात विकसित राष्ट्राप्रमाणे एक समान प्लंबिंग कामाचे नियम व उपनियम असणे आवश्यक आहे असे सांगितले. प्राचार्य प्रशांत पाटील यांनी यावेळी प्लंबिंग प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन केले. प्रदीप पेशकार यांनी केंद्र सरकारच्या विविध व्यवसाय वृद्धीच्या योजनांची माहिती याप्रसंगी दिली. आमदार सीमा हिरे यांनी पुरस्कारार्थींना शुभेच्छा दिल्या आणि यातून प्रेरणा घेऊन चांगले प्लंबिंग काम करावे, असे प्रतिपादन केले.

नामदेव चौधरी नागपूर, जयंत काटकर गोंदिया, प्राचार्य मधुकर तुळशीराजी तिघरे चंद्रपूर, शिवाजी कदम मुंबई, आरती बाविस्कर जळगाव, सध्या उत्तर प्रदेश, आर. एम. भंडारी नाशिक, जुलाल महाजन जळगाव, विद्याधर गोखले पुणे, शब्बीरभाई अब्दुल्लाह बुरहानी (दुकानदार), ज्ञानेश्वर रामदास गायकवाड, पाणीपुरवठा कर्मचारी, फायरमॅन राजेश जयराम हळस यांचा सत्कार झाला. वैभव जोशी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर पाटील, सोमनाथ क्षीरसागर, शिवाजी हांडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एमएसबीचा बक्षीस समारंभ रंगला




**इंदिरानगर : वार्ताहर**

**द्वारका येथील एमएसबी विद्यालयचा वार्षिक बक्षीस समारंभ आणि स्नेहसंमेलन कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा हॉलमध्ये पार पडला.**

दाऊदी बोहरा समाजाचे ५३ वे धर्मगुरू सय्यदना डॉ. आलीकद्र मुफद्दल भाईसाहेब यांना ८० व्या वाढदिवसानिमित्त विशेष कवायतीद्वारे शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमासाठी समाजाचे शहराचे अमील अबी तमीम भाईसाहेब, मुंबई येथील नफिसा बेन साहेबा, युसुफ यमानी भाईसाहेब आणि मुफद्दल शाकिर प्रमुख पाहुणे होते. शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. संस्थेचे माजी सेक्रेटरी सैफुद्दीन तलवारी, शब्बीर बुरहानी, युसूफ जमाली, अब्बास मारू, हकीमुद्दीन सिन्नरवाला, जोएब मोगरावाला यांचा विशेष सत्कार करण्यात आला. दिवंगत सेक्रेटरी मोहम्मद मियाजी यांच्या वतीने मरियम मियाजी यांनी सन्मान स्वीकारला. मसूल अब्बास सैफी यांनी प्रास्ताविक केले तर मुख्याध्यापिका मुनिरा इंदोरवाला यांनी आभार मानले. हतीम मुल्ला, उमेहनी कपाडिया आदींनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र बच्छाव, मुर्तझा झाकीर, अजीज हमीद, हुसैन जमाली, बुऱ्हानूद्दीन इझी, मुर्तझा वासींदवाला, युनूस बुंदीवाला, अलेफिया मर्चंट, तसनीम लोखंडवाला, फातेमा पत्रावाला, फरीदा टोपीवाला, मुनिरा झाकीर, फरीदा सैफी, सीमा पाटील, तसनीम पत्रावाला, पराग भरते, वनिता उबाळे, फातेमा पंखावाला आदींनी संयोजन केले.

## कामगारनगर येथे एक झाड पडले, जीवितहानी नाही

**सातपूर : प्रतिनिधी**

**कामगारनगर परिसरात अचानक एक झाड पडल्याची घटना घडली. सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही. कामगारनगर परिसरात कामगारनगर रिक्षा स्टॅण्ड ते सुयोजित परिसरादरम्यान रहदारीचा रस्ता आहे. येथे शाळेची वाहने, महिला कामगार, नागरिक यांची ये-जा चालू असते. सुदैवाने जीवितहानी टळली.**



यावेळी स्थानिक नागरिकांनी अग्निशमन केंद्रास संपर्क साधताच अग्निशमन दलाचे पथक हजर होऊन पडलेले झाड मशीनने कट करून त्यांनी रस्ता मोकळा करून दिला. याआधीही याच रस्त्यावर दोन झाडे पडल्याची घटना घडल्याची माहिती नागरिकांनी सांगितली.

यावेळी रस्ता मोकळा झाल्याने अग्निशमन दलाचे स्थानिक नागरिकांनी आभार मानले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश अंबोरे, अशोक मोरे, अक्षय सोळसे, वैभव साळवे, दत्त प्रधान, महेश कुवर आदी उपस्थित होते.



**नाशिक : शिवसेना उपनेते व शिववाहतूक सेनेचे अध्यक्ष भाऊ कोरगावकर, कार्याध्यक्ष संदीप (बाबू) मोरे, सचिव उमर सिद्दिकी व इतर मान्यवर हे नाशिक दौऱ्यावर आले असता शिववाहतूक सेनेचे नाशिक जिल्हाध्यक्ष विजय काळदाते व स्थानिक पदाधिकारी यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.**

## अंधाच्या जीवनात 'नॅब'ने फुलविली निवाऱ्याची बाग!

**नाशिक : प्रतिनिधी**

**पावसात राहण्याचा निवाराच जमीनदोस्त झाल्याने अंध व्यक्तीपुढे मोठे संकट निर्माण झाले होते. परंतु अंधांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणाऱ्या नॅब महाराष्ट्र या संस्थेने या कुटुंबाची व्यथा पाहून सामाजिक बांधिलकीतून निवारा उपलब्ध करून देत अंधाच्या जीवनात निवाऱ्याची बाग फुलविली. स्वातंत्र्यदिनी या कुटुंबाला हे घरकुल सुपूर्द करण्यात आले.**

मेरीजवळील वज्रेश्वरीनगरमधील झोपडपट्टीत शशी नामदेव शेळके ही अंध व्यक्ती आपल्या वृद्ध आई सुमन नामदेव शेळके, वय ८६ व भाऊ बाळू शेळके मानसिक अपंग यांच्यासमवेत राहत आहे. घरात कमावते कुणीही नाही. कसेबसे जीवन जगत असतानाच अतिवृष्टीमुळे त्यांची राहती झोपडी जमीनदोस्त झाली. कुटुंब बेघर झाले. ही माहिती मिळताच काय करावे अशी चिंता शशी शेळके यांना पडली. या अंधाची हृदयस्पर्शी घटना समजताच अंधांसाठी कार्य करणारी नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड युनिट महाराष्ट्राचे पदाधिकारी रामेश्वर कलंत्री, मानद महासचिव गोपी मयूर, उपाध्यक्ष, अंध कल्याणाचे चेअरमन सूर्यभान साळुंखे, सहसचिव, दिव्यांगांचे आधारस्तंभ डॉ. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार कार्यकारी संचालक विनोद जाधव, सहाय्यक अधिकारी अशोक बागल यांनी भेट देऊन त्यांची तात्पुरती निवास व्यवस्था करून जमीनदोस्त झालेल्या जागेवर नवीन घरकुल निर्माण करण्याचा निर्णय घेतला.



या प्रकल्पावर सहाय्यक अधिकारी अशोक बागल यांनी वेळेची, तहान-भूक विसरून रात्रंदिवस घरकुलास लागणारी सिमेंट, पाइप, विटा, वाळू, प्लंबिंग साहित्य प्रसाधनगृहाचे साहित्य, दारे, खिडक्या उत्कृष्ट प्रतीचे विकत घेऊन घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले. एक छान घरकुलाची निर्मिती करून जो प्रश्न अंध शशी नामदेव शेळके यांच्या जीवनात सुटला नसता, असे घरकुल नॅब महाराष्ट्राच्या वतीने उभारून १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नॅब महाराष्ट्रने शेळकेंच्या घराचा प्रश्न सोडवून त्यांचे स्वप्न कायम निवासाच्या दृष्टीने पूर्ण केले.

स्वप्नपूर्तीचा स्वातंत्र्य दिनी संकल्प करून त्यांना स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात नॅब महाराष्ट्राचे पदाधिकारी रामेश्वर कलंत्री, गोपी मयूर, सूर्यभान साळुंखे, डॉ. मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, मंगला कलंत्री, डॉ. सिंधू काकडे, प्रत्यक्ष कामावर देखरेख करणारे अशोक बागल, विनोद जाधव, रत्नाकर गायकवाड यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत नवीन घराच्या किल्ल्या शशी शेळके यांना प्रदान केल्या. त्यांच्या जीवनात निवाऱ्याची बाग फुलविण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. अंधाच्या जीवनात समता फुलविण्याचे गौरवशाली कार्य नॅब महाराष्ट्राने केले.



## भविष्य निर्वाह निधी रकमेसह थकीत रक्कम त्वरित मिळावी : रोहित गांगुर्डे

**नाशिक : प्रतिनिधी**

**माहे एप्रिल ते जुलै अखेरपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या मुख्याध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुमारे शंभराहून अधिक देय प्रकरणे वेतन पथक आणि भविष्य निर्वाह निधी शिक्षण कार्यालयात प्रलंबित आहेत. सदर रक्कम सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना तात्काळ मिळावी, अशी मागणी इंडिपेंडंट सेकंडरी टीचर्स युनियनतर्फे केली आहे.**

काही कर्मचाऱ्यांचे मेडिकल बिल, वेतन आयोग फरक रक्कम कर्मचाऱ्यांना मिळालेली नाही. सदर रक्कम, फरक बिल, मेडिकल बिल आठ दिवसांत न मिळाल्यास पाच सप्टेंबर रोजी इंडिपेंडंट सेकंडरी टीचर्स युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, अशा आशयाचे निवेदन कार्यालयीन अधीक्षक सुधीर पगार यांना देण्यात आले. तसेच आदिवासी विभागात कार्यरत असणाऱ्या शंभर टक्के अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना शासनाने मंजूर केलेली एकस्तर वेतन श्रेणी व इतर मागण्यांबाबत चर्चा केली. याप्रसंगी रोहित गांगुर्डे, कृष्णाजी लोखंडे, अशोक केदारे, विष्णुपंत घुगे, प्रा. किशोर शार्दुल, जयंत बोढारे, रोहिदास पगारे, अण्णा गायकवाड उपस्थित होते.